


महाराष्ट्राचे जिल्हे

सांगली

(दक्षिण सातारा)

महाराष्ट्राचे जिल्हे

सांगली

किंमत २५ नवे पैसे

महाराष्ट्र सरकारच्या प्रसिद्धि खात्याचें प्रकाशन

महाराष्ट्र राज्य जिल्हा परिचय

सांगली जिल्हा

परिचय

सांगली जिल्ह्याची ऐतिहासिक परंपरा पाहावयाची झाली तर या जिल्ह्याचे दोन विभाग करावे लागतात. एक विभाग संस्थानी मुलुखाचा आणि दुसरा खालसा मुलुखाचा. अर्थात् ही विभागवारी ऐतिहासिक परंपरा पाहाण्यासाठीं **परंपरा** आणि स्वातंत्र्यपूर्व कालांतील परिस्थितीनुसार आहे.

सांगली, मिरज (धा. पा.), मिरज (थो. पा.) हा पटवर्धन घराण्यांतील, जत हे डफळे घराण्यांतील आणि औंध या पंतप्रतिनिधीच्या घराण्यांतील संस्थानिकांचा मुलुख या सांगली जिल्ह्यांत समाविष्ट झालेला आहे. आज त्या त्या राजघराण्यांचा जेवढा मुलुख या जिल्ह्यांत येतो तेवढीच कांहीं त्या त्या संस्थानिकांची राज्यमर्यादा नव्हती. मराठी राज्याच्या सरदारांचे हे संस्थानिक बनले आणि त्यामुळें या संस्थानांचा बराचसा मुलुख विस्कळीतरित्या दूरवर पसरलेला होता.

पटवर्धन घराण्याचे मूळ पुरुष हरभटजी पटवर्धन यांनीं श्रीगणपतीची उपासना केली आणि त्यांच्या घराण्याला राज्यपद मिळालें अशी एक आख्यायिका आहे. १७४१ सालीं गोविंद हरी पटवर्धन यांना सरदारी मिळाली. गोविंद हरीचे वंशज त्यांच्याहूनहि तलवारबहाद्दर आणि मुत्सद्दी निघाले. खडर्याची इतिहास प्रसिद्ध लढाई, श्रीरंगपट्टणच्या हैदर टिपूचा बंदोबस्त या मराठी इतिहासांतील महत्त्वाच्या घटना पटवर्धन घराण्याशीं संबंधित आणि अभिमानास्पद अशा आहेत. याच कुळांत सरदार परशुरामभाऊ पटवर्धन हे प्रसिद्ध लढवय्ये आणि मराठ्यांचे सेनापति होऊन गेले. तासगांव हे त्यांचें गांव, पण पुढें तें खालसा झालें. पटवर्धन वंशजांचें मिरज हे एक महत्त्वाचें घराणें, त्यांच्यांत पुढें भाऊबंदकी आणि वांटप होऊन दक्षिण महाराष्ट्रांत बरीच लहान मोठी पटवर्धन संस्थानें जन्माला आलीं. सांगली-मिरज ही त्यांतीलच होत.

औंध संस्थानचा मूळ पुरुष परशुराम त्रिंबक कुलकर्णी सातारा जिल्ह्यांतील वर्धन गडाजवळील किन्हई गांवचा. छत्रपति संभाजीमहाराजांच्या वधानंतर, छत्रपति राजाराम महाराज हे जिंजीस गेल्यानंतर महाराष्ट्र राखण्याची जबाबदारी ज्यांनीं ज्यांनीं राजनिष्ठेनें पार पाडली त्यांतील हे एक वीर पुरुष होत. (१६९०). याच घराण्यांतील संस्थांनापैकीं, कुंडल, किर्लोस्करवाडी आणि आटपाडी विभाग या नव्या जिल्ह्यांत आहे. त्याचप्रमाणें जत हें डफळे राजघराण्याचें संस्थानहि या नव्या जिल्ह्यांत आहे.

खालसा मुलुखांसंबंधी माहिती म्हणजे शिराळा, वाळवा, तासगांव आणि खानापूर हे जुन्या सातारा जिल्ह्यांतील तालुके होत. यापैकीं शिराळा पेटा हा म. गांधीजींच्यावेळीं सत्याग्रहाच्या काळांत फारच गाजलेला असा भाग होय. याच विभागांतील बिळाशी येथें १९३०-३२ च्या सत्याग्रह संग्रामांत झालेल्या अपूर्व लढयानें इंग्लंडच्या पार्लमेंटमध्यें प्रश्नोत्तरें घडवून आणली होती. वाळवा तालुका हा जंगल सत्याग्रहानें तर गाजलाच पण, "चले जाव" आंदोलनाच्या वेळीं सातारा जिल्ह्यांतील प्रतिसरकार स्थापनेचा विक्रम याच तालुक्यांत झाला. या स्वातंत्र्य आंदोलनांत वाळवे तालुक्यांतील कितीतरी लोकांनीं ब्रिटिश साम्राज्यसत्तेशीं प्राणपणानें लढा दिला.

या जिल्ह्यांतील ऐतिहासिक अवशेषांपैकीं मिरजेचा भुईकोट किल्ला हा एक आहे. मिरजेचा किल्ला कोणीं बांधला याचा उल्लेख कोठें आढळत नाहीं. १४८३ सालीं या किल्ल्याची डागडुजी (दुरुस्ती) झाल्याचा तेवढा उल्लेख आढळतो. यानंतर छत्रपति शिवाजी महाराजांच्या कारकिर्दीत हा किल्ला लढविला गेला. छत्रपति शिवाजी महाराज हे १६६० सालीं कोल्हापुरास असतांना, सेनापति नेताजी पालकर यांनीं या किल्ल्यास वेढा दिला होता. नेताजीला हा किल्ला सर होईना. शेवटीं स्वतः छत्रपति मिरजेस जानेवारी १६६० मध्यें आले आणि सतत दोनतीन महिने प्रयत्न चालविला. इतक्यांत सिद्दीजोहार आणि फाजलखान विजापूरहून निघाले आहेत अशी वार्ता येतांच मिरज किल्ल्याचा वेढा अर्धवट सोडून छत्रपतींना पन्हाळयास जावें लागलें. छत्रपति संभाजी महाराजांच्या कारकिर्दींत संताजी घोरपडे आणि धनाजी जाधव यांनीं महाराष्ट्रांत औरंगजेबाच्या सैन्याविरुद्ध गनीमी युद्ध करतांना आपला कबिला (बायकामुलें) सुरक्षित ठिकाण म्हणून या किल्ल्यांत ठेवला होता असाहि उल्लेख सांपडतो.

सांस्कृतिक स्थळें

सांस्कृतिकदृष्टया विचार केला असतांना या जिल्ह्यांतील सांगली-मिरज हा विभाग प्रथम नजरेसमोर येतो. मराठी रंगभूमीचें जन्मस्थान सांगली हें आहे. १८४३ सालीं विष्णुदास भावे यांनीं "सीता स्वयंवर" हे पहिलें मराठी नाटक लिहिलें. कर्नाटकांतील भागवत नांवाच्या नाटक कंपनीची नाटकें पाहून त्यांना ही प्रेरणा झाली. विष्णुदास हे त्या वेळचे सांगलीचे अधिपति कै. चिंतामणराव आप्पासाहेब पटवर्धन यांचे आश्रित होते. विष्णुदासांच्या नाटयसेवेला त्यांचा फार मोठा आधार होता. संस्थानाधिपतींच्या निधनानंतरहि कै. भावे यांनीं आपलें काम चालूंच ठेवलें आणि पुणें, मुंबई, अहमदनगर वगैरे ठिकाणीं नाटयप्रयोग करून कीर्ति संपादन केली.

कै. भावे यांच्यानंतरहि कै. गोविंद बल्लाळ देवल, कै. कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर व कै. के. रा. छापखाने या नाटककारांनीं मराठी रंगभूमीची फार मोठी सेवा केली. मिरजेस कै. वासुदेवशास्त्री खरे यांनींहि या परंपरेस हातभार लावला. मराठी रंगभूमीवरील नटसम्राट् श्री. नारायणराव राजहंस उर्फ बालगंधर्व हेहि याच जिल्ह्यांतील नागठाणे ता. तासगांव येथील, रंगभूमीवर त्यांचा पहिला प्रवेश घडला तोहि मिरजेच्या नाटयगृहांतच.

आधुनिक काळांतील एक श्रेष्ठ कवि आणि कादंबरीकार म्हणून ख्यातनाम झालेले कै. गो. गो. मुजुमदार उर्फ कवि साधुदास हे सांगलीचे आणि कै. वासुदेवशास्त्री खरे आणि कै. यशवंतराव खरे या इतिहास संशोधक पिता-पुत्रांची जोडी मिरजेची.

सांगलीपासून ६ मैल अंतरावर असलेल्या तुंग या गांवीं समर्थ रामदास यांनीं स्थापन केलेल्या अकरा मारुतीपैकीं एक मारुती येथें आहे. त्याचप्रमाणें समर्थशिष्या वेणुआक्का या मिरजेच्या. त्यांच्या नांवाचा मठ अद्यापहि मिरजेस आहे. मराठी दास पंचायतनापैकीं रंगनाथस्वामी निगडीकर आणि आनंदमूर्ति ब्रम्हनाळकर यांच्या समाध्या सांगलीपासून १२ मैल अंतरावर कृष्णा-वेरळा संगमावर ब्रम्हनाळ येथें आहेत. तसेंच श्रीगुरुचरित्रांत वर्णन केलेले दत्तावतार श्रीपादश्रीगुरुवल्लभ यांचें स्थान तासगांव तालुक्यांतील भिलवडीजवळ औदुंबर येथें कृष्णा नदीच्या काठीं आहे.

मिरज हें गांव संगीत कलेसाठीं फार प्रसिद्ध आहे. प्रसिद्ध संगीतज्ञ मरहूम अब्दुलकरीम खां हे मिरजेचे आणि अद्यापहि संगीत सेवेची तेथील परंपरा कायम राखली गेली आहे. तंतुवाद्यासाठीं मिरज हे भारतांत प्रसिद्ध असून ग्रामोद्योगम्हणून कारागीर मंडळीं वाद्यें तयार करतात. याशिवाय व्यायाम आणि मैदानी खेळ यासाठींहि मिरज प्रसिद्ध आहे. बलोपासना करणाऱ्या येथील कांहीं संस्थांनीं आपलें कार्य अखंडितपणें कितीतरी वर्षें चालविलें आहे.

मराठी लोककला, लोकनाटय या क्षेत्रांतहि या जिल्ह्याचा नांवलौकीक फार मोठा आहे. वाळवे तालुक्यांतील रेठरे हरणाक्ष येथील कै. पठ्ठे बापूराव कुलकर्णी व तासगांव तालुक्यांतील कै. तात्या सावळजकर, ख्यातनाम कलाकार याच भागांतील. याशिवाय रेठरे धरण, कामेरी, इस्लामपूर, काळमवाडी हीं वाळवे तालुक्यांतील; कुपवाड, कवलापूर, घाटनांद्रे हीं मिरज तालुक्यांतील; कवठे एकंद, तासगांव, वायफळे हीं तासगांव तालुक्यांतील आणि खानापूर तालुक्यांतील वडियेरायबाग ही गांवें लोकनाटयाच्या कलाकारांसाठीं आजहि प्रख्यात आहेत. मिरज तालुक्यांतील आरेवाडी या विभागतील आणि आटपाडी भागांतील धनगर समाजाचें "गजनृत्य" हा एक जुन्या लोककलेचा नमुना आहे.

रचना आणि शासनव्यवस्था

रचना

१ ऑगस्ट १९४९ रोजीं हा जिल्हा जेव्हां अस्तित्वांत आला त्यावेळीं त्यास दक्षिण सातारा हें नांव देण्यांत आलें होतें. आतां दि. २१ नोव्हेंबर १९६० पासून या जिल्ह्याला सांगली जिल्हा असें नांव देण्यांत आल्याचें महाराष्ट्र सरकारनें जाहीर केलें आहे.

या जिल्ह्यांत मिरज, जत, तासगांव, खानापूर, वाळवे असे पांच तालुके असून शिराळा महाल आहे. जुन्या सातारा जिल्ह्यांतील वाळवे, खानापूर व तासगांव हे तीन तालुके आणि शिराळा महाल या नव्या जिल्ह्यांत समाविष्ट करण्यांत आले आणि सांगली, मिरज – थोरली पाती, मिरज धाकटी पाती, जत, वाडी जहागीर या विलीन संस्थानांतील कांहीं गांवांचा यामध्यें समावेश करून मिरज व जत असे दोन तालुके बनविण्यांत आले. औंध संस्थानांतील आटपाडी भाग खानापूर तालुक्यांत समाविष्ट करण्यांत आला. या जिल्ह्यांत एकूण ५३४ गांवें आहेत. त्यांतील २५० गांवें विलीन संस्थानांतील आहेत. या जिल्ह्याची सरहद्द पूर्वेस विजापूरला, पश्चिमेस रत्नागिरीला, दक्षिणेस कोल्हापूर व बेळगांव या जिल्ह्यांना आणि उत्तरेस सातारा जिल्ह्याला भिडलेली आहे.

या जिल्ह्यांतील तालुकावार क्षेत्रफळ व लोकसंख्या पुढीलप्रमाणें आहे. लोकसंख्येचे आंकडे १९६१ च्या शिरगणती प्रमाणें घेतले आहेत.

क्षेत्रफळ व लोकसंख्या

	तालुका	क्षेत्रफळ चौ. मैल	लोकसंख्या
१.	मिरज	६११.४६	३,७२,८३९
२.	जत	८७३.७८	१,३८,८६१
३.	तासगांव	४४६.२४	२,०२,४६२
४.	खानापूर	८४६.५४	२,२३,३१०
५.	वाळवा	३००.४३	२,०२,३४१
६.	शिराळा	२४६.०२	८९,८२७
		३३२४.२०	१२,२९,६४०

वरील आंकड्यांवरून दिसून येईल कीं मिरज तालुक्याचें क्षेत्रफळ सर्वांत मोठें नसलें तरी लोकसंख्येंत त्याचा नंबर पहिला आहे. कारण या तालुक्यांतील पुष्कळ जमीन सुपीक असून दळणवळणाचीं साधनें बरींच आहेत. या तालुक्यांत मिरज व सांगली हीं दोन मोठीं शहरें आहेत. या

तालुक्याचा पूर्वभाग म्हणजे कवठेमहांकाळ भाग अविकसित आहे. जत व खानापूर हे तालुके क्षेत्रफळानें मोठे असले तरी त्यांच्यापेक्षां लहान क्षेत्र असलेल्या तालुक्यांपेक्षां त्यांची लोकसंख्या कमी आहे. कारण निकृष्ट जमिनीमुळें या तालुक्यांत अधिक वस्ती नाहीं. वाळवे तालुक्यांत भुसभुशीत काळी जमीन असल्यामुळें लोकवस्ती दाट आहे.

पाऊस पाणी

या जिल्ह्यांतून कृष्णा, वारणा, मोरणा, वेरळा, माणगंगा, नानी, अग्रणी आणि बारे या नद्या वाहतात. कृष्णा नदी ही सर्वांत मोठीं व महत्त्वाची नदी असून ती वाळवे, तासगांव व मिरज या तालुक्यांतून वाहात जाते. वारणा व मोरणा या नद्या अनुक्रमें वाळवा तालुका व शिराळा महाल यांतून वाहतात आणि आटपाडी भागांत माणगंगा, खानापुरमध्यें नानी, तासगांव, खानापूर व मिरज या तालुक्यांमध्यें अग्रणी आणि तासगांव व खानापूर तालुक्यांत वेरळा आणि जतमध्यें बोर अशा नद्या वाहतात. शिराळा भाग हा डोंगराळ असल्यामुळें तेथें सरासरीनें ३० ते ८० इंचापर्यंत पाऊस पडतो. वाळवा, तासगांव व खानापूर तालुक्यांत १८ ते २५ इंच पाऊस पडतो. मिरज तालुक्यांतील सांगली मिरज भागांत १५ ते २० इंचापर्यंत पडतो. पण कवठेमहांकाळ, जत व आटपाडी भागांत केवळ १० ते १५ इंचापर्यंत पाऊस होतो व तोहि अनिश्चित असतो. त्यामुळें हे भाग दुष्काळाच्या तावडींत सांपडण्याची शक्यता असते.

जंगलें

या जिल्ह्यांत राखीव जंगल फारसें नाहीं. जिल्ह्यांतील एकूण जंगल क्षेत्र ८८,८५८ एकर आहे. हें जंगल मुख्यत: शिराळा, तासगांव, खानापूर, वाळवे व जत तालुक्यामध्यें आहे. बहुतेक जंगल भाग हा डोंगराळ असून तेथील झाडांची वाढ खुंटलेली आहे. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या कार्यक्रमांत शास्त्रीय पद्धतीनें जंगलवाढीचा कार्यक्रम हातीं घेण्यांत आला आहे.

जमीन

या जिल्ह्यांतील जमीन काळी, तांबडी व पिंगट अशा तीन प्रकारांची आहे. मिरज, वाळवा, तासगांव या तालुक्यांतून खोल काळी जमीन आढळून येते. ही जमीन अतिशय सुपीक आहे. खानापूर, जत व कवठेमहांकाळ या भागांतील कांहीं जमीन अत्यंत निकृष्ट अशी माळरानाची असून त्यामध्यें केवळ बाजरीचें पीक निघतें. शिराळा महालांतील जमीन नदीकांठ सोडून दिला तर सामान्यपणें लाल मुरमाड आहे. कारण ती सह्याद्रि पर्वताच्या डोंगराळ भागांतील आहे. या जमिनीमध्यें सामान्य प्रतीचें भात पिकतें. इतर प्रकारची जिल्ह्यांत आढळून येणारी जमीन म्हणजे शिराळा महालांतील तांबडी जमीन, कृष्णा व वारणा नदीच्या किनाऱ्याची काळी जमीन, मिरज तालुक्यांतील व वाळवे तालुक्यांतील खोल व काळी जमीन व जत आणि खानापूर तालुक्यांतील मुरमाड जमीन.

जमिनीची वर्गवारी पुढीलप्रमाणें देतां येईल :

		एकर			एकर
१.	जंगल	१,१५,७१२	२.	ओसाड व नापीक जमीन	९४,४५१
३.	पिकावू पडित जमीन	१५,८१७	४.	कायम गवताळ व इतर चराऊ रान	६७,८२१

५. चालू पडित जमीन	२०,०४९	६. इतर पडित जमीन	२,११,१२४
७. पिकाखालील क्षेत्र	१६,४९,३८५	८. दोन पिकें देणारी जमीन	४७,८१०

शासन व्यवस्था

जिल्ह्याचें ठिकाण सांगली हें असून जिल्हा पातळीवरील सर्व अधिकाऱ्यांच्या कचेऱ्या सांगली येथेंच आहेत. जिल्ह्यांतील महसूल व सर्व साधारण राज्यकारभाराचें प्रमुख अधिकारी म्हणून कलेक्टर व डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेट काम पाहातात. त्यांची कचेरी सांगली येथें आहे. जिल्ह्याचें न्यायालयहि सांगली येथेंच आहे. राज्यकारभाराच्या सोयीच्या दृष्टीनें जिल्ह्याचे सहा विभाग करण्यांत आले आहेत.

तालुके	तालुक्याचें ठिकाण	तालुक्यांतील गांवें
१. मिरज	मिरज	९४
२. जत	जत	९७
३. तासगांव	तासगांव	७४
४. खानापूर	विटा	१३१
५. वाळवा	इस्लामपूर	५७
६. शिराळा महाल	शिराळा	८१
		५३४

शासकीय अर्थव्यवहार

राज्यकारभारविषयक बाबींतील पैशाचाव्यवहार सांगली येथें असलेल्या जिल्हा सरकारी ट्रेझरींतून होत असला तरी तालुक्यांतील लोकांची सोय व्हावी म्हणून सर्व तालुक्यांतील सब्ट्रेझरींतून पैशाच्या व्यवहाराचें काम चालू असतें. सरकारकडून जिल्ह्याला आलेला पैसा व जनतेकडून जमा व्हावयाचा पैसा असे दुहेरी काम या सर्व ट्रेझरींतून होत असते. जिल्ह्यांत एकूण मिरज, जत, तासगांव, विटा, इस्लामपूर व शिराळा येथें सब्-ट्रेझरी असून त्या जिल्हा ट्रेझरीच्या कक्षेंत असतात. यापैकीं सांगली येथील ट्रेझरींत बँकिंग व्यवहार असून इतर सर्व नॉन बँकिंग आहेत.

न्यायदानाची व्यवस्था

जिल्ह्यांतील जनतेचीं जमीन महसुलाची गाऱ्हाणी, तक्रारी आणि गुन्हेगारीचें परिमार्जन त्वरित व्हावे म्हणून तालुका पातळीवर न्यायदानाची व्यवस्था करण्यांत आली आहे. न्यायदानाच्या व्यवस्थेचे दोन विभाग असून महसूल न्यायालयाचे जिल्हाधिकारी हे जिल्ह्याचे प्रमुख न्यायाधीश व दिवाणी फौजदारी न्यायालयाचे जिल्हा न्यायाधिश हे प्रमुख आहेत. न्यायदानाचें काम त्वरित व्हावें म्हणून तालुका पातळीवर न्यायालयाचे अधिकारी नेमण्यांत आलेले आहेत.

महसूल न्यायालयें

या जिल्ह्यांतील सर्व तालुके व महालांच्या ठिकाणीं मिळून एकण ६ न्यायालयें असून तालुक्याचे मामलेदार अथवा महालकरी हे या न्यायालयाचे प्रमुख असून त्यांचेकडे जमीन विषयक तंटे, कूळ कायदा व किरकोळ मतभेद व तंटे या बाबतचे खटले चालविण्यांत येतात. या न्यायालयांत लागलेल्या निर्णयांमुळें समाधान न झाल्यास जिल्ह्यांतील मिरज व सांगली येथील प्रांत ऑफिसरांचे न्यायालयांत निकाल लावून घेतां येतो व त्यापुढेंहि जिल्हाधिकाऱ्यांपर्यंत दाद मागतां येते.

जिल्हा न्यायालय हें जिल्ह्यांतील प्रमुख न्यायालय होय. जिल्हा न्यायाधीश हे या जिल्ह्यांतील सर्वांत वरिष्ठ न्यायाधिकारी असून ते जिल्हा न्यायालयाचे प्रमुख असतात. जिल्हा न्यायखात्याचे प्रमूखहि तेच होत. त्यांची नेमणूक राज्य उच्च न्यायालयाच्या (हायकोर्ट) सल्ल्यानुसार महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल करतात.

जिल्हा न्यायालय

जिल्हा न्यायालय हें जिल्ह्यांतील दिवाणी न्यायालय होय. तें रुपये १०,००० चे आंत किंमत असलेल्या दिवाणी मुकदम्याबाबतचे पुर्ननिर्णय देणारे (अॅपलेट) न्यायालयहि आहे. या मर्यादेपुढील किंमतीच्या मुकदम्यावरील पुर्ननिर्णय राज्यांतील उच्च न्यायालयाकडून होतो.

दिवाणी व फौजदारी न्यायालय

जिल्हा न्यायाधिशाच्या मदतीस कामाच्या विस्तारानुसार एक अगर अधिक मदतनीस न्यायाधिशांची (असिस्टंट जजेस) नेमणूक केली जाते. हल्ली सांगली येथें दोन न्यायाधीश काम करीत आहेत.

जिल्हा न्यायालय हें ज्याप्रमाणें दिवाणी कामांत जिल्ह्यांतील वरिष्ठ न्यायालय आहे त्याच प्रमाणें ते फौजदारी कामांबाबतहि आहे. फौजदारी कामकाजाच्या दृष्टीनें जिल्हा न्यायालय हें "सेशन्स न्यायालय" म्हणून व जिल्हा न्यायाधीश हे "सेशन्स न्यायाधीश" म्हणून ओळखले जातात. जिल्ह्यांतील फौजदारी कामें पाहाणाऱ्या न्यायाधिशांनीं (मॅजिस्ट्रेटस्) 'सेशन कमिट' केलेलें कज्जे येथें चालतात. त्याच प्रमाणें जिल्ह्यांतील न्यायालयांच्या फौजदारी निकालावरील फेर निर्णयाची (अपील्स) कामेंहि येथेंच चालतात. जिल्हा न्यायाधिशास, राज्य वरिष्ठ न्यायालयाच्या मंजुरीस पात्र राहून फांशीची शिक्षा (कॅपिटल पनिशमेंट) देण्या पर्यंतचें सर्व अधिकार असतात.

कामकाजाच्या व जनतेच्य सोयीनुसार जिल्ह्यांत तालुकानिहाय आणि इतरत्रहि दिवाणी व फौजदारी न्यायालयें काम करीत असतात. त्यांचीं अधिकारक्षेत्रें व अधिकार मर्यादित असतात. दिवाणी न्यायालयांत वरिष्ठ विभागीय (सिनिअर डिव्हिजन) व कनिष्ठ विभागीय (ज्युनिअर डिव्हिजन) असे दोन भेद आहेत. जिल्ह्यामध्यें प्रायः एकच वरिष्ठ विभागीय न्यायालय असतें. या जिल्ह्यांत असें न्यायालय सांगली येथें आहे व त्याचें अधिकारक्षेत्र सर्व जिल्हाव्यापी आहे. या न्यायालयांत विशिष्ट किंमतीवरील दाव्यांचा विषय असलेले मुकदमें चालतात. त्यांना खास मुकदमें (स्पेशल सूटस्) म्हणतात.

जिल्ह्यांतील कनिष्ठ न्यायालयें

कनिष्ठ विभागीय न्यायालयें जिल्ह्यांत सांगली, मिरज, जत, तासगांव, विटें आणि इस्लामपूर या ठिकाणीं आहेत. या न्यायालयांतून दिवाणी व फौजदारी अशा दोन्हीं प्रकारचे खटले चालतात. कामाच्या विस्तारानुसार वरीलपैकीं जत खेरीज करून इतरत्र साहाय्यक न्यायाधिशांची न्यायालयें आहेत. जत येथील न्यायालयांत काम कमी असल्यामुळें तेथें स्वतंत्र न्यायाधिशाची नेमणूक नसून मिरज येथील साहाय्यक न्यायाधिशच दरमहा तारीख ९ ते १६ व पुन्हां तारीख २६ ते महिना अखेर-पावेतों, जत येथें कामकाज पाहतात.

तसेंच विटा व इस्लामपूर यथील न्यायाधीश अनुक्रमें आटपाडी व शिराळा येथें दर महिन्याच्या दुसऱ्या व चौथ्या आठवड्यांत प्रत्येक वेळीं दोन दिवस याप्रमाणें फक्त फौजदारी कामें पाहतात.

जिल्ह्यांतील सर्व कनिष्ठ न्यायालयें आपापल्या अधिकार क्षेत्रांत कायद्यानुसार, त्यांना असलेल्या अधिकारानुसार दिवाणी व फौजदारी कामें पाहतात. त्यांच्या निकालावरील पुर्नानिर्णयाचीं कामें जिल्हा न्यायालयांत चालतात आणि जिल्हा न्यायालयाच्या निकालांवर राज्याच्या उच्च न्यायालयाकडे पुर्नानिर्णयास्तव जातां येतें.

या सर्व कनिष्ठ न्यायालयांवर जिल्हा न्यायाधिशांची देखरेख व ताबा असतो. कामकाज वेळच्या वेळीं चालून जनतेला विनाविलंब न्याय मिळावा या दृष्टीनेंच न्यायालयीन कामाची व त्यावरील देखरेखीची व्यवस्था राज्य उच्च न्यायालयाकडून आणि जिल्हा न्यायालयांकडून ठेवली जाते.

या शिवाय जनतेच्या किरकोळ तक्रारी व भांडणें जागच्या जागीं मिटावींत या हेतूनें जिल्ह्यांतील कांहीं खेड्यांतून "न्याय पंचायती" स्थापन झाल्या असून न्यायदानाच्या कामीं जनतेचे अधिकाधिक साहाय्य व सहकार्य मिळविण्याकरितां प्रयत्न करण्यांत येत आहेत.

पोलीस यंत्रणा

समाज जीवनाची व्यवस्था सुरक्षित राहून वैयक्तिक स्वातंत्र्य अबाधित राहावे यासाठीं सरकारनें जे कायदे केले आहेत त्यांचें परिपालन करण्यासाठीं या जिल्ह्यांत ११०४ पोलीस ग्रामीण भागाच्या पातळीपर्यंत सेवा करीत आहेत. सांगली येथें जिल्हा पोलीस प्रमुखाची कचेरी असून जिल्ह्यांतील पोलीस कार्यासंबंधीं तिच्याकडून मार्गदर्शन करण्यांत येते. तालुका पातळीवर पोलीस ठाणीं ठेवण्यांत आलीं असून तेथें एक पोलीस सब्-इन्स्पेक्टर व त्याला मदतनीस पोलीस ठेवण्यांत आले आहेत. या जिल्ह्याच्या पोलीस खात्याचें मार्गदर्शन व तपासणी करण्याकरितां दोन भाग पाडले आहेत. एका भागाच्या अधिकाऱ्यांची मुख्य कचेरी मिरज येथें असून त्याच्या देखरेखीखाली सहा पोलीस ठाणीं ठेवलीं आहेत. तसेंच त्यांच्या कामांत मदत देण्यास एक इन्स्पेक्टर असून त्यांची कचेरी मिरज येथेंच आहे. मिरज विभागांत सांगली, मिरज, बुधगांव, कवठेमहांकाळ, जत व उमदी या पोलीस ठाण्यांचा समावेश आहे.

ग्रामीण भागांत जनतेच्या संरक्षणाकडे व सुव्यवस्थेकडे पाहण्याची अधिक गरज असल्यामुळें जिल्ह्यांत खेड्यांचा गट करून त्याच्या मध्यवर्ती ठिकाणीं पोलीस औटपोस्टस् आहेत. त्यांत एक हेड कॉन्स्टेबल व एक मदतनीस पोलीस असतो. मिरज विभागांत कुपवाड. माधवनगर, मालगांव, डिग्रज, ढालगांव, सलगरे, डफळापूर, मुचंडी, संख व माडग्याळ हीं औटपोस्टस् आहेत.

दुसऱ्या विभागाच्या अधिकाऱ्यांची कचेरी इस्लामपूर येथें आहे. त्यांच्या मदतीस असलेल्या पोलीस इन्स्पेक्टरची कचेरी विटा येथें आहे. या विभागांत इस्लामपूर, अष्टा, शिराळा, कुरळप, विटा, कडेगांव, आटपाडी, तासगांव व कुंडल या पोलीस स्टेशनांचा समावेश आहे.

त्याचप्रमाणें या विभागांत कासेगांव, भवानीनगर, बिळाशी, चरण, खानापूर, देवराष्ट्रे, दिघंची, करगणी, खरसुंडी, सावळज, मांजर्डे, भिलवडी व किर्लोस्करवाडी या ठिकाणीं औटपोस्टस् आहेत.

सांगली येथें एक हत्यारी रिझर्व फोर्स ठेवला आहे. त्याचा उपयोग प्रसंगोपात केला जातो. येथें सुमारे ३०० हत्यारी पोलीस असून त्यांच्यावर एक रिझर्व पोलीस सब्-इन्स्पेक्टर आहे.

होमगार्ड संघटना

पोलीस खात्यास मदत व्हावी या दृष्टीनें जिल्ह्याच्या ठिकाणीं जिल्हा होमगार्ड कमांडंट यांच्या नियंत्रणाखालीं जिल्हा होमगार्ड संघटना सांगली येथें जानेवारी १९४९ सालीं स्थापन करण्यांत आली. सध्या या संघटनेंत एकूण ७८३ होमगार्डस् काम करीत आहेत. त्यांपैकीं पुरुष होमगार्डस् ७४८ व स्त्री होमगार्डस् ३५ आहेत. कामाच्या सोयीच्या दृष्टीनें जिल्हा होमगार्ड कमांडंट यांच्या मदतीस जिल्हा स्टाफ ऑफिसर्स म्हणून ९ लोकांची नियुक्ती केलेली आहे.

जिल्हा संघटनेच्या नेतृत्वाखालीं आणी तालुक्यांच्या ठिकाणीं ९ उप-संघटना स्थापन केलेल्या आहेत. त्या पुढीलप्रमाणें:— मिरज, जत, सांगली, बुधगांव, तासगांव, विटा, आटपाडी, आष्टे व इस्लामपूर. आणखी एक संघटना कवठेमहांकाळ येथें नियोजित आहे. प्रत्येक होमगार्ड संघटनेवर एक तालुका होमगार्ड कमांडंट या अधिकाऱ्याची नियुक्ती केलेली आहे.

दरवर्षी निरनिराळी शैक्षणिक शिबिरें घेऊन होमगार्डसना शिक्षण देण्याची व्यवस्था केलेली असते. या योजनेनुसार आतापर्यंत या जिल्ह्यांत रेस्क्यु, फायर फायटिंग, फर्स्ट एड, स्पेशल ट्रेनिंग व कायदे आदींचें १५० च्या वर होमगार्डस्ना शिक्षण देण्यांत आलें आहे. त्याचप्रमाणें मोटर ड्रायव्हिंगचेंहि शिक्षण त्यांना दिलें जात आहे. अशा प्रकारची शिक्षणाची व्यवस्था सेंट्रल ट्रेनिंग स्कूल, महाराष्ट्र राज्य, मुंबई येथें आहे.

पोलीस खात्याप्रमाणेंच दारूबंदी, जुगार, दरोडे, खून, मारामाऱ्या, बेकायदा हत्यारें वापरणें, लांचलुचपत वगैरे गुन्हे शोधून काढण्याच्या कामीं होमगार्डस् पुढाकार घेऊन पोलीसांना मदत करतात. फरारी आरोपी पकडण्यास सुद्धां होमगार्डस्ची मदत घेतली जाते.

या जिल्ह्यांतील गुन्हेगारीला आळा बसावा म्हणून या जिल्ह्यांत एक होमगार्ड डिटेक्टिव्ह ब्रँच १९५७ पासून सुरू करण्यांत आली आहे.

ही संघटना सार्वजनिक कामांतहि भाग घेते. श्रमदान, वनमहोत्सव, अस्पृश्यता निवारण, दारूबंदी व विकासाचीं कामें यांतहि या जिल्हा संघटनेनें प्रशंसनीय कार्य केलें आहे. त्याचप्रमाणें पूर, आग, विहिरींत पडलेल्यांना मदत या सारख्या संकटांच्या वेळींहि मदत केली आहे. प्रौढ शिक्षणाचे वर्गहि कांहीं ठिकाणीं या संघटनेमार्फत चालवून समाज शिक्षणाचें कार्य होमगार्डसकरवीं केले जात आहे.

राज्यांत होणाऱ्या निवडणुकींच्या वेळी बंदोबस्त राखणें, यात्रेंत बदोबस्त ठेवणें, शहरीं भागांत वाहतुकीवर नियंत्रण ठेवणें, सार्वजनिक कार्यक्रमाच्या वेळीं बंदोबस्त ठेवणें याकरितां सुद्धां

होमगार्डांची मदत घेतली जाते. कांहीं दिवसापूर्वी झालेल्या मध्यवर्ती सरकारच्या नोकरांच्या संपाच्या वेळीं या संघटनेनें विशेष काम करून सरकारी यंत्रणा चालू ठेवण्यास मदत केली आहे. या जिल्ह्यांत झालेल्या दोन नेत्रदान शिबिरांच्या वेळींहि रोग्यांची सेवा या संघटनेनें केली आहे.

टपाल, तार व टेलिफोन व्यवस्था

सांगली जिल्ह्याचे कामाच्या सोयीसाठीं सहा तालुके पाडलेले असून या सर्व भागांतील जनतेचा जिल्ह्याबाहेरील लोकांशीं संबंध टपाल व तार खात्यामार्फत येतो. या जिल्ह्यांतील सर्व सब् पोस्ट ऑफिसेस आणि ब्रँच पोस्ट ऑफिसेस हीं कोल्हापूर येथील मुख्य कचेरीच्या देखरेखीखाली चाललेलीं आहेत.

जिल्ह्यामध्यें एकंदर २६ सब् पोस्ट ऑफिसेस असून त्यांच्या कक्षेंत एकूण १९३ ब्रँच पोस्ट ऑफिसेस चालू आहेत. या जिल्ह्यांत १७ सब पोस्ट ऑफिसमधून तारा करण्याची सोय केलेली आहे. या सर्व पोस्टांतून नागरी लिपींतील तारा सकाळीं ८ ते सायंकाळी ६ पर्यंत स्वीकारल्या जातात. त्याचप्रमाणें जिल्ह्यांत टेलिफोनची स्वतंत्र केंद्रें सांगली व मिरज येथें असून विटा, आष्टा, जत, इस्लामपूर, तासगांव, माधवनगर व शिराळा या ठिकाणीं तेथील पोस्ट कचेऱ्यांमधून पब्लीक कॉल ऑफिसेसहि सुरूं करण्यांत आलीं आहेत. फोन आलेल्या व्यक्तींना निरोप पाठविण्याचीहि सोय सदर पोस्टांतून करण्यांत आली आहे.

शेतीविकास

विशिष्ट प्रकारच्या नैसर्गिक व भौगोलिक परिस्थितीमुळें जिल्ह्यांतील जमिनीची विभागणी चार प्रकारांत करतां येते.

१. काळचा भारी जमिनी, २. मध्यम मगदुराच्या जमिनी, ३. हलक्या मुरमाड जमिनी व ४. जांभा दगडापासून तयार झालेल्या तांबडचा जमिनी.

या जिल्ह्याचें एकूण क्षेत्रफळ ३४३४ चौरस मैल असून त्याचें स्वरूप पुढीलप्रमाणें आहे.

पिकाखालील एकूण क्षेत्र : खरीप –– १३ लाख एकर.
रब्बी –– ३ लाख एकर.
एकूण पडिक जमिनीचें क्षेत्र –– ४ लाख एकर.
जंगलाचा भाग –– १२ लाख एकर.


निरनिराळचा प्रमुख पिकांखालील क्षेत्र खालीलप्रमाणें आहे.

पिकांखालील क्षेत्र

		एकर (आंकडे हजारांत)			एकर (आंकडे हजारांत)
खरीप	भात	२७	खरीप	ज्वारी	३७३
	बाजरी	३४२	खरीप	मका	५
रब्बी	ज्वारी	२३४	रब्बी	गहूं	३५
	तूर	४४		हरभरा	४४
	मटकी	६१		उडीद	१५
	करडई	१८		भइमूग	२०२
	कापूस	१७		तीळ	७
	मिरची	१२		तंबाखू	१८
	ऊंस	११		हळद	९

जिल्ह्यांतील सुमारें ७० टक्के लोकांचें शेती हेंच उपजिविकेचें साधन आहे. शेतकऱ्यांचें अज्ञान दूर होऊन त्यांना आधुनिक पद्धतीनें शेतीसुधारणा करून जमिनींत जास्तीत जास्त उत्पादन कसें काढतां येईल याचा सल्ला देणें, प्रात्यक्षिकाद्वारें मार्गदर्शन करणें, सुधारलेलीं अवजारें, सुधारलेलें बी-बियाणें, खतें आदींचा पुरवठा करणें आदि कामें जिल्ह्यांतील शेतकी विभागामार्फत केलीं जातात. जिल्हा शेतकी अधिकाऱ्यास एक दुय्यम शेतकी अधिकारी म्हणून जिल्ह्याचें ठिकाणीं मदतनीस आहे.

शेतीविकास



● बी-बियाणें उत्पादन केन्द्रें
▲ शेती प्रात्यक्षिक केन्द्रें
+ शेतकी शाळा

सद्य परिस्थितींत जिल्ह्यांतील शेती प्रचार आणि बी-बियाणें व खतें यांचें वांटप निरनिराळ्या गटांतील शेती अधिकारी व ग्रामसेवक यांच्यामार्फत केलें जातें. तांत्रिक सल्ला जिल्हा शेतकी विभाग यांच्यामार्फत दिला जातो.

तासगांव तालुक्यांत ज्वारी पायलट योजनेखालीं सुमारें ५,००० एकर क्षेत्र आहे. शिराळा पेट्यांत भात पायलट योजना सुरू करण्यांत आलेली असून या कामाकरितां एक शेती अधिकारी आणि एक शेती मदतनीस आहे. कापसाचेंहि क्षेत्र या जिल्ह्यांत बरेंच असल्यामुळें लांब धाग्याच्या कापूस विस्तार योजनेकरितां खास शेती मदतनीस आहे.

शेतीसंशोधन

या जिल्ह्यांतील पिकांचें संशोधन करून सुधारलेल्या बी-बियाण्यांच्या जाती निर्माण करण्याचें कार्य शेती संशोधन केंद्रांतून चालतें. या जिल्ह्यांतील प्रमुख पीक ज्वारी असल्यामुळें प्रामुख्यानें ज्वारीचें पिकासंबंधी संशोधन होत असतें. अशा प्रकारचें एक संशोधन केंद्र मिरज तालुक्यांतील कसबे डिग्रज येथें १९५८ सालीं सुरू करण्यांत आलें. येथें भुईमुगासंबंधीहि संशोधन केलें जातें.

बी-बियाण उत्पादन केंद्र

आधुनिक संशोधनानें शेतीउत्पादनांत वाढ होतें असें प्रयोगानें सिद्ध झालें आहे. सर्वसामान्य शेतकऱ्यास सुधारलेलीं बी-बियाणी सहजरित्या उपलब्ध करून देण्याकरितां सर्व तालक्यांतून बी-बियाणीं उत्पादन केंद्रें या जिल्ह्यांत सुरू करण्यांत आलीं आहेत. तासगांव तालुक्यांतील तासगांव केंद्रांची ६४ एकर ३७ गुंठे, जत केंद्रांची ४६ एकर ३० गुंठे, मिरज तालुक्यांतील कुपवाड केंद्राची ५० एकर १९ गुंठे, डिग्रज ५० एकर, शिराळा महालांतील बेवूर केंद्राची ९६ एकर २ गुंठे, अशा एकूण ५ उत्पादन केंद्राखालीं ३०८ एकर ८ गुंठे जमीन आहे. सदर क्षेत्र कुपवाड येथें ५२ एकर २३ गुंठे व तासगांव येथें ४६ एकर २६ गुंठे मढविण्यांत येणार आहे. या केंद्रांतून सुधारलेल्या बी-बियाणांचा पुरवठा १९५८-५९ सालापासून जिल्ह्यांतील शेतकऱ्यांना केला जात आहे. अशाच प्रकारची आणखी २ केंद्रें वाळवा तालुक्यांतील पेठ आणि विटा तालुक्यांतील विटे येथें व्हावयाची आहेत व त्यांचें क्षेत्र अनुक्रमें ६७ एकर १० गुंठे व ५१ एकर ३६ गुंठे राहील. प्रत्येक केंद्रावर एक शेतकी सुपरवायझर नेमलेला आहे. या सर्व केंद्रांवर देखरेख करण्याचें काम जिल्हा शेतकी अधिकारी करतात.

फलोत्पादन विकास योजना

जिल्ह्याच्या हवामानास मानवणारे कलमी आंबे, चिक्कू, पेरु आदि फळझाडांची लागवड सुधारावी आणि जिल्ह्यांतील फलोत्पादन वाढण्यास प्रोत्साहन मिळावें म्हणून फलोत्पादन विकास अधिकारी, पुणें यांच्या मार्फत या जिल्ह्यांत एक शेतकी अधिकारी व २ माळी यांची नेमणूक करण्यांत आली आहे. त्यांच्या मार्फत आवश्यक ती तांत्रिक माहिती शेतकऱ्यांना देऊन मार्गदर्शन करण्यांत येतें. तसेंच एकरामागें फळबागांच्या लागवडीसाठीं शेतकऱ्यांना ३०० रु. पर्यंत कर्जहि देण्यांत येतें.

शेतीचें उत्पादन वाढविण्यासाठीं ज्याप्रमाणें उत्तम बी-बियाण्यांची आवश्यकता असते, त्याचप्रमाणें पिकांची योग्य वाढ होण्यासाठीं विविध प्रकारच्या खतांचीहि आवश्यकता असतें. शेतकी खात्यानें प्रात्यक्षिकांद्वारें व शेतकी मदतनीसामार्फत खेडोपाडीं प्रचार करून शेतकऱ्यांना खतांचें महत्त्व पटवून दिलें आहे. कंपोस्ट खत जास्तीत जास्त तयार करणाऱ्या गांवाला "रुस्तुमजी अर्देशीर नारियलवाला" चॅलेंज ढाल ठेवली असून सन १९५९-६० सालांत जत तालुक्यांतील सिंदूर ग्रामस्थ मंडळींनीं सर्वांत जास्त म्हणजे ५०१ कंपोस्ट खड्डे खोदून भरले व सदर ढाल जिंकली. याचप्रमाणें शेणखत, सोनखत, आदि ग्रामीण खतें तयार करून त्यांचा उपयोग शेतकरी वर्ग करूं लागला आहे. तसेंच अमोनियम सल्फेट, अमोनियम सल्फेट नायट्रेट, युरिया, सुपर फॉस्फेट आदि रासायनिक खतेंहि शेतकी खात्यामार्फत शेतकऱ्यांना पुरविली जातात.

खतांचा पुरवठा

निरनिराळ्या पिकांवर पडणारे रोग व किडींची पाहाणी करून त्यांचा नायनाट करण्यासाठीं शेतकी खात्यामार्फत शेतकऱ्यांना सवलतीच्या दरांत कीटक-नाशकें देण्यांत येतात व तीं कीटक-नाशकें पिकांवर फवारण्यासाठीं डस्ट व स्प्रेपंप वगैरे साधनें सवलतीच्या दरांत पुरविली जातात. या जिल्ह्यांत खरीप ज्वारीवरील बिनपंखी गवती टोळ ही कीड फारच गंभीर स्वरूपाची असल्यानें त्यांचा नाश करण्याची मोहीम हातीं घेण्यांत आली आहे. १९५९-६० सालीं जवळ जवळ १५,६०३ एकर क्षेत्रावर ९५,५५६ रु. किंमतीचें कीटक-नाशकांचा (आलट्रेक्स ३० सी. सी.) विमानांतून फवारा मारण्यांत आला व परिणामीं या भागांत ६०-६१ सालीं टोळांचा (बिनपंखी) उपद्रव फारच कमीं प्रमाणांत झाला. त्याच प्रमाणें १९६०-६१ सालींहि विमानानें कीटक-नाशकें फवारण्यांत आली आहेत.

रोग निवारण व पीक संरक्षण

आधुनिक पद्धतीच्या शेतीची माहिती शेतकऱ्यांना प्रात्यक्षिकाद्वारें करून देण्यासाठीं जिल्ह्यांत ठिकठिकाणीं प्रात्यक्षिक केंद्रें सुरूं करण्यांत आलीं असून तीं मिरज तालुक्यांत १८, खानापूर तालुक्यांत १२, तासगांव तालुक्यांत ३, जत तालुक्यांत ४, अशीं एकूण ३७ केंद्रें आहेत. चालू वर्षीं नवीन केंद्रें सुरूं करण्यासाठीं योजना आंखली आहे. वाळवा तालुका ८, खानापूर तालका २, याप्रमाणें नवीन केंद्रें सुरूं करण्यांत येणार आहेत.

प्रात्यक्षिक केंद्रें

सरकारी संशोधन केंद्रांद्वारें संशोधित केलेल्या शेतीच्या सुधारलेल्या पद्धती शेतकऱ्यांपर्यंत पोहोंचविण्याचें काम सुलभ हावें व सरकारी यंत्रणा व सामान्य शेतकरी यांच्यांतील दुवा सांधता यावा याकरितां शेतकरी संघटना स्थापन करण्यांत आल्या आहेत. या संघटनेमार्फत खतें व कीटक-नाशकें यांचाहि पुरवठा शेतकऱ्यांना करण्यांत येतो. जिल्ह्यांत एकंदर ५२९ खेडीं असून ४८३ शेतकरी संघांची स्थापना झालेली आहे व एकूण १२,७४७ शेतकरी सदर संघटनेचे सभासद आहेत.

शेतकरी संघ

राज्य शेतकी खात्याच्या सूचनेप्रमाणें शेतीच्या सुधारलेल्या पद्धतींचा शेतकऱ्यांनीं मोठ्या प्रमाणांत अवलंब करावा म्हणून कांहीं प्रमुख खरीप-रब्बी पिकांकरितां संघटित स्वरूपाचे प्रयत्न कर-

ण्याचे हेतूनें ही मोहीम हातीं घेण्यांत आली आहे. याकरितां सांगली येथें एक शेतकी अधिकारी, जिल्हा शेतकी अधिकारी यांना मदतनीस आहे. या मोहिमेकरितां निरनिराळ्या पिकांसाठीं दिलेलें लक्ष्य व त्यांत आलेलें यश खालील प्रमाणें आहे.

खरीप व रब्बी मोहीम

खरीप मोहीम

		लक्ष्य एकर	आलेलें यश
१.	भात	१०,५००	८,८८१
२.	खरीप ज्वारी	२५,०००	२०,३४४
३.	बाजरी	४८,०००	२९,८३३
४.	भुईमूग	१२,०००	१३,८६५
५.	कापूस (बा.)	५,०६३	३,१५३

रब्बी मोहीम

		लक्ष्य एकर	आलेलें यश
१.	र. ज्वारी	२५,०००	
२.	गहूं	१,५००	२,६६१
३.	कापूस जिराइत	१४,२५४	. .

पीकस्पर्धा व प्रदर्शने

नवीन सुधारलेल्या शेतीपद्धतींचा शेतकऱ्यांनीं अधिकाधिक अवलंब करून शेतीचें उत्पादन वाढण्यास मदत व्हावी म्हणून गांव, तालुका (ब्लॉक) व जिल्हा पातळीवर शेतकी खात्यामार्फत पीक-स्पर्धा ठेवण्यांत येतात. जास्तींत जास्त धान्य पिकविणाऱ्या शेतकऱ्यांना बक्षिसें देण्यांत येतात व त्यांचा गौरव करण्यांत येतो. या जिल्ह्यांतील शेतकऱ्यांनीं राज्यपातळीवरील पीकस्पर्धेंतहि भाग घेतला आहे. प्रत्येक वर्षी यात्रेच्या अगर प्रमुख ठिकाणीं शेती माल व गुरांचें प्रदर्शन विकास मंडळातर्फे भरविण्यांत येतें. अशा प्रदर्शनांतून आधुनिक शेतीपद्धतीचे नमुने, अवजारें, सुधारलेलीं बी-बियाणीं, जनावरें आदि ठेवण्यांत येत असून त्याबद्दलची संपूर्ण माहिती शेतकऱ्यांना देण्यांत येते. अशा प्रकारचें एक प्रदर्शन दरवर्षी सांगली येथें भरविलें जातें. त्यावेळीं शेतकऱ्यांचा मेळावाहि भरविण्यांत येतो. यावेळीं घेण्यांत येणाऱ्या चढाओढींत उत्कृष्ट ठरलेल्या शेतमालास व जनावरांस बक्षिसें देण्यांत येतात. त्याच प्रमाणें जिल्ह्यांत भाजीपाला-फुलें-फळें यांचें उत्पादन अधिक व्हावे म्हणून प्रत्येक वर्षी सांगली येथें जिल्हा भाजीपाला, फळें व फुलांचें प्रदर्शन भरविलें जातें. याशिवाय जमीन सम पातळींत आणणे, बांध घालणें, यासाठीं बुलडोझर योजना जिल्ह्यांत चालू आहे. तसेंच नवीन विहिरी खोदून शेतीस पाणीपुरवठा वाढविण्यासाठीं बोरिंग, ब्लास्टिंग वगैरे योजना लागू केल्या आहेत.

शेतकी शिक्षण

सांगली जिल्ह्यांतील शेतकऱ्यांच्या मुलांना सुधारलेल्या पद्धतीच्या शेतीसंबंधी माहिती देण्याच्या उद्देशानें दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या कार्यक्रमानुसार सांगली-इस्लामपूर रस्त्यावर सांगली-पासून चार मैलांवर डिग्रज येथें १ ऑगस्ट १९५८ रोजीं शेतकी शाळेची स्थापना करण्यांत आली. या शाळेची नवी इमारत अद्यावत् पद्धतीची असून या इमारतींत १ ऑगस्ट १९५९ पासून शाळेच्या कामाला सुरवात झाली आहे. शाळेचा शिक्षणक्रम दोन वर्षाचा असून दर १ जूनला ५० विद्यार्थ्यांना

शाळेंत प्रवेश मिळतो. यांपैकीं शेंकडा १० जागा मागासलेल्या विद्यार्थ्यांसाठीं व वन्य जमातींतील विद्यार्थ्यांसाठीं राखून ठेवल्या आहेत. शाळेंत प्रवेश मिळवूं इच्छिणारा विद्यार्थी हा कमित कमी मराठी प्रवेश परीक्षा किंवा एस्. एस्. सी. परीक्षा उत्तीर्ण झालेला असावा लागतो. शेतीविषय घेऊन जर एखादा विद्यार्थी एस्. एस्. सी. परीक्षा उत्तीर्ण झालेला असेल तर त्याला एकदम दुसऱ्या वर्षाच्या वर्गांत प्रवेश मिळतो. प्रवेश घेऊं इच्छिणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्याला स्वतःच्या मालकीची जमीन असावी लागते. मात्र मागासलेल्या व इतर वन्य जमातींच्या विद्यार्थ्यांना ही अट लागू नाहीं.

निवड झालेल्या विद्यार्थ्याला दरमहा २० रुपये विद्यावेतन मिळतें. विद्यार्थ्याला शाळेमार्फत वर्षाला दोन खाकी खादी गणवेश दिले जातात. विद्यार्थ्यांची राहाण्याची सोय शाळेच्या आवारांत बांधलेल्या वसतिगृहांत केली आहे. मागासलेल्या व वन्य जमातींतील विद्यार्थ्यांना दरमहा २५रु. प्रमाणें विद्यावेतन मिळते व दहा महिन्याचा जेवणाचा खर्च सरकारमार्फत मिळतो. प्रथम व द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांना खालील प्रमाणें विषय शिकविले जातात.

प्रथम वर्ष : १ शेतीशास्त्र व जनावरांची जोपासना, २ बागबगीचा, ३. सहकार्य, मालविक्री व शेती-विषयक कायदे, ४. नागरिक शास्त्र, ५. ग्रामोद्योग, ६ हिन्दी.

द्वितीय वर्ष : १. शेतीशास्त्र व जनावरांची जोपासना, २. सहकार्य, मालविक्री व शेतीविषयक कायदे, खेड्यांचा कारभार, मुलकी बाब व जमीन महसूल, ४ शेती विषयक प्रचार कार्य व जंगल शास्त्र, ५. ग्रामोद्योग, ६. सार्वजनिक आरोग्य.

शाळेची एकंदर १२० एकर जमीन असून त्यांत हंगामानुसार गहूं, भुईमूग, ज्वारी, मका, साळ, कापूस, तंबाखू, कडधान्यें इत्यादि पिकें काढलीं जातात. शाळेची एक छोटीशी डेअरी असून त्यांत पंढरपुरी म्हशी व खिलार गाई व बैल आहेत. जनावरांचें दूध विद्यार्थी व शेतकी शाळेचा कर्मचारी वर्ग यांना पुरविलें जातें. चांगल्या जातीच्या जनावरांची पैदास होण्याकरितां शाळेनें एक वळू व एक पंढरपुरी रेडा पाळला आहे. बाहेरील शेतकऱ्यांना अल्प मोबदल्यात वरील दोन्हीहि जनावरांचा पैदासीकरतां उपयोग करून घेतां येतो. मे १९६० मध्यें ४९ विद्यार्थी दुसऱ्या वर्षाच्या अंतिम परीक्षेला बसले होते. त्यापैकीं ४३ विद्यार्थी यशस्वी झाले आहेत.

पावसाच्या पाण्यानें जमीन सारखी धुवून जात असते. वेळींच ही धूप थांबविली नाहीं तर थोड्याच काळांत चांगल्या जमिनीचें वैराण वाळवंट बनते. म्हणून जमिनीची धूप थांबविण्याच्या उद्देशानें सरकारनें बांधबंदिस्ती योजना शेतकी खात्यांत भू-संरक्षण विभाग उघडून हातीं घेतली आहे. या विभागानें पांच प्रकारानें हें काम करण्याचें ठरविलें आहे. (१) शेतांत सम पातळींत बांध घालणें व ते दुरुस्त करणें, (२) डोंगर कपारींस भातशेतीस उपयुक्त असें पायऱ्यासारखे जमिनीचे बहतरें करणें, (३) डोंगर उतरणीवर चर करणें, (४) नाल्यांना बांध घालणें व (५) सुधारलेलीं कोरडवाहू शेती कशी फायदेशीर होते हें दाखविण्यासाठीं दर्शनी प्लॉटस् शेतकऱ्यांच्या शेतांत घेणें. साधारणपणे कमी पावसाच्या प्रदेशांत पावसाचें पाणी मुरावे म्हणून व उताराच्या जमिनीकडे माती वाहून जाऊ नये म्हणून बांध बंदिस्तीचें काम हातीं घेण्यांत येतें.

भूसंरक्षण

सांगली जिल्ह्यांत भू-संरक्षण कामाचे दोन विभाग करण्यांत आलेले आहेत. (१) मिरज विभाग –– यांत मिरज, खानापूर, तासगांव व वाळवा या तालुक्यांतील क्षेत्र येते व (२) जत विभाग —यांत जत तालुक्यांतील क्षेत्र येतें. मिरज विभागांत १९५९-६० सालच्या मार्च महिन्यांत शेतकऱ्यांच्या मदतीनें ३० गांवामध्यें एकूण २५,७७० एकर जमिनींत बांधबंधिस्तीचें काम करून एक नवीन उच्चांक निर्माण केला आहे. जत तालुक्यांत ऑक्टोबर १९६० पर्यंत ७०,००० एकर जमिनींत बांधबंदिस्तीचें काम पूर्ण करण्यांत आलें. या तालुक्यांत सप्टेंबर १९५९ मध्यें एका महिन्यांत १५,८३३ एकर जमिनीस बांधबंदिस्ती करून सर्वांत मोठा उच्चांक गांठून दाखविला आहे. या योजनेनुसार आतांपर्यंत ५७ गांवांतून बांधबंदिस्तीचें काम झालें आहे. तालीच्या खाली विहिरी खोदण्याची योजना सरकारनें आंखली असून त्या बाबतची या जिल्ह्यांतील भरीव कामगिरी इतरत्र देण्यांत आली आहे.

उद्यानें व उपवनें

शहरांची नैसर्गिक शोभा वाढावी व हवा स्वच्छ राहावी या दृष्टीनें शहरांत उद्यानें तयार केलीं जातात. याच दृष्टिकोनांतून सांगली संस्थानचे पहिले अधिपति श्रीमंत अप्पासाहेब पटवर्धन यांनीं सुमारें १२५ वर्षापूर्वी सांगली शहराच्या पूर्वाभिमूख एक अतिरम्य अशी आंबराई निर्माण केली आहे. या बागेचें क्षेत्रफळ १५ एकरांचें आहे. संस्थान विलीन झाल्यानंतर पूर्वीच्या मुंबई सरकारनें ही बाग आपल्या ताब्यांत घेतली. ती आतां केवळ बाग म्हणून राहिली नसून तिचें उद्यानांत रूपांतर केलेलें आहे. या आंबराईमुळें सांगली शहराच्या नैसर्गिक सौदर्यांत भर पडली असून सध्यां तींत २०० हून अधिक निरनिराळ्या प्रकारच्या वनस्पतींची जोपासना केली जात आहे. थकल्या-भागलेल्यांना दिवसाच्या कामानंतर शीण घालविण्याचें हें एक विश्रांतिस्थान झालेलें आहे. वाटसरूंना भोजन करण्यास या ठिकाणीं पिण्याच्या पाण्याची सोयहि केलेली आहे. वनस्पति शास्त्राचा अभ्यास करण्याच्या दृष्टीनें या बागेंतील अनेक वनस्पति उपयोगी पडतात. येथील महाविद्यालयांतून त्यांचा उपयोग केला जातो.

१२५ वर्षापूर्वीच्या या बागेवर सध्या वर्षाकाठीं दोन लाख रुपये खर्च केले जातात. ही बाग पार्क्स व गार्डन प्रमुख, मुंबई यांच्या देखरेखीखाली असून तिच्या जोपासनेसाठीं जरूर तो नोकर वर्ग नेमण्यांत आला आहे.

नर्सरी विभाग :—याच बागेंत महाराष्ट्र सरकारनें एक प्रादेशिक नर्सरी विभाग चालू केलेला आहे. या विभागांतून वर्षाकाठीं वनमहोत्सवांसाठीं २४ प्रकारच्या निरनिराळ्या वनस्पतींची सव्वा लाख झाडे तयार केलीं जातात व तीं वनमहोत्सवांत लावण्यास विनामूल्य दिलीं जातात. शोभेच्या व इतर वनस्पतींच्या झाडांचीं बियाणींहि लोकांना अल्प किंमतींत विकली जातात. या नर्सरीमधून निरनिराळ्या प्रकारची दोन लाखाच्यावर झाडें निर्माण केली जात असून तिच्या व्यवस्थेसाठीं ४ माळ्यांची नियुक्ति करण्यांत आली आहे.

अशाच प्रकारची सांगली शहराच्या मध्यभागीं सानेगुरुजी उद्यान व प्रतापसिंह उद्यान अशीं दोन उद्यानें नगरपालिकेच्या व्यवस्थेखाली तयार केलेली आहेत. जिल्ह्यांतील इतर नगरपालिकांनींहि आपल्या क्षेत्रांत नागरिकांकरितां उद्यानें तयार केलेली आहेत.

मुंबई सरकारच्या १९४७ च्या जमीन एकत्रीकरण कायद्यानुसार जमिनीचे तुकडे जोडण्याचें काम खानापूर, वाळवा, तासगांव व मिरज या तालुक्यांत चालू आहे. यापैकीं खानापूर तालुक्यांत सन १९५४ सालापासून जमीन एकत्रीकरणाचें काम सुरू झालें आहे व बाकीच्या तालुक्यांत फेब्रुवारी १९६० पासून काम सुरू करण्यांत आलें आहे.

महाराष्ट्रांत जमिनीचे तुकडे फार आहेत. त्यामुळें शेतकरी वर्गास शेती करणें फार त्रासाचें होतें. पैशाचा फार अपव्यय होतो व इतके करूनहि भरपूर उत्पन्न त्याच्या पदरांत पडत नाहीं. यामुळें शेतकरी वर्गहि दिवसेंदिवस कर्जबाजारी होऊन शेवटीं शेती न करतां नोकरीच्या मागें लागतो व त्याची शेती तशीच पडून राहते.

तुकडेजोड व तुकडेबंदी

जमीन एकत्रीकरण कायद्यामुळें जमिनीच्या तुकड्यांचें एकत्रीकरण करण्यांत येते व प्रत्येक शेतकऱ्याला एका ठिकाणीं शेती करणें सुलभ होतें. त्यामुळें शेतीचें उत्पन्न वाढतें व शेतकरी वर्गाचा पैसाहि वाचतो.

या कामासाठीं सरकारनें प्रत्येक तालुक्यासाठीं कुशल कर्मचारी नेमले आहेत. तासगांव, मिरज, वाळवा व खानापूर या चार तालुक्यांतून तुकडे जोडण्याच्या कामासाठीं असिस्टंट कन्सॉलिडेशन ऑफिसरांच्या नेमणुका करण्यांत आल्या आहेत आणि या सर्व तालुक्यांतील कामावर देखरेख करण्यासाठीं एका कन्सॉलिडेशन ऑफिसरची नेमणूक करण्यांत आली असून त्यांची कचेरी सांगली येथें आहे. खानापूर तालुक्यांतील गार्डी, हिंगणगांदे, कळंबी, खंबाळा, कोतीज, या गांवच्या एकत्रीकरण योजना पूर्ण झाल्या आहेत व नवीन योजनेप्रमाणें जमिनीचे कब्जे होऊन शेतीस सुरवात झाली आहे.

याशिवाय खानापूर तालुक्यांतील घानवड, कऱ्हेरवाडी, भागूचीवाडी, नागेवाडी, भिकवडी खुर्द, माहुली, शेळकबाव, यतगांव, ढवळेश्वर, चिखली, शिवणी, हिंगणगांव खुर्द, हणमंतवडीये, भाळवणी, कडेगांव, कडेपूर, शिरगांव, तांदूळवाडी व कमळापूर, या गावच्या आणि तासगांव तालुक्यांतील नागांव कवठे, शिरगांव विसापूर, लिंब व आळतें. या गांवच्या एकत्रीकरण योजना तयार असून त्या लवकरच मंजूर होतील.

कृष्णा खोरे दूधयोजना या नांवाची एक योजना सरकारनें नुकतीच मंजूर केलेली असून या योजनेचें काम मिरज येथें चालू होणार आहे. मिरज विभागांतून रोज सुमारें १६,००० शेर दूध

दूधयोजना

पुण्या-मुंबईस जातें. मिरज येथें दूध गोळा करून ते शास्त्रोक्त पद्धतीनें शुद्ध करून बाहेर विक्रीसाठीं पाठविण्याच्या दृष्टीनें ही योजना आंखण्यांत आली आहे. सहकारी तत्त्वावर हा उद्योग चालणार असल्यानें या धंद्यांत दलाल राहणार नाहीत. खेड्यांतून दूध गोळा करण्यांत येणार असल्यामुळें दूधउत्पादकाला स्थानिक गिऱ्हाईक मिळू शकेल. ग्रामीण भागांतून दूध गोळा करून मिरज येथें दिवसांतून दोन वेळां आणण्यांत येईल. तेथें तें निर्जंतुक करून पुण्या-मुंबईस नेण्यांत येईल. यामुळें दूधदुभत्याचा जोड धंदा शेतकऱ्यांना मिळणार आहे. मिरज येथें स्टेशनजवळ ५० एकर जागा या योजनेसाठीं घेतलेली असून तेथें इमारती बांधण्याचें काम चालू आहे.

पशुसंवर्धन

या विभागाचें काम पहाण्याकरितां २९ जानेवारी १९५९ पासून जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी यांची कचेरी सांगली येथें चालू करण्यांत आली आहे.

सन १९५५-५६ च्या खानेसुमारीनुसार या जिल्ह्यांतील पशुधनाची संख्या खालील प्रमाणें आहे :—

(१)	जनावरे (गाई, बैल, म्हशी, रेडे)	४,२६,४२७
(२)	घोडे व गाढवे	१,९०९
(३)	शेळ्या व मेंढ्या	३,२१,९६८
(४)	कोंबड्या	४,०३,३८७

जनावरांना औषधोपचार करण्याकरितां खाली नमूद केल्याप्रमाणें ८ मुख्य दवाखाने व १३ उपकेंद्रें या जिल्ह्यांत आहेत :—

तालुका	मुख्य दवाखाना	उपकेंद्रें
खानापूर	विटा	खानापूर, आटपाडी, माहुली, कडेगांव व अळसुंद.
तासगांव	तासगांव	हातनूर, सावळज, पलूस, भिलवडी व मणेराजूरी.
मिरज	सांगली, मिरज, कवठे-महांकाळ	कवठेपिरान, एरंडोली व ढालगांव.
वाळवा	इस्लामपूर	–,,–
शिराळा	शिराळा	–,,–
जत	जत	या तालुक्यांत लवकरच दोन उपकेंद्रें उघडण्यांत येणार आहेत.

मिरज तालुक्यांतील तीन उपकेंद्रें समाज विकास गट, मिरजेच्या वतीने सध्या चालू आहेत. या शिवाय अष्टे येथें जनावरांचा दवाखाना लवकरच चालू होणार आहे व त्याकरितां इमारतीचें काम सुरू आहे.

सन १९५९-६० सालांत या सर्व केंद्रामार्फत पुढील प्रमाणें प्रामुख्यानें काम झालें. खालील सांसर्गिक रोगावर प्रतिबंधक लस टोचण्यांत आली.

(१)	बुळकांडी	४५ जनावरे
(२)	फऱ्या	६९,८०४ सदर
(३)	घटसर्प	६९,८२८ सदर
(४)	देवी (शेळ्या व मेंढ्या)	३,४८६ शेळ्या-मेंढ्या
(५)	राणीखेत (कोंबड्या)	९६,८५७ कोंबड्या
(६)	देवी (कोंबड्या)	४,६३६ सदर

याशिवाय २३,०४९ जनावरांना औषधोपचार करण्यांत आला, ९,३९२ जनावरांकरितां औषध पुरवठा करण्यांत आला, १०,११९ जनावरांकरितां गोचडी नाशक औषध पुरविण्यांत आले व ६,६१८ जनावरांचें खच्चीकरण करण्यांत आले.

कांहीं रोगांचें निदान, उपलब्ध असलेल्या साधनांनीं खेडेंगांवीं होत नाहीं. याकरितां सदर रोगाची जरूर ती माहिती आणि रक्तमांस इत्यादींचे नमुने तपासण्यासाठीं मुंबईस पाठवावे लागत असत. यामध्यें औषधोपचाराचे कामी विलंब होत असे. तो होऊ नये याकरितां सांगली येथील जनावरांच्या दवाखान्यास जोडून रोग निदान केंद्र गेल्या वर्षापासून चालू करण्यांत आलेलें आहे.

पशुधन विकास

हा जिल्हा खिलार जनावरांचें माहेर घर म्हणून प्रसिद्ध आहे. सदर जनावरांची सुधारणा करण्याकरितां सरकारी मदत योजनेमधून वळू पुरविले जातात. पैदाशीच्या कामास जोराची गती व लवकर सुधारणा व्हावी याकरितां वळू देण्यासाठीं २० केंद्रें सुरू करण्यांत आलेलीं आहेत, तीं पुढील प्रमाणें आहेत :

तालुका	केंद्राचें नांव	गांवांची संख्या (केंद्राखाली)
खानापूर	कडेगांव, विटा, माहुली, वडगांव, खानापूर व आटपाडी	७७
तासगांव	निमणी, पलूस, बोरगांव, हातनूर व सावळज	३६
जत	जत, बिलूर, संख व उमदी	२६
वाळवा	इस्लामपूर	१२
शिराळा	बिळाशी	१
मिरज	कवठे महांकाळ, आरग व एरंडोली	३४

वरील केंद्रांपैकीं शिराळा महालांतील बिळाशी येथील केंद्रांत सरकारनें दोन वळू ठेवले आहेत. सदर केंद्रांत पुढील प्रमाणें आतांपर्यंत कार्य झालें :——

सदर केंद्रांतील वळूंनीं आतांपर्यंत ९१८ गाई फळविल्या, पैकी ३४३ गाई व्याल्या व त्यांना १६८ खोंडे व १७५ कालवडी झाल्यां.

सरकारी मदत योजनेखाली पुरविण्यांत आलेल्या वळूंची मार्च १९६१ अखेर १०२ संख्या होती. त्यांनीं सन १९५९-६० सालांत ५३१६ गाई फळविल्या.

या खेरीज पूरक पैदास केंद्र योजना तासगांव तालुक्यांतील निमणी व खानापूर तालुक्यांतील विटा व कडेगांव येथें सुरू करण्यांत आलेली असून सदर योजनेखालीं सध्यां १०७ गाई आहेत. व याशिवाय मागासलेली जमात जिल्हा विकास मंडळ व हरिजन योजना या खाली एकूण २८ गाई व १९ खोंडे व १४ कालवडी इतकी इतकी जनावरें आहेत.

वर नमूद करण्यांत आलेल्या गाई व वळूंच्या योजनेशिवाय कृत्रिम रेतनाची व्यवस्था खानापूर तालुक्यांतील विटे, तासगांव तालुक्यांत तासगांव येथें व मिरज तालुक्यांतील मिरज येथील जनावरांच्या दवाखान्यांत करण्यांत आलेली आहे. या तिन्ही केंद्रांत मिळून १९५९-६० सालीं १२२४ गाई व म्हशीस कृत्रिम रेतन देण्यांत आलें.

मुरघास खड्डे—हिरवा चारा ज्यावेळीं जास्त प्रमाणांत उपलब्ध असतो त्या वेळीं तो राखून ठेवून तुटीच्या दिवसांत म्हणजे ज्यावेळीं हिरवा चारा मिळत नाहीं त्या वेळीं त्याचा वापर करतां यावा म्हणून मुरघास खड्डे बांधण्याकरितां प्रत्येक खड्डयामागे ४०० रुपये सरकारी अनुदान देऊन १० पक्के मुरघास खड्डे बांधण्यांत आलेले असून त्यामधून मुरघास तयार करण्यांत यतो.

जनावरांची प्रदर्शनें व बक्षिसें

जनावरांच्या पैदासकांना उत्साह व प्रोत्साहन देण्याकरितां प्रतीवर्षि साधारणपणें जनावरांच्या यात्रांमधून प्रदर्शनें भरविण्यांत येतात व त्याकरितां साधारणपणे १००० दहा रुपये पर्यंत या खात्यामार्फत अनुदान देण्यांत येतें.

जनावरांच्या वंशावळीची माहिती व जातीवंत जनावरांची नोंद करण्याचें काम हातीं घेण्यांत आलें असून आतांपर्यंत ४२२ जनावरांची नोंदणी करण्यांत आलेली अहे.

मेंढ्यांची सुधारणा:—मेंढ्यांची सुधारणा करण्याकरितां सरकारी मेंढी फार्ममधून सन १९५८-५९ साली २० मेरिनो जातीचे नर व १९५९-६० सालीं ४३ मेंढे सवलतीच्या दरानें पुरविण्यांत आले व दोन इसमांना, त्यांनीं चांगलें काम करून दाखविल्याबद्दल प्रत्यकी १०० रुपये प्रमाणें रुपये २०० सरकारी अनुदान या धंद्याच्या वाढीकरितां देण्यांत आलें.

लवकरच या जिल्ह्यांतील खानापूर तालुक्यांतील झरे व जत तालुक्यांत जत येथें मेंढीच्या लोंकरीचें उत्पादन व विस्तार केंद्र सुरू करण्यांत येणार आहे. त्याकरितां जागा ताब्यांत घेतली असून इमारतीचें काम लवकर सुरू करण्यांत येणार आहे.

कोंबडीसुधारणा:—कोंबड्यांची सुधारणा करण्याकरितां एकूण १३८ व्हाईट लेग हॉर्न जातीचें कोंबडे १९५९-६० सालांत सरकारी मदत प्रत्येकी ३-०० रुपये प्रमाणें देऊन पुरविण्यांत आलें व त्याचा वहातुक खर्चहि सरकारनें सोसला. त्याचप्रमाणें सदर धंद्याच्या मदतीकरितां आठ शेतऱ्यांना एकूण ८०० रुपये सरकारी अनुदान देण्यांत आलें व खात्यामार्फत दोन शेतकऱ्यांना १००० रुपये कर्ज देण्यांत आलें.

या शिवाय जत येथें कोंबडी प्रात्यक्षिक केंद्र लवकरच सुरू करण्यांत येणार असून इमारतीच्या बांधकामास लवकरच सुरवात करण्यांत येणार आहे.

याशिवाय वळू, कोंबड्या, मेंढ्या याकरितां समाज विकास गटामार्फत कर्ज देण्याची सोय करण्यांत आली आहे.

प्रारंभीं हें केंद्र राजणीं येथील २२०० एकर कुरणांत सुरूं करण्याची योजना होती. त्यासाठीं ४२ खिलार गाई व एक वळू फेब्रुवारी १९५८ मध्यें विकत घेतला. पुढें या जागेंत कोयना योजनेमुळें ज्यांच्या जमिनी जाणार होत्या अशा लोकांचें पुनर्वसाहत करण्याचें ठरल्यामुळें हें केंद्र जुनोनी, ता. सांगले, जि. सोलापूर व जत जि. सांगली अशा दोन ठिकाणीं विभागून स्थापन करण्याचें ठरविण्यांत आलें. या दोन केंद्रामध्यें २८ मैल अंतर आहे. जुनोनी येथें एकूण १४९५ एकर जागा घेतली असून यांपैकीं सुमारें ३०० एकर जागा लागवडीखाली असून बाकीचें कुरण आहे. जत येथें आतांपर्यंत सुमारें १००० एकर जमीन ताब्यांत घेतली असून त्यांत सुमारें ३००० एकर लागवडी-खालीं आहे व बाकीचें कुरण आहे.

जत येथील खिलार जनावरांचें उत्पादन केंद्र

जत फार्म १५ ऑगस्ट १९६० रोजीं सुरू झालें. आज या फार्ममध्यें १७९ जातिवंत खिलार गुरें आहेत. या केंद्राचें मुख्य ठिकाण जत येथें असून जुनोनी येथें उपकेंद्र राहाणार आहे.

खिलार जातीच्या मायभूमींत जातिवंत खिलार गुरांची पैदास करण्यासाठींच नव्हे तर खिलार जातीची उपयुक्तता वाढविण्यासाठीं महाराष्ट्र सरकारनें दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत या केंद्राची स्थापना केली आहे. येथें खिलार गुरांची पैदास करतांना पुढील उद्दिष्टें डोळ्यासमोर ठेवावयाचीं आहेत.

१. जातिवंत खिलार जातीची लक्षणें निश्चित करून ती येथील कळपांत बिंबविणें.

२. खिलार गाईंची दुधाच्या दृष्टीनें उपयुक्तता वाढविणें. मात्र हें करतांना बैलांची काम कर-करण्याची पात्रता कोणत्याहि प्रकारें कमी होऊं न देणें.

३. या केंद्रांत निपजलेले, उपयुक्ततेच्या दृष्टीनें सुधारलेले वळू अन्यत्र 'की व्हिलेज सेंटर', 'आर्टि-फिशियल इन्सेमिनेशन सेंटर', 'प्रीमियम वळू' इत्यादि योजनांद्वारा वापरून अशा गुणांचा इतर भागांतहि प्रसार करणें.

४. अशा रीतीनें शेतकऱ्यांना अधिक उपयुक्त असणाऱ्या गुरांचा पुरवठा करून शेतीसाठीं सशक्त व मजबूत जनावरें पुरविणें. तसेंच खिलार जातीच्या गाईंपासून दैनंदिन वापरासाठीं लाग-णारें दूध उपलब्ध करून शेतकऱ्यांना केवळ दुधासाठीं पाळाव्या लागणाऱ्या म्हशीचा बोजा कमी करणें.

५. दुष्काळी व निमदुष्काळी भागांतील शेतकऱ्यांना संमिश्र शेतीची गोडी लावणें.

६. खिलार जातीच्या अंगीभूत गुणांसंबधीं संशोधन करून गुणांची जास्तींत जास्त वाढ करणें.

७. सातारा, सोलापूर व सांगली या खिलारच्या मायभूमीखेरीज कोल्हापूर, नाशिक, चाळीसगांव धुळें, विदर्भ, मराठवाडा व कर्नाटक भागांत खिलार जातीचा प्रसार करणें.

व्यापार आणि उद्योगधंदे

सांगली जिल्ह्यांतील सांगली या शहराचा, प्रथमपासूनच शेतमालाची फार महत्त्वाची उतार पेठ म्हणून लौकीक आहे. महाराष्ट्र राज्यांत मुंबई शहराच्या खालोखाल शेतमालाची दुसऱ्या क्रमांकाची उतार पेठ सांगली आहे. संस्थानी कारकिर्दींतच सांगलीच्या व्यापार आणि उद्योग वाढीला प्रोत्साहन आणि साहाय्य मिळत गेले आहे.

शेंग, गूळ, मिरची, हळद, ज्वारी वगैरे शेतमाल सांगली बाजार पेठेंत फार मोठ्या प्रमाणावर येत असतो. शेत मालाशिवाय कापड, किराणा आणि स्टेशनरी मालाचाहि व्यापार फार मोठ्या प्रमाणावर चालू असतो. सांगली बाजार पेठेंत दरसाल चार ते पांच कोटी रु. चा शेतमाल येत असतो आणि इतर मालहि जवळ जवळ तेवढाच येतो. निरनिराळ्या व्यापार करणाऱ्या लोकांच्या व्यावसायिक संघटनाहि फार वर्षापासून येथें आहेत. वरील मालाशिवाय सोन्याचांदीचा आणि तांब्यापितळेच्या भांड्यांचाहि व्यापार फार मोठा आहे.

सांगलीस रेल्वे स्टेशन शहराच्या मध्यवर्ती ठिकाणीं आणि बाजारपेठेस जवळ असें आहे. वाहतुकीची सोय केवळ रेल्वेनेंच होत नसून माल मोटारीहि खूप आहेत. सांगलीहून राज्याच्या मोठमोठ्या व्यापारी केंद्रास जाणारें रस्तेहि आहेत.

मिरज हेंहि या जिल्ह्यांतील एक व्यापारी केंद्र आहे. पण, तेथें प्रामुख्यानें धान्य व्यापारच अधिक होतो. याशिवाय मिरजेच्या आजुबाजूच्या खेड्यांतून पानमळें बरेच आहेत. मिरज हें रेल्वेचें मोठें केंद्र असल्यानें रेल्वेनें आणि सांगलीमार्गे मोटारीनेंहि पानडाग मुंबई वगैरे ठिकाणीं रोज नियमितपणानें रवाना होत असतात.

सांगली या जिल्हा केंद्राच्या ठिकाणीं सांगली अॅग्रिकल्चरल प्रोड्यूस मार्केट कमिटी ही संस्था शेतमालाचा बाजार नियमित करण्याचें काम करीत आहे. या मार्केट कमिटीच्या कामकाजाचा लौकीक साऱ्या भारतभर असून ती **नियमित बाजार पेठा** भारतांतील पहिल्या क्रमांकाची मार्केट कमिटी समजली जाते. याचमुळें, दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंतील मार्केट कमिट्यांच्या सेक्रेटरींना शिक्षण देणारे जे वर्ग निघावयाचें ठरलें होतें त्यांतील पहिला वर्ग सांगली येथेंच सुरूं करण्यांत आला. सर्व भारतांतून निरनिराळ्या राज्यांतील मार्केट कमिटी सेक्रेटरीच्या कामाचें शिक्षण घेणारे विद्यार्थी सांगलीस येत असतात.

भारत सरकारच्या वेअर हाऊसिंग कॉर्पोरेशननेंहि सांगली हें आपल्या कामासाठीं ठिकाण निवडले असून आपली गुदामाची उभारणीहि त्यांनीं केलेली आहे.

मिरज सब् मार्केट यार्ड : मिरज येथेंहि एक सब् मार्केट यार्ड सुरू झालें आहे.

जत सब् मार्केट यार्ड : जत यथेंहि एक मार्केट यार्ड सुरू झालें आहे. मिरज आणि जत येथील दोनहि सब् मार्केट यार्डस् सांगली मार्केट कमिटीच्या नियंत्रणाखालींच काम करतात.

सांगली मार्केट यार्ड

सांगली मार्केट यार्डासाठीं १०० एकर जागा असून त्यांत व्यापारी आणि दलाल यांच्या दुकानांची योजना मनोवेधक अशी केलेली आहे. परगांवाहून शेतमाल बाजार पेठेंत घेऊन आलेल्या शेतकऱ्यांसाठीं "शेतकरी निवास" ची इमारत या मार्केट यार्डांतच असून बँका, पोस्ट आणि तार ऑफिस वगैरेंहि सोयी करण्यांत आलेल्या आहेत.

शेतमालांवर नाममात्र सेस आकारला जातो आणि त्याचें वार्षिक उत्पन्न ३४ हजार रु. आहे.

(२) **तासगांव मार्केट कमिटी :** या मार्केट कमिटीचे कार्यक्षेत्र तासगांव तालुका आहे.

ताकारी मार्केट कमिटी

(३) या मार्केट कमिटीचे कार्यक्षेत्र वाळवा तालुका, खानापूर तालुका आणि शिराळा महाल असे आहे. यापैकीं आतां खानापूर तालुक्यास स्वतंत्र मार्केट कमिटी मिळालेली असून तिचें कामकाज लौकरच विटें या खानापूर तालुक्याच्या तालुका ठिकाणीं चालूं होईल.

वायदे व्यवहार :—सांगली ही प्रथमपासूनच हळद व्यापाराची एक महत्त्वाची व्यापार पेठ गणली जातें. हळदीचा वायदे व्यवहार हा प्रथमपासून सांगलीस चालूं होता. १९५२ साली भारत सरकारचा वायदे व्यवहार नियंत्रित करणारा कायदा झाला आणि त्या कायद्याप्रमाणें वायदा व्यवहार करण्यासाठीं सांगलीची एक केंद्र म्हणून निवड झाली. यासाठीं व्यापारी, शेतकरी आणि सहकारी प्रतिनिधींची एक संस्था स्थापन झालेली असून तिच्या नियंत्रणाखालीं हळद वायदे व्यवहार चालतात. सांगलीजवळील सांगलवाडी आणि हरीपूर येथें हळद सांठविण्याचीं पेवेहि बरीच जुनी अशी आहेत.

एक वर्षापूर्वीं याच संस्थेला शेंग वायदे व्यवहाराची परवानगी मिळालेली आहे.

वखार योजना

शास्त्रीय दृष्टीनें मालाची योग्य सांठवण व मालाच्या तारणावर शेतकऱ्यांना सुलभ आणि स्वस्त कर्ज मिळण्याची सोय उपलब्ध करून देऊन त्यायोगें कृषि-अर्थ-व्यवस्था सुधारणें या दुहेरी उद्देशानें सरकारी क्षत्रांत वखार योजना अंतर्भूत करण्यांत आली. याकरितां कृषिउत्पादन (विकास आणि गुदाम व्यवस्था) कॉर्पोरेशन सन १९५६ च्या लोकसभेच्या कायद्यान्वयें, जुलै १९५७ मध्यें केंद्रीय गुदाम व्यवस्था कॉर्पोरेशन (Central Warehousing Corporation) स्थापन करण्यांत येऊन, सरकारी क्षत्रांतील वखार योजनेची अंमलबजावणी सुरू झाली. सांगली जिल्ह्यांतील सांगली बाजार पेठेचें

अखिल भारतीय महत्त्व लक्षांत घेतां ही देशव्यापी योजना सुरूं करीत असतांना जीं प्रथमतः ७ केंद्रें उघडलीं गेलीं, त्यामध्यें सांगली केंद्राचा अंतर्भाव करण्यांत आला. सांगलीचें महत्त्व लक्षांत घेतां या ठिकाणीं स्वतःचीं शास्त्रशुद्ध मोठीं गुदामें बांधण्याचा निर्णय कॉर्पोरेशननें तावडतोब घेतला. त्याकरितां सांगली येथील मार्केट यार्ड मधील साडेपांच एकर जागा कॉर्पोरेशननें सांगली मार्केट कमिटीकडून रु. १५,००० ला विकत घेतली व त्यांवर गुदामें बांधण्याचें काम पूर्ण झालें आहे. नवीन बांधण्यांत आलेल्या या गुदामामध्यें भुईमूग-शेंग, गुळ, हळद, याकरतां विशिष्ट पद्धतीचीं खास गुदामें बांधण्यांत आली असून एकूण ३५,००० पोती मावू शकतील अशी स्वतंत्र तीन मोठी गुदामें वेगळीं आहेत. सर्व मिळून एकूण १ लाख मण शेतकी माल सांठविण्याची सोय करण्यांत आली आहे.

हळद ही पेवाशिवाय चांगल्या रीतीनें सांठविली जाऊं शकत नाहीं अशा तऱ्हेचा आतांपर्यंत समज होता, परंतु शास्त्रीय उपाययोजना करून योग्य काळजी घेतल्यास हळद, जमिनीवर चांगली राहू शकते, असें वेअर हाऊसमध्यें प्रयोग करून सिद्ध करण्यांत आलें. त्यानुसार त्या पद्धतीनें हजारो पोती वेअर हाऊसमध्यें चांगल्या रीतीन सांठवून दाखविली. या पद्धतीचा हळूहळू व्यापारी व शेतकरी वर्गांत प्रसार होत आहे.

वेअर हाऊसमध्यें माल सांठविण्यामुळें शेतकरी अगर व्यापाऱ्यांना पुढील प्रमाणें फायदे होतात.

(१) मालाची तांत्रिक देखरेखीखाली सांठवण व कीटक, उंदीर वगैरे पासून मालाचें संरक्षण.

(२) मालाची दर्जाप्रमाणें वर्गवारी.

(३) माल ठेवल्याबद्दल वेअरहाऊसकडून मिळणाऱ्या पावतीच्या तारणावर स्टेट बँक, सहकारी बँक किंवा इतर कोणत्याहि बँकेकडून स्वस्त व सुलभतेनें मिळूं शकणारें कर्ज.

सांगली जिल्ह्याकरितां दोन विक्रीकर अधिकारी नेमण्यांत आलेले आहेत. त्यांस विक्रीकर अधिकारी नं. १ व नं. २ असें संबोधण्यांत येतें. या विक्रीकर अधिकाऱ्यांची कचेरी सांगली येथ आहे. दोन्ही अधिकाऱ्यांना विक्रीकर कायद्यानुसार नोंदविलेल्या व्यापाऱ्यांच्या तपासणीचें काम कार्यक्षमतेच्या दृष्टीनें व सोयीप्रमाणें विभागून दिलेलें आहे. नं. १ विक्रीकर अधिकारी सांगलींतील कांहीं भाग नोंदणी क्रमांक १ ते २५० **विक्रीकर** पर्यंत तसेंच मिरज शहर, मिरज तालुका, इस्लामपूर शहर, वाळवे तालुका व शिराळा पेठा या भागाचें काम पाहातात व विक्रीकर अधिकारी नं. २ हे सांगलींतील नोंदणी क्रमांक २५१ चे पुढील सर्व व विटे शहर, खानापूर तालुका तासगांव शहर, तासगांव तालका, जत व जत तालुका ह्या विभागांतील काम पाहातात. ह्या दोन्हीं अधिकाऱ्यांना मदतनीस म्हणून अनुक्रमें ५ व ४ इन्स्पेक्टर्स नेमलेले आहेत. व्यापाऱ्यांची गैरसोय होऊ नये म्हणून तालुक्यांच्या ठिकाणीं विक्रीकर अधिकारी महिन्यांतून साधारण १ आठवडा मुक्काम करतात व तेथेंच तपासणीचें काम केलें जातें. व्यापाऱ्यांना कायद्यासंबंधी माहिती विक्रीकर अधिकारी वेळावेळीं पुरवितात. ता. १-१-६० रोजीं अमलांत आलेल्या नवीन विक्रीकर कायद्यावरील मुंबई सरकारनें प्रसिद्ध केलेली मार्गदर्शिका विनामूल्य देण्यांत आल्या. यामध्यें कायद्यासंबंधी प्राथमिक स्वरूपाची उपयुक्त

परिचय

माहिती दिलेली आहे. तसेंच कायद्यामध्यें वेळोवेळीं होणारे बदल निरनिराळ्या व्यापारी संस्थांना कळविण्यांत येतात. कांहीं वेळां व्यापाऱ्यांच्या विनंतीनुसार सभा घेऊन त्यांच्या कायद्यासंबंधींच्या अडचणी दूर करून कायदा समजावून दिला जातो.

एखाद्या व्यापाऱ्यास झालेली आकारणी अयोग्य वाटत असेल तर त्यास त्या निर्णयाविरुद्ध साठ दिवसांच्या आंत ह्या विभागाचें असिस्टंट कमिशनर ऑफ सेल्स टॅक्स (अपील्स) पुणें यांच्याकडे अपील करतां येतें. ह्या अपिलाच्या निर्णयाविरुद्ध दुसरें अपील व्यापाऱ्यांच्या मर्जीनुसार डेप्युटी कमिशनरकडे करतां येतें. त्यांचा निर्णय अखेरचा राहतो व ट्रॉयब्यूनलकडे अपील केले असल्यास निर्णयांतील कायद्याच्या मुद्यावर ९० दिवसाच्या आंत हायकोर्टाकडे अर्ज करतां येतो.

बाजार पेठांच्या चिटणीसांकरिता प्रशिक्षण वर्ग

नियंत्रित बाजारपेठांच्या चिटणीसांना शिक्षण देण्याच्या उद्देशानें दि. ८-१०-१९५७ पासून सांगलीच्या मार्केट यार्डांत, गव्हर्नमेंट ऑफ इंडिया, मिनिस्ट्री ऑफ फूड अँड ॲग्रिकल्चर, डायरेक्टोरेट ऑफ मार्केटिंग अँड इन्स्पेक्शन यांच्या नेतृत्वाखालीं एक संस्था चालविली जात आहे. शिक्षणक्रम पांच महिन्याचा, वर्षांतून दोनदां असतो व प्रत्येक वेळीं पंचवीसपर्यंत विद्यार्थी घेतले जातात. माकट कमिटयांचे सेक्रेटरी व इतर निरीक्षक सेवक यांना प्राधान्य दिलें जातें. गेल्या तीन वर्षांत एकूण १११ विद्यार्थ्यांनीं येथें शिक्षण घेतलें आहे. त्यांत मुंबई राज्यांतील ४५, गुजरात १७, राजस्थान १, उत्तरप्रदेश ३, पंजाब २६, आसाम १, बिहार २, ओरिसा २, मैसूर ५, मध्यप्रदेश ६ व केरळमधील २, समाविष्ट होतात. अशीच दुसरी एक संस्था हैद्राबाद (आंध्र प्रदेश) येथें हेंच कार्य करीत आहे.

शिक्षणक्रम शेतमालाच्या व्यापाराबद्दल असून त्यांत उत्पादनापासून थेट अखेरच्या ग्राहकांपर्यंत शेतमालाचा व्यवहार कसा होतो याबद्दल सर्व दृष्टीने माहिती देण्यांत येते. विशेषतः शेतकऱ्यांच्या दृष्टीनें तसेंच व्यापारी व इतर संबंधितांच्या दृष्टीनें या विषयाचा अभ्यास केला जातो. शेतमालाच्या बाजारविषयक तसेंच इतर संबंधित कायद्यांचें ज्ञान विद्यार्थ्यांना संपादन करावें लागतें. शेत मालाच्या बाजाराचें कायद्याप्रमाणें (शेतकऱ्यांच्या हिताच्या दृष्टीनें) नियमन व या कार्यांत येणाऱ्या अडचणी दूर करणें या गोष्टीं संस्थेच्या शिक्षण क्रमांत समाविष्ट आहेत.

सहकारी पद्धतीनें शेत मालाची खरेदी-विक्री, वेअरहाऊसिंग संस्थांतर्फे धान्याचा सांठा व पैशाची तरतूद या विषयींची माहिती देखील विद्यार्थ्यांना देण्यांत येते. शिक्षण क्रमाच्या पांच महिन्यांपैकीं दोन महिने त्यांना वेगवेगळ्या राज्यांतील नियमित बाजारपेठा व सहकारी संस्था दाखविण्यांत येतात. अभ्यासक्रम संपल्यावर परीक्षा घेण्यांत येते व उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांना ॲग्रिकल्चरल मार्केटिंग ॲडव्हायसर, गव्हर्नमेंट ऑफ इंडिया, यांच्यातर्फे प्रशस्ती पत्रें, देण्यांत येतात.

महाराष्ट्र राज्याचे सहकारी व मार्केटिंग खात्याचे अधिकारी, तसेंच सांगली मार्केट कमिटी व गणपती सहकारी खरेदी विक्री संघ यांच्या उत्साहामुळें ही संस्था सांगली येथें कायम करण्यांत आली. संस्थेच्या विद्यार्थ्यांना सांगलीच्या मार्केट यार्डांत राहण्याची सोय मार्केट कमिटीनें करून दिली आहे. यामुळें मार्केटच्या कारभाराचें प्रत्यक्ष ज्ञान प्राप्त करून घेणें विद्यार्थ्यांना सोयीचें जातें.

उद्योगधंदे

येथील इंजिनियरींगचा प्रसिद्ध कारखाना या जिल्ह्यांतील किर्लोस्करवाडी येथें असून शेतीस लागणारीं अवजारें, पाणी पुरवठ्यासाठीं पंप्स वगैरे माल तेथें तयार होतो. या शिवाय सांगलीस तीन आणि मिरजेस एक या प्रमाणें इंजिनियरींगचें कारखानें असून त्यांत काम करणाऱ्या कामगारांची संख्या सुमारें दीड हजारावर आहे.

इंजिनियरींग

कापसापासून सूत काढावयाच्या दोन गिरण्या पैकीं एक सांगली येथें आणि दुसरी दोन मैलांवरील माधवनगर येथें आहे. कापड विणणाऱ्या गिरण्या दोन सांगली येथें आणि एक मिरज येथें आहे. सूत कांतणाऱ्या गिरण्यांतून ८०० कामगार काम करीत असून कापड विणणाऱ्या गिरण्यांतून ६०० कामगार काम करतात.

कापड आणि सत गिरण्या

शेंगदाण्याचें तेल गाळणाऱ्या गिरण्या पुढील प्रमाणें आहेत. मिरज-एक, इस्लामपूर-दोन, तासगांव-एक, माधवनगर-दोन आणि सांगलीस पांच. या धंद्यांत ३०० कामगार काम करतात.

तेल गिरण्या

शेंगा फोडून तेल गिरण्यांना तेल गाळण्यास आणि खाण्यासाठीं शेंगदाणा तयार करणाऱ्या गिरण्या, तसेंच हळद पॉलिश करणाऱ्या गिरण्या सांगलीस पांच असून तासगांव येथें एक आहे. या गिरण्यांतून १०० कामगार काम करतात.

शेंगा फोडणें आणि हळद पॉलिश करणें

शेतीला पाणी पुरवठा करणारें सीमेंटचे नळ, पत्रे आणि इतर वस्तू तयार करणारे दोन कारखानें या जिल्ह्यांत असून त्यांतील एक सांगलीस आणि दुसरा मिरजेस आहे. यांत १५० कामगार काम करतात.

सिमेंटचे नळ, पत्रे आदि वस्तू

शेतकरी सहकारी साखर कारखाना माधवनगर येथें दोन वर्षापूर्वीं सुरू झालेला असून त्यांत ६००० कामगार काम करतात. या जिल्ह्यांत शिराळा, भिलवडी आणि इस्लामपूर येथेंहि सहकारी साखर कारखाने सुरूं करण्याच्या प्रयत्नांत लोक आहेत.

साखर कारखाना

महाराष्ट्र सरकारनें सांगली जिल्ह्यांत सांगली, मिरज, इस्लामपूर व तासगांव अशा चार ठिकाणीं औद्योगिक वसाहती मंजूर केल्या आहेत. यापैकीं सांगली आणि मिरज येथील वसाहतींच्या प्राथमिक कामास सुरवात झाली आहे.

औद्योगिक वसाहती

औद्योगिक वसाहती

सांगली माधवनगर रस्त्यावर एका औद्योगिक वसाहतीचें काम चालू आहे. याकरितां १३५ एकर जमीन निश्चित करण्यांत आली असून त्यांत ५०' × १००' चे ३१८ प्लॉटस् छोटया उद्योग धंद्याकरतां ठेवण्यांत आले आहेत. एका एकराहून अधिक जागा ज्यांना मोठया धंद्याकरतां पाहिजे त्यांच्या करतां कांहीं जागा राखून ठेवली आहे. सांगली नगरपालिकेनें ही सर्व जागा विकत घेऊन औद्योगिक वसाहतीस योग्य अशी करून देण्याचें मान्य केलें आहे. याकरितां नगरपालिका सरकारकडून कर्ज घेणार आहे. सांगली औद्योगिक वसाहत सहकारी संस्था नांवाची एक संस्था स्थापन करण्यांत आली असून या संस्थेतर्फे ग्राहकांना प्लॉटस् देणें, त्यांना धंदा उभारण्यास मदत करणें, ठराविक नमुन्यांत जागा बांधून देणें वगैरे गोष्टीं चालू आहेत. आतांपर्यंत एकूण इंजिनियरिंग, टेक्स्टाईल, रोलिंग मिल्स, फौंडरीज, फोर्जिग मिल्स, होजिअरी वगैरे ३२ प्रकारच्या धंद्याकरतां या वसाहतींतील जागेसाठीं मागणी आलेली आहे. याच पद्धतीवर मिरज, तासगांव व इस्लामपूर येथें औद्योगिक वसाहती सुरूं करण्याचा प्रयत्न चालू आहे.

कामगार कल्याण

कामगारांच्या हितसंबंधांचें रक्षण करण्याकरितां मध्यवर्ती व राज्य सरकारनें निरनिराळें कायदे केले आहेत. त्यांतील कांहीं कायदे पुढील प्रमाणें आहेत.

(१) फॅक्टरीज ॲक्ट (कारखान्यांचा कायदा), (२) बॉंबे शॉप्स अँड एस्टॅब्लिशमेंट ॲक्ट (गुमास्ता कायदा), (३) पेमेंट ऑफ वेजेस ॲक्ट (वेतनाचा कायदा), (४) मिनिमम् वेजेस ॲक्ट (किमान वेतन कायदा), इन्डस्ट्रियल डिस्प्यूटस् ॲक्ट (औद्योगिक कलह कायदा), (६) बॉंबे इंडस्ट्रियल रिलेशन्स ॲक्ट (मुम्बई औद्योगिक संबंध कायदा), (७) वर्कमेन्स कॉम्पेन्सेशन ॲक्ट (कामगारांना नुकसान भरपाई देण्यासंबंधीचा कायदा), (८) एम्लॉयमेंट ऑफ चिल्ड्रेन ॲक्ट (मुलांना कामावर लावण्यासंबंधीचा कायदा).

किमान वेतन कायदा

विशिष्ट धंद्यांत होणारी कामगारांची पिळवणूक थांबविण्यासाठीं किमान वेतन कायद्याखाली कामगारांना द्यावयाच्या किमान वेतन दरांसंबंधी तरतूद करण्यांत आली आहे. ठरविलेल्या दरापेक्षां कमी पगार देणें या कायद्याखाली गुन्हा समजण्यांत येतो. हा कायदा लागू करण्यांत आलेल्या धंद्यापैकी कांहीं धंदे पुढीलप्रमाणें आहेत.

(१) रस्ते बांधकाम, (२) तेलाच्या गिरण्या, (३) छापखाने, (४) कॉटन जिनिंग आणि प्रेसिंग फॅक्टरीज, (५) स्थानिक स्वराज्य संस्था, (६) कातडी कमावणें, (७) दगड फोडणें व खडी तयार करणें (८) विड्या तयार करणें, (९) पिठाच्या, भाताच्या व डाळीच्या गिरण्या व (१०) सार्वजनिक मोटार वहातुक धंदा.

मुंबई दुकानें आणि संस्थांचा कायदा

या कायद्याखाली केलेल्या तरतुदीप्रमाणें पेढ्या, दुकानें, हॉटेल्स, थिएटर्स व इतर करमणुकीच्या जागीं काम करणाऱ्या कामगारांचे कामाचे तास, विश्रांतीच्या वेळा, रजेचे नियम, संस्था उघडण्याच्या व बंद करण्याच्या वेळा यासंबंधी नियम करण्यांत आले आहेत. हा कायदा या जिल्ह्यांतील सांगली व मिरज येथील नगरपालिका हद्दींतील संस्थांना लागू करण्यांत आला आहे.

मुंबई औद्योगिक संबंध कायदा

या कायद्याखाली संस्था म्हणून नोंद केलेल्या संस्थांना हा कायदा लागू करण्यांत आला आहे. हा कायदा जिल्ह्यांतील कापड गिरण्या, साखर कारखाने बँका यांना लागूं करण्यांत आला आहे.

औद्योगिक तंट्या-संबंधीचा कायदा

या कायद्याखाली केलेल्या तरतुदीनुसार कामगार व मालक यांच्यांत निर्माण होणाऱ्या तंट्यासंबंधी नियम करण्यांत आले आहेत. या कायद्याखाली केलेल्या तरतुदीप्रमाणें (१) कामगारांच्या नोकरीसंबंधी नियम, (२) दैनंदिन बाबीसंबंधी निर्माण होणाऱ्या प्रश्नासंबंधी विचार करण्याकरतां कामगारांच्या व मालकांच्या प्रतिनिधींच्या समितीची तरतूद करण्यांत आली आहे. (३) कामगारांना कामावरून कमी करतांना त्यांच्या हक्काच्या संरक्षणासंबंधी नियम करण्यांत आले आहेत. (४) औद्योगिक क्षेत्रांतील कलह द्रुत गतीनें आणि सलोख्यानें मिटविण्यासाठीं मध्यस्थ यंत्रणा निर्माण केली गेली आहे.

वेतनासंबंधीचा कायदा

या कायद्याखाली वेतन द्यावयाची तारीख व वेतनांतील कपाती संबंधी नियम करण्यांत आले आहेत. हा कायदा फॅक्टरी ॲक्ट लागूं असलेल्या कारखान्यांत काम करणाऱ्या नोकरांना लागू करण्यांत आला आहे.

कामगारांना नुकसान भरपाई देण्याचा कायदा

या कायद्याखाली कामगारांना अपघातानें झालेल्या नुकसान भरपाईसंबंधी तरतुदी करण्यांत आल्या आहेत.

कारागिरांस कर्ज

ग्रामीण विभागांत वैयक्तिक रीतीनें घरगुती उद्योगधंदे व हस्तव्यवसाय करणाऱ्या कारागिरांना उपकरणें, अवजारें खरेदी करण्यासाठीं आणि खेळत्या भांडवलासाठीं कर्ज आणि इतर आर्थिक साहाय्य नोव्हेंबर १९६० पर्यंत कुटिरोद्योग व औद्योगिक सहकारी खात्यामार्फत देण्यांत येत होतें. महाराष्ट्र सरकारच्या धोरणाप्रमाणें कुटिरोद्योग विभाग आतां सरकारच्या औद्योगिक खात्याकडे दि. १ डिसेंबर १९६० पासून देण्यांत आलेला आहे. औद्योगिक खात्याचे डिस्ट्रिक्ट इंडस्ट्रीयल ऑफिसर यांच्याकडून यापुढें कारागिरांस लागणाऱ्या आर्थिक मदतीच्या बाबतींत मार्गदर्शन होईल. वैयक्तिक कारागिरांस कर्ज व मदत देण्याच्या निरनिराळ्या योजना आहेत.

कारागिरांस साहाय्य :--या योजनेखालीं कारागिरांस जास्तीत जास्त रु. ५००० पर्यंत, कर्जाच्या दुप्पट रकमेचे दोन लायक जामीन घेऊन अगर घर, जमीन यांच्या तारणावर ७५ टक्केपर्यंत कर्ज देण्याची योजना आहे. सदर कर्जावर ३ टक्के व्याज आकारण्यांत येतें. कर्ज फेडीची कमाल मर्यादा १० वर्षें आहे. सांगली जिल्ह्यामध्यें ह्या योजनेखालीं एकूण ३६ कारागिरांना रु. ६७,९२५ कर्ज निरनिराळ्या धंद्यांकरितां देण्यांत आलेलें आहे. तसेंच महाराष्ट्र सरकारनें मान्यता दिलेल्या समाजसेवा संस्थांच्या शिफारशीवर कारागिरांस वैयक्तिक हमीवर (तारणाशिवाय) एक हजार रुपयांपर्यंत कर्ज मिळूं शकते. या योजनेखालीं जिल्ह्यांत एकूण दहा कारागिरांस रु. ८००० कर्ज पुरवठा करण्यांत आला आहे.

सुशिक्षित बेकार योजनेखालीं एस्. एस्. सी. अगर मुलकी परीक्षा पास झालेल्या व नोकरी नसलेल्या लोकांना रु. ३००० पर्यंत व संयुक्त अर्जावर जास्तीत जास्त रुपये ६००० आर्थिक मदत दिली जाते. सदर कर्ज व मदत धंद्याकरितां लागणारीं उपकरणें, अवजारें व कच्चा माल यांची खरेदी करण्याकरितां दिली जात असून एकंदर आर्थिक मदतीच्या ७५ टक्के कर्ज व २५ टक्के मदत याप्रमाणें देण्यांत येते. व्याजाचा दर साल दर शेंकडा ४½ रुपये आकारला जातो. कर्जाची फेड पांच वर्षांमध्यें जास्तीत जास्त ५० हप्त्यांनीं करावी लागते. आर्थिक मदत घेण्याच्या आधी स्थावर मालमत्तेचें तारण किंवा मंजूर केलेल्या रकमेच्या दुप्पट रकमेचे एक अगर दोन लायक जामीन द्यावे लागतात. या जिल्ह्यामध्यें ह्या योजनेखालीं निरनिराळ्या धंद्यांकरितां एकूण १० कारागिरांस रु. २१०५० कर्ज व रु. १४५० मदत मंजूर करण्यांत आली आहे.

खात्याच्या फिरत्या शाळेंत अगर इतर कोणत्याहि सरकारमान्य तांत्रिक संस्थेंत शिक्षण घेतलेले, सुशिक्षित व शिकून तयार झालेले कारागीर व या उद्योगधंद्यांत प्रथमपासून असलेले कारा-

गीर अगर वंशपरंपरेनें धंदा करणारे कारागीर, ते सुशिक्षित नसले किंवा त्यांस कारागिरीचें शिक्षण नसलें तरी, या योजनेखालीं मदतीस पात्र आहेत. एका व्यक्तीस रु. २००० किंवा संयुक्त अर्जावर जास्तीत जास्त रु. ६००० पर्यंत आर्थिक मदत मिळूं शकेल. एकूण उपकरणें, अवजाराकरितां देण्यांत येणाऱ्या रकमेच्या जास्तींत जास्त २५ टक्केपर्यंत अनुदान देण्यांत येतें. सांगली जिल्ह्यामध्यें ह्या योजनेखालीं एकूण १३ कारागिरांस रु. १६,२९५ चा कर्ज पुरवठा निरनिराळ्या धंद्याकरितां करण्यांत आलेला आहे.

मागासलेल्या वर्गांतील कारागिरांना वरील दोन योजनेंत नमूद केलेल्या अटींवर कर्ज देण्यांत येतें. ह्या योजनेंखालीं सांगली जिल्ह्यामध्यें एकूण ३२ कारागिरांस रु. २२,४२७.५० कर्ज व रु. १५७७.५० मदत मंजूर करण्यांत आलेली आहे.

मागासलेल्या वर्गाकरितां कर्ज व अनुदान

विमुक्त जाती, वर्गिकृत जमाती व वर्गिकृत टोळ्यांसह इतर मागासलेल्या जातींतील लोकांना वैयक्तिक हमीवर धंद्याकरितां रु. ५०० पर्यंत कर्ज देण्याची योजना आहे. यामध्यें २५ टक्के कर्ज व जास्तीत जास्त २५ टक्केपर्यंत अनुदान देण्याची योजना आहे. सांगली जिल्ह्यामध्यें ह्या योजनेखालीं एकूण ९ कारागिरांना रु. १८५६ कर्ज व रु. ६१८.७५ अनुदान देण्यांत आलें आहे.

फिरत्या औद्योगिक शाळा

कारागिरांस त्यांच्या धंद्यामधील उत्पादनाच्या दृष्टीनें लागणारें तांत्रिक ज्ञान व शास्त्रशुद्ध आणि सुधारलेलीं उपकरणें व अवजारें यांच्या साहाय्यानें उत्पादन वाढ करण्याचें शिक्षण देण्याच्या दृष्टीनें ह्या जिल्ह्यामध्यें निरनिराळ्या औद्योगिक व्यवसायांतील फिरत्या शाळा सुरूं करण्यांत आलेल्या आहेत. समाज विकास गटामध्यें ग्रामीण उद्योग धंद्याच्या सदराखालीं असणाऱ्या तरतुदींतून खात्याची संमती मिळवून अशा शाळा काढण्याची योजना आहे. त्याप्रमाणें ह्या जिल्ह्यामध्यें खात्यामार्फत व समाजविकास गटामार्फत हातमाग, लोंकर काम, लाख काम, सुतार-लोहार काम, वाखकाम, बांबुकाम, रंग छपाईचें काम इत्यादि उद्योगधंद्यांचें शिक्षण देण्याच्या दृष्टीनें निरनिराळ्या ठिकाणीं फिरत्या शाळा उघडण्यांत येऊन त्यामध्यें कारागिरांना शिक्षण देण्याची सोय करण्यांत आलेली आहे. अशा प्रकारें या शाळांमधून निरनिराळ्या प्रकारच्या धंद्याचें सुमारें ३५० ते ४०० लोकांनीं शिक्षण घेतलें आहे. शिक्षणाच्या मुदतीत प्रत्येक विद्यार्थ्यास रु. २० खेड्यामध्यें व रु. २५ शहरामध्यें अनुदान देण्यांत आलें.

सहकारी कुटिरोद्योग संस्था

सांगली जिल्ह्यामध्यें ग्रामीण भागांत चालणारे घरगुती उद्योग, कलाकौशल्याची कामें आणि हस्तव्यवसायांना प्रोत्साहन देण्यासाठीं व त्यांत गुंतलेल्या कारागिरांना साहाय्य व मार्गदर्शन करण्याच्या उद्द्शानें औद्योगिक सहकारी खात्याचे डिस्ट्रिक्ट ऑफिसर ऑफ कॉटेज इंडस्ट्रीज व इंडस्ट्रीयल को-ऑपरेटिव्ह' यांची कचेरी सुरू करण्यांत आली. या कचेरीतर्फे जिल्ह्यांतील छोटद्या छोटद्या उद्योग धंद्यामध्यें काम करणाऱ्या कारागिरांस व्यवसायासाठीं लागणारें कर्ज, त्याच्या उत्पादनामध्यें सुधारणा होण्याच्या दृष्टीनें लागणारें तांत्रिक शिक्षण, या बाबतींत जरूर ती योजना कार्यान्वित करण्यांत येत आहे. तसेंच लहान उद्योगधंदे वैयक्तिक रीतीनें करण्यापेक्षां कांहीं कलाकारांनीं अथवा कारागिरांनीं एकत्र येऊन केल्यास त्यांच्या उद्योगास अधिक स्थैर्य येते व अधिक आधुनिक यंत्रसामुग्री व साहाय्य मिळविता येते. या दृष्टीनें एकाच धंद्यामध्यें गुंतलेले कारागीर व कलाकार सहकारी तत्त्वावर एकत्र आणून सहकारी औद्योगिक संस्था स्थापन करण्याचा प्रयत्न केला जात आहे. महाराष्ट्र सरकारच्या निर्णयाप्रमाणें कुटिरोद्योग विभाग हा औद्योगिक सहकारी खात्यापासून वेगळा काढून तो १ डिसेंबर १९६० पासून औद्योगिक खात्याकडें देण्यांत आलेला आहे व सहकारी खात्याचे जिल्हाधिकारी यांच्याकडे औद्योगिक सहकारी सोसायटद्यांचें कामकाज देण्यांत आलें आहे. अशा तऱ्हेनें औद्योगिक व्यवसायांत गुंतलेल्या कारागिरांनीं एकत्र येऊन सहकारी तत्त्वावर निरनिराळद्या धंद्यामध्यें एकूण १०५ सहकारी संस्था स्थापन केल्या आहेत. या संस्थांमध्यें एकूण ४८४९ कारागीर सामील झाले आहेत. सरकारच्या सहकारी खात्यामार्फत अशा सहकारी संस्थांना खेळत्या भांडवलासाठीं, उपकरणें अवजारें खरेदीसाठीं गुदामांच्या बांधकामासाठीं, तसेंच इतर आवश्यक त्या साधनसामुग्रीसाठीं आर्थिक साहाय्य व कर्ज देऊन तांत्रिक मार्गदर्शन केलें जातें. तसेंच ह्या कारागिरांची आर्थिक परिस्थिति लक्षांत घेऊन व त्यांना लागणारें भांडवल उभें करण्याच्या दृष्टीनें येणाऱ्या अडचणी लक्षांत घेऊन अशा सहकारी संस्थांची भागिदारी सरकारनें घेण्याचें धोरण असून त्याप्रमाणें कांहीं संस्थांच्या भाग भांडवलास सरकारनें आर्थिक साहाय्य केलें आहे.

महाराष्ट्रांतील हातमागाचा व्यवसाय हा फार पुरातन काळचा व्यवसाय आहे. सांगली जिल्ह्यामध्यें हातमागाच्या व्यवसायामध्यें काम करणारे बरेच कारागीर आहेत. या जिल्ह्यांतील

विणकर सहकारी संस्था

बुधगांव, सांगली, तासगांव, कुंडल, विटा, आटपाडी, कडेगांव, इस्लामपूर, चिकुर्डे, कळमवाडी, कासेगांव, कवठेंमहांकाळ, मिरज, जाडरबोबलाद, व शिराळा हीं हातमाग व्यवसायाचीं केंद्रें असून या ठिकाणीं एकूण १७ विणकर औद्योगिक सहकारी संस्था स्थापन करण्यांत आल्या आहेत. या संस्थांचे एकूण १२५३ सभासद

आहेत. विणकराचें जीवनमान सुधारण्याच्या दृष्टीनें हातमागाचें रूपांतर यंत्रमागांत करण्यास उत्तेजन देण्यांत यत असून सांगली येथील विणकर सहकारी संस्थेला एकूण १५ यंत्र माग व आर्थिक साहाय्य देण्यांत आलें आहे. इस्लामपूर, तासगांव, विटा, कासेगांव वगैरे ठिकाणच्या सहकारी संस्थांस यंत्र माग देण्यासंबंधीं विचार चालू आहे.

लोंकर उत्पादन

त्याचप्रमाणें जिल्ह्यामध्यें लोंकरीच्या उत्पादनाचा धंदा जत, आटपाडी, दिघंची व इतर ठिकाणीं मोठ्या प्रमाणावर चालतो. ह्या लोंकरीपासून कांबळी तयार करण्यामध्यें संगर व धनगर लोक यांना एकत्रित आणून, त्यांच्या औद्योगिक सहकारी संस्था ढालगांव, नागांव, कवठे, इस्लामपूर, पांटरेचीवाडी, देवराष्ट्रे, अळसुंद, दिघंची, झरें या ठिकाणीं स्थापन करण्यांत आल्या असून त्यांची सभासद संख्या २७२ आहे. ढालगांव व नागांव कवठे या ठिकाणच्या सहकारी संस्थांना खादी ग्रामोद्योग कमिशनकडून प्रमाणपत्र मिळालें आहे व सदर कमिशनकडून मिळणाऱ्या सवलती या सोसायटचांस देण्यांत आल्या आहेत.

मजूर सहकारी संस्था

शेतीच्या खालोखाल व शेतीला जोडधंदा या दृष्टीनें शेतमजुरी करून राहिलेल्या वेळां-मध्यें शेतमजूर व निव्वळ मजुरीवर जीवन जगणाऱ्या लोकांचें जीवनमान सुधारण्याच्या दृष्टीनें मजूर सहकारी संस्था स्थापन करण्यांत आल्या आहेत. अशा एकूण ३१ संस्था स्थापन झाल्या असून त्यामध्यें १२०१ मजूर सभासद आहेत. सरकारी योजनेप्रमाणें सार्वजनिक बांधकामाखालीं जिल्हा लोकल बोर्ड, म्युनिसी-पालिटचा वगैरे सरकारी व निमसरकारी योजनेप्रमाणें निघणारीं बांधकामाची रु. २०,००० रकमेच्या आंतील कामें अशा मजूर सहकारी सोसायटचांस एस्टिमेट दरानें देण्यांत येतात व रु. २०,०००च्या वरची कामें कमीत कमी टेंडर रकमेच्या वर ५ टक्केपर्यंत जादा टेंडर सोसायटीकडून आलें असल्यास तें काम सोसायटीस देण्याबद्दल प्राधान्य देण्यांत येतें. या जिल्ह्यांतील शिराळा पेटा सोडल्यास इतर भागामध्यें जंगलाचा कांहींहि भाग नाहीं. शिराळा पेटचामध्यें अगदीं थोडा भाग जंगल विभाग आहे. ह्या विभागाच्या मागासलेले भागांतील लोक जंगल तोडण्याच्या कामामध्यें गुंतलेले असतात. ह्या लोकांची एक जंगल कामगार सहकारी संस्था असून तिचे एकूण ९८ सभासद आहेत.

वीट उत्पादन

सांगली, मिरज वगैरे शहरांचा विकास व औद्योगिक क्षेत्रामध्यें होणारी प्रगति लक्षांत घेतां निरनिराळ्या वसाहती व इमारतीं बांधण्याचीं कामें फार मोठ्या प्रमाणावर निघू लागली आहेत. या इमारतींच्या बांधकामाकरितां विटांची मागणी जास्त प्रमाणांत आहे. याचा फायदा घेण्याच्या दृष्टीनें सांगली जिल्ह्यांत सांगलवाडी, हरिपूर, मिरजवाडी, पलूस, इस्लामपूर, पेठ, वाळवा, कांदे व ऐतवडे या ठिकाणीं कुंभकार व विटा उत्पादक सहकारी सोसायटचा काढण्यांत आलेल्या आहेत. ह्या सोसायटचांचे एकूण २६१ सभासद आहेत. पलूस येथील कुंभकार सोसायटीस खादी ग्रामोद्योग बोर्डाच्या योजनेप्रमाणें खेळतें भांडवल मिळालें आहे.

सांगली जिल्ह्यामध्यें ग्रामोद्योगामध्यें महत्त्वाचा धंदा म्हणून तेलघाणी धंद्याचा उल्लेख करतां येईल. या जिल्ह्यामध्यें निरनिराळ्या केंद्रांमध्यें सुमारें ५०० तेलघाण्या आहेत. ह्या तेल-

तेलघाणी धंदा

घाण्याच्या धंद्यावर एक्स्पेलर व ऑइल मिल्स निघाल्यामुळें झालेल्या परिणामाचा विचार करतां खादी ग्रामोद्योग कमिशनच्या कांहीं योजनांन्वयें विशेष सवलती देऊन व ह्या कारागिरांना संघटित करून त्यांच्या सहकारी संस्था स्थापन करण्याचा प्रयत्न करण्यांत आला. त्याप्रमाणें आजपर्यंत इस्लामपूर, पेट, येलूर, शिराळा, कवलापूर, जत व आटपाडी या ठिकाणीं तेलघाणी सहकारी संस्था स्थापन झालेल्या असून त्यांचे १९४ सभासद आहेत.

चर्मकार व ढिवर कारागीर

जिल्ह्यामध्यें चर्मकार व ढिवर कारागीर लोकांची संख्या व ह्या धंद्यास आलेलें महत्त्व लक्षांत घेतां अशा लोकांना संघटित करून त्यांच्या औद्योगिक सहकारी संस्था स्थापन करण्यांत आल्या आहेत. जिल्ह्यामध्यें मिरज, कौलापूर, कूपवाड, इस्लामपूर, कांदे, ऐतवडे बुद्रुक या ठिकाणीं अशा संस्था असून त्यांची सभासद संख्या ९७ आहे. जिल्हा औद्योगिक सहकारी संघामार्फत ह्या कारागिरांना लागणाऱ्या कच्च्या मालाची खरेदी व विक्री करण्याकरितां मिरज येथें एक केंद्र उघडण्यांत आलें आहे. द्वितीय पंचवार्षिक योजनेनुसार ह्या केंद्रास सरकारी कर्ज व मदत देण्यांत आली आहे.

घायपाताचें उत्पादन

जिल्ह्यामध्यें घायपाताचें उत्पादन फार मोठ्या प्रमाणावर होत असून घायपातीपासून वाख तयार करून त्याच्या पासून शेतकरी व इतर लोकांस लागणारे दोर तयार करण्याच्या धंद्यामध्यें विषेषतः मांग लोक फार मोठ्या प्रमाणावर आहेत. या लोकांना संघटित करून त्यांच्या औद्योगिक सहकारी संस्था कवलापूर, अष्टा, माहुली, वांगी, करगणी, आटपाडी, दिघंची, हिंगणगांव, रेवणगांव, आसंगी, सावर्डे, विसापूर वगैरे ठिकाणीं स्थापन करण्यांत आल्या आहेत. त्यांची सभासद संख्या ३३३ आहे.

सुतार – लोहार औद्योगिक संस्था

जिल्ह्यामध्यें विकास गट स्थापन झाल्यानंतर निरनिराळ्या प्रकारचीं इमारतींचीं बांधकामें फार मोठ्या प्रमाणावर निघूं लागलेली आहेत. तसेंच शेतीमध्यें झालेल्या सुधारणा व शेतकऱ्यांस सुधारलेल्या पद्धतीचीं लागणारीं साधनें व अवजारें तयार करण्याचें काम संघटित होऊन केल्यास कारागिरांस लागणारा भांडवली पुरवठा व इतर हत्यारें अवजारें हीं सहकारी संस्थेमार्फत मिळवून घेऊन आपलें काम करणें सुलभ जातें. अशा तऱ्हेनें ह्या धंद्यामध्यें असलेल्या सुतार व लोहार समाजांतील लोकांनीं संघटित होऊन जिल्ह्यामध्यें मिरज, कवठेमहांकाळ, माहुली, सांगलीवाडी व तासगांव येथें सुतार-लोहार-औद्योगिक सहकारी संस्था स्थापन केल्या आहेत. त्यांची सभासद संख्या १०५ आहे. तसेंच सांगली येथें तांबा पितळ वगैरे धातूपासून भांडी तयार करण्याचे दृष्टीनें कारागिरांनीं संघटित होऊन सहकारी संस्था स्थापन केली असून तिची सभासद संख्या १७ आहे.

तंतुवाद्याचें उत्पादन

मिरज हें ठिकाण संगिताकरितां लागणाऱ्या तंतुवाद्यांच्या निर्मितिविषयीं प्रसिद्ध असून ह्या ठिकाणीं उत्पादन होणारी तंतुवाद्यें हीं अखिल भारतामध्यें प्रसिद्ध आहेत व निरनिराळ्या ठिकाणाहून ह्या तंतुवाद्यांस फार मोठ्या प्रमाणावर मागणी आहे. ह्या धंद्यामध्यें सुमारें ४०० लोक गुंतलेले असून त्यापैकीं ५४ लोकांनीं संघटित होऊन एक सहकारी संस्था स्थापन केली आहे.

सांगली येथें सिमेंटपासून गटर पाइप्स, नळ वगैरे तयार करण्याच्या उद्देशानें १८ लोकांनीं संघटित होऊन एक सीमेंट वस्तूउत्पादन सहकारी सोसायटी स्थापन केली आहे.

सिमेंट पाइप्स

कुंडल येथें कैकाडी समाजाच्या १८ लोकांनीं संघटित होऊन बांबूचें काम करण्याकरितां एक औद्योगिक सहकारी सोसायटी स्थापन केली आहे.

बांबूकाम

खाद्य व अखाद्य तेलापासून साबण तयार करण्याकरितां अरळें येथें ३६ लोकांनीं एकत्र येऊन एक औद्योगिक सहकारी संस्था स्थापन केली आहे.

साबण उत्पादन

जिल्ह्यामध्यें किर्लोस्करवाडी हें ठिकाण औद्योगिक विकासाच्या दृष्टीनें फार प्रसिद्ध आहे. किर्लोस्करवाडी येथील कारखान्यांत आसपासच्या खेड्यांतील लोक फार मोठ्या संख्येनें काम करीत आहेत. या लोकांमुळें व तेथील स्थानिक वातावरणामुळें लोकांना औद्योगिक विकासाची प्रेरणा झाली आहे. किर्लोस्करवाडी कारखान्यामध्यें अनुभव घेऊन तयार झालेल्या ३८ लोकांनीं सुमारें ४० हजार रुपये भांडवल जमा करून पळूस येथें सहकारी पद्धतीवर एक वर्कशॉप काढलें आहे. या वर्कशॉपमध्यें ऑइल इंजिनाकरितां लागणारे स्पेअर पार्टस्, लोखंडी चरकाचे स्पेअर पार्टस्, पंपस् वगैरेचें उत्पादन करण्यांत येतें.

वर्कशॉप

जिल्ह्यामध्यें औद्योगिक सहकारी सोसायटयांच्या कामकाजामध्यें येणाऱ्या अडचणी लक्षांत घेऊन त्या दूर करण्याकरितां व त्यांना लागणारें तांत्रिक व इतर मार्गदर्शन करण्याकरितां औद्योगिक सहकारी सोसायटयांचा एक औद्योगिक सहकारी संघ स्थापन करण्यांत आलेला आहे. जिल्ह्यांतील औद्योगिक सहकारी सोसायटयांपैकीं ५४ सहकारी संस्था ह्या संघाच्या सभासद आहेत. शिवाय सुमारें १८९ वैयक्तिक कारागीर या संघांचे सभासद झाले आहेत. सध्यां ह्या संघामार्फत हातमागाची दोन विक्री केंद्रें मिरज व सांगली येथें चालविण्यांत येत आहेत. तसेंच मिरज येथें चर्मकार व ढिवर लोकांना लागणारा कच्चा माल किफायतशीर दरानें पुरविण्याच्या दृष्टीनें एक चर्मवस्तू विक्री केंद्र उघडण्यांत आलें आहे.

औद्योगिक सहकारी संघ

ग्रामीण लोकांचें आर्थिक जीवन सध्याच्या यंत्र युगांत शक्यतोवर सुकर व्हावें आणि यासाठीं त्यांना त्यांचा शेतीचा व्यवसाय सांभाळून कांहीं ना कांहीं जोडधंदा द्यावा, पूर्ण वेळ, अर्धवेळ किंवा मोसमी काम द्यावें या धोरणानें या जिल्ह्यांत ग्रामोद्योगाचें कार्य "खादी आणि ग्रामोद्योग मंडळ" या संस्थेच्या वतीनें चालू आहे.

ग्रामोद्योग

जिल्ह्यांतील २५ गांवांतून ७०० अंबर चरखे चालू आहेत. दरसाल ८५,००० रु. ची खादी तयार होते. विधायक कार्यसमिति सांगली, महाराष्ट्र सेवा संघ, पुणें आणि मिरज तालुका खादी ग्रामोद्योग संघ अशा तीन संस्था खादीचें काम करतात.

या जिल्ह्यांतील खानापूर तालुक्यांत, मिरज तालुक्यांत मेंढपाळांची वस्ती बरीच आहे. मेंढ्यांच्या लोकरीचीं घोंगडी विणून ती विकण्यासाठीं जिल्ह्यांत सात सहकारी सोसायट्या आहेत. खादी कमिशनकडून या लोकांना घोंगडी विक्रीवर रिबेट मिळतें.

ग्रामीण भागांत तेल घाण्यांची संख्या ४०० असून त्यांच्याहि सहकारी सोसायट्या स्थापन झालेल्या आहेत. ग्रामोद्योग मंडळाकडून या सोसायट्यांना निरनिराळ्या प्रकारें मदत होत असते.

मधुमक्षिका पालन आणि मधउत्पादन यासाठीं शिराळा पेट्यांतील पेटलोंड या जंगली आणि मागासलेल्या भागांत काम चालू आहे. १७५ लोक ५७५ पेट्या घेऊन हा उद्योग करीत आहेत. या उद्योगामुळें त्या लोकांना प्रपंचासाठीं लागणारा रोख पैसा मिळत आहे.

या शिवाय शेतकऱ्यांना शास्त्रोक्त पद्धतीनें गुळ तयार करावयास शिकविणें, अखाद्य तेल बिया विशेषतः लिंबोणीपासून साबण तयार करणें, ग्रामीण चर्मोद्योग, कुंभारकाम, निरा पाम गूळ, वाख, हात कागद, हातसड तांदूळ, रेशीम वगैरे कामेंहि जिल्ह्यांत ठिकठिकाणीं चालू आहेत.

वीजपुरवठा

सांगली, विश्रामबाग आणि मिरज या भागांत वीजपुरवठा करणें सोयीचें जावें या दृष्टीनें महाराष्ट्र राज्य विद्युत् मंडळानें जानेवारी १९५९ मध्यें सांगली येथें स्वतंत्र विभागीय कार्यालय उघडलें आहे. हें कार्यालय उघडण्याचा मुख्य उद्देश म्हणजे सांगली जिल्ह्यांतील ग्रामीण भागासाठीं मंजूर झालेल्या योजना पार पाडणें व नवीन योजना आंखणें असा आहे. या विभागीय कचेरीच्या उपशाखा एकंदर सहा असून त्या पुढील प्रमाणें आहेत.

विश्रामबाग (डिझेल), विश्रामबाग (डिस्ट्रीब्यूशन), विश्रामबाग (सिव्हिल), जयसिंगपूर, कराड, चिपळूण. त्याचप्रमाणें इस्लामपूर येथें उपविभाग असून तो कोल्हापूर विभागाला जोडलेला आहे.

सांगली जिल्ह्यांत वीजपुरवठा केवळ राधानगरी पॉवर हाऊसकडून अशक्य झाल्यामुळें विश्रामबाग येथें पॉवर हाऊस बांधण्याची योजना १९५७ सालीं मंजूर झाली. ह्या पॉवर हाऊसचें बांधकाम जानेवारी, ५९ मध्यें चालू करण्यांत आलें व एप्रिल, ५९ मध्यें अर्धी इमारत बांधून होतांच ३ डिझेल इंजिन्स चालू करण्यांत आली व जानेवारी १९६० मध्यें सर्व काम पूर्ण करण्यांत आलें. सध्यां विश्रामबागची इन्स्टॉल्ड कपॅसिटी १८०० किलोवॅटस् व फर्म कपॅसिटी १४०० किलोवॅटस् आहे. परंतु एवढी कपॅसिटी मागणीच्या मानानें कमी पडत असल्यानें कोयना डिझेल पॉवर हाऊसचा ५०० किलोवॅटस्चा आणखी एक सेट आणून बसविण्याचें काम चालू आहे. त्याचप्रमाणें सध्याची इमारत वाढविण्याचें व त्यांत २०० किलोवॅटस्चा आणखी एक सेट बसविण्याचें काम मंजूर झालें असून त्यापैकीं इमारतीचें बांधकाम चालू असून सेटची ऑर्डर देण्यांत आली आहे. अशा तऱ्हेनें २ सेटस् बसविल्यास पॉवर हाऊसची इन्स्टॉल्ड कपॅसिटी २६०० किलोवॅटस् व फर्म कपॅसिटी २१०० किलोवॅटस् होईल.

विश्रामबाग सब-स्टेशन

या पॉवर हाऊसमधून ११०० व्होल्टस्च्या मिरज, बुधगांव, सांगली, तीन फिडर्स काढण्यांत आल्या आहेत. मिरज फिडरला सध्यां मिरज व आसपासची गांवें, बुधगांव फिडरला त्या भागांतील गांवें व सांगली फिडरला सांगली-हरीपूर-अष्टे हा भाग जोडलेला आहे.

इस्लामपूर येथें १९५० सालीं १५० किलोवॅटस् क्षमतेचें पॉवर हाऊस बांधून इस्लामपूर शहर व पेठ ह्या ठिकाणांना विद्युत्पुरवठा सुरूं करण्यांत आला. त्यांतूनच आणखी कांहीं गांवांना पुरवठा करण्यांत आला. १९५९ सालीं या पॉवर हाऊसमध्यें २५० कि.वॅ. चा आणखी एक जनरेटिंग सेट

वसविण्यांत आला. सध्यां ह्या पॉवर हाऊसमधून इस्लामपूर शिवाय सात खेडेगावांना विद्युत्पुरवठा करण्यांत येत आहे. त्याचप्रमाणें विश्रामबाग प्रमाणें हे पॉवर हाऊस सुद्धां राधानगरी पॉवर हाऊसला जोडलेलें आहे.

इस्लामपूर पॉवर हाऊस

१९५८ सालीं सांगली विभागांतील ५ खेडे गांवांना वीजपुरवठा करण्याची योजना मंजूर झाली. नंतर १९५९ सालीं या जिल्ह्यांतील १० खेडेगांवें व लिफ्ट इरिगेशन सोसायटचांना वीज-पुरवठा करण्याच्या योजना मंजूर करण्यांत आल्या. पुढें १९५९ मध्यें बऱ्याच खेडेगांवांची पाहणी करण्यांत आली. त्यापैकीं ४४ गांवांच्या योजना मंजूर झाल्या आहेत. प्रथमपासून आजपर्यंत सांगली जिल्ह्यांतील ६५ खेडेगांवांना वीजपुरवठ्याच्या योजना मंजूर करण्यांत आल्या आहेत. त्यापैकीं २६ गांवांचीं कामें पुरी झालीं असून प्रत्यक्ष विद्युतपुरवठा चालू आहे. बाकीच्या गांवांचीं कामें क्रमाक्रमानें चालू होतील.

ग्रामीण भागांना वीज पुरवठा

सध्यां मिरज व बुधगांव या खाजगी वीजपुरवठा कंपन्यांना त्याचप्रमाणें माधवनगर येथील कॉटन मिल्स व साखर कारखाना यांना विश्रामबाग पॉवर हाऊसमधून वीजपुरवठा होत असतो.

डिसेंबर १९६० पर्यंत अंकली, धामणी, हरीपूर, क. डिग्रज, तुंग, अष्टे, बुधगांव, कवलापूर, पद्माळे, कर्नाळ, नांद्रे, म्हैसाळ, मालगांव, वेडग, अरग, इस्लामपूर, पेठ, नेर्ले, कासेगांव, कामेरी, येडे निपाणी, तांदुळवाडी, शिरोळ, शिरगांव, वागणी, कुंडलवाडी. या गांवांना वीज पुरविण्याची सोय करण्यांत आली आहे

शिवाय खाजगी कंपन्यांमार्फत मिरज, माधवनगर, तासगांव, व सांगली या गांवांना वीज पुरवठा चालू आहे.

मल्लेवाडी, एरंडोली, सलगरे, नरवाड, कळंबी, कवठेएकंद, चिंचणी, कुपवाड, बिसूर, कुमठे, भोसे, देशींग, बोरगांव, शिरढोण, मळणगांव, कवठे महांकाळ, हिंगणगांव, डिग्रजखूर्द, वसगडे, भिलवडी, येळावी, बावची, समडोळी, कवठेपिरान, दुधगांव, अंकलखोप, खंबाळा औंध, कडेगांव, कडेपूर, हिंगणगांव, तडसर, वांगी, चिंचणी, अमरापूर, हणमंतवडिये, चिखली, कांदे, मांगले, सांगाव, नाटोली व इटकरे या गांवांना वीजपुरवठा करण्याबाबत विद्युत् मंडळानें मंजुरी दिली असून प्राथमिक तयारीचें काम चालूं आहे.

सध्यां मिरज व बुधगांव या खाजगी वीजपुरवठा करणाऱ्या कंपन्यांनां त्याचप्रमाणें माधवनगर येथील कॉटन मिल्स व साखर कारखाना यांना विश्रामबाग पॉवर हाऊसमधून वीजपुरवठा होत असतो.

लायसेन्सीज व मोठें उद्योग-धंदे यांना विद्युत्पुरवठा

तसेंच धामणी, हरीपूर, म्हैसाळ व सांगलीवाडी येथील लिफ्ट इरीगेशन सोसायटचांना वीज-पुरवठा विश्रामबाग पॉवर हाऊसमधून होत असतो. याशिवाय सांगली पद्माळे व निलजी अशा सोसायटचांना वीज देण्याच्या योजना मंजूर झाल्या आहेत.

वीज बोर्डातर्फे वीजपुरवठा करण्यांत येत असलेल्या इस्लामपूर-विश्रामबाग पॉवर हाऊस भागांत एकूण ३९०० ग्राहक आहेत व ३३४२ के. डब्ल्यू. जोडलेले लोड आहे. दररोज सरासरी २८००० युनिटस् वीज वापरली जाते. अर्थात् मागणी बरीच मोठी आहे. परंतु उत्पादनशक्ति कमी असल्यामुळें तेवढा पुरवठा होऊं शकत नाहीं. यामुळें कोयनेहून अपेक्षिलेल्या वीजपुरवठ्याकडे सर्वांचेच डोळे लागून राहिले आहेत.

कोयना योजनेची वीज

कोयना योजनेचा पहिला टप्पा १९६१ च्या शेवटच्या सुमारास पूर्ण होईल असा अंदाज आहे. कोयनेची विद्युत्शक्ति या भागांत आणण्यासाठीं कराड ते विश्रामबाग ११० हजार व्होल्टेजची एक ट्रॅन्स्मिशन लाईन उभारणीचें काम चालू आहे व विश्रामबाग येथें स्टेपडाऊन सब् स्टेशन उभारून ३३ हजार व्होल्टच्या विश्रामबाग ते किर्लोस्करवाडी, विश्रामबाग ते जत, विश्रामबाग ते कोल्हापूर या तीन फिडर्स काढण्याचे सुचविण्यांत आलें आहे.

त्याचप्रमाणें ११००० व्होल्टस्च्या सध्याच्या तीन फिडर्स राहाणार आहेत.

कोयनेच्या विद्युत्पुरवठ्याचा जास्तीत जास्त फायदा खेडेगांवांत लहान लहान उद्योगधंदे, पाणीपुरवठा योजना व शहरांतील सध्याची मागणी भागवून मोठमोठ्या नवीन उद्योगधंद्यांना घेतां येईल, अशी अपेक्षा आहे.

शैक्षणिक वाटचाल

सांगली जिल्ह्याची निर्मिति ता. १ ऑगस्ट १९४९ रोजीं झाली. त्यावेळीं या जिल्ह्यांतील शिक्षणकारभार शिक्षणाधिकारी पुणें विभाग यांच्या देखरेखीखालीं होता. त्यानंतर, जिल्ह्यांतील शिक्षणकार्य आणि कारभार लक्षांत घेऊन प्रत्येक जिल्ह्याला एक शिक्षणाधिकारी नेमण्याचें धोरण राज्य सरकारनें स्वीकारलें आणि त्याप्रमाणें प्रारंभी कोल्हापूर आणि सांगली या दोन जिल्ह्यांसाठीं एक अधिकारी कोल्हापूरास ठेवण्याचा निर्णय राज्य सरकारनें घेतला. पण अवघ्या दोनच वर्षांत या जिल्ह्यासाठीं स्वतंत्र शिक्षणाधिकारी आणि कचेरी देण्यांत आली. (१९५५)

शैक्षणिक प्रगति

सध्यां या जिल्ह्यांत पूर्व प्राथमिक, प्राथमिक, प्राथमिक प्रशिक्षण, दुय्यम, दुय्यम प्रशिक्षण, दुय्यम तांत्रिक, उच्च शिक्षण, तांत्रिक उच्च शिक्षण, शारीरिक शिक्षण, चित्रकला, संगीत इत्यादि विविध प्रकारचें शिक्षण मिळण्याच्या सोयीं आणि संस्था आहेत. मान्यता मिळालेल्या पूर्वप्राथमिक शाळा १३ असून त्यांत ५०२ मुलें शिक्षण घेतात. या शिवाय ९७० प्राथमिक शाळा आणि ८५ खाजगी शाळा आहेत. त्यांत ७८ मराठी, ३ कानडी, १ गुजराती आणि १ उर्दू आहे. ९७० प्राथमिक शाळां-पैकीं ८८० मराठी, १ गुजराती, ५३ कानडी, १३ उर्दू, १ सिंधी व १ इंग्रजी माध्यम असलेल्या आहेत. त्यांत शिक्षण घेणाऱ्यांची संख्या १,६०,२६० आहे. त्यांत १७२ विद्यार्थी गुजराती शाळेंत, ४,४०७ कानडी शाळेंत, ५,०६८ उर्दू, १२१ सिंधी शाळेंत व ८५ इंग्रजी शाळेंत शिकत आहेत. या जिल्ह्यांत असे एकहि खडें नाहीं कीं जेथें प्राथमिक शिक्षणाची सोय नाहीं.

प्राथमिक शिक्षण

प्राथमिक शिक्षणाची व्यवस्था जिल्हा शिक्षण मंडळामार्फत (जिल्हा स्कूल बोर्ड) चालते. जिल्हा शिक्षण मंडळाची सभासद संख्या १६ असून एक शासनाधिकारी आणि चार उपशासनाधिकारी यांच्या मार्फत तें आपला कारभार पाहते. सर्व शाळांची शैक्षणिक तपासणी उपशिक्षणाधिकारी आपल्या १८ सहकाऱ्यांच्या साहाय्यानें करतात.

प्राथमिक शाळांच्या स्वतःच्या ६६४ इमारती असून शिवाय ५१६ भाडयानें घतलेल्या आहेत. त्याशिवाय शाळेसाठीं वापरण्यास मोफत मिळालेल्या इमारतींची संख्या ६४५ आहे. प्राथमिक शाळांच्या इमारतींची तरतूद करण्यासाठीं एक इमारत समिती नेमलेली असून तिच्या मार्फत भरपूर प्रकाश आणि हवा असलेल्या इमारती बांधण्याचा प्रयत्न चालू आहे. सध्यां या मंडळामार्फत ६ गांवांतून ४६ खोल्यांच्या इमारती बांधण्याचें काम चालू असून त्यासाठीं १,०६,६३७ रु. रक्कम मंजूर

करण्यांत आली आहे. प्राथमिक शिक्षण मंडळाच्या शाळांतून काम करणाऱ्या शिक्षकांची संख्या ४,२४० असून त्यापैकीं ३,३०१ शिक्षक प्रशिक्षित आहेत. खासगी शाळेंत काम करणाऱ्या शिक्षकांची संख्या २५७ असून त्यांतील १०८ प्रशिक्षित आहेत.

प्राथमिक शिक्षण मंडळाच्या १०६ शाळांतून मूलोद्योगाचें शिक्षण दिलें जातें. ही मूलोद्योग योजना १९४९ पासून अंमलांत आहे. या योजनेप्रमाणें सूतकताई, विणकाम, शेती, बागकाम, पुठ्ठा-काम आणि लांकूडकाम इत्यादि शिक्षण दिलें जातें. मूलोद्योग शिक्षण देणाऱ्या ४६ पूर्णावस्थेंतील आणि ६० इतर शाळा आहेत. सूतकाम आणि विणकामाचें शिक्षण घेणारे विद्यार्थी ८५४१ असून शेतीशिक्षण घेणारे १४१४ आहेत. सुतार कामाचें शिक्षण घेणारे ९१२ विद्यार्थी आहेत.

दुय्यम शिक्षण

या जिल्ह्यांत दुय्यम शिक्षण देण्याचें काम प्रामुख्यानें खासगी संस्थांमार्फत चालू आहे. सरकार या संस्थांना आर्थिक साहाय्य देऊन देखरेख करतें. ९०० रु. उत्पन्नाच्या आंतील गरीब मुलांकरितां शिक्षण मोफत करण्याचें सरकारी धोरण आहे. पालकांची वार्षिक उत्पन्नाची ९०० रु. ची मर्यादा आतां १२०० रु. झाली आहे. या सवलतीचा फायदा घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या १९५९-६० सालांत १२,००० होती.

शहरांत आणि तालुक्याच्या ठिकाणीं दुय्यम शिक्षणासाठीं दूरवरून खेड्यांतून येणाऱ्या विद्यार्थ्यांसाठीं निरनिराळ्या ठिकाणीं २३ वसतिगृहें आहेत. जातीभेद न मानतां खासगी संस्थांच्या-कडूनच ही वसतिगृहें चालविलीं जातात आणि ८५६ विद्यार्थी यांचा फायदा घेतात.

जिल्ह्यांत एकूण दुय्यम शिक्षणाच्या शाळा ९६ आहेत. त्यांत १५,५९९ विद्यार्थी शिकतात. एकूण शाळांपैकीं फक्त ४ शाळा या केवळ मुलींसाठीं आहेत. त्यांतून २,५५५ मुली शिकतात . दुय्यम शाळांची विभागवारी ४१ शहरीं आणि ५५ ग्रामीण विभाग अशी आहे. या सर्व शाळांतील शिक्षकांची संख्या ६२४ असून प्रत्येक शाळेंत एकतरी शारीरिक शिक्षण देणारा शिक्षक असावा असा प्रयत्न केला जातो. पुष्कळशा दुय्यम शाळांतील मुलें जिल्हा क्रीडास्पर्धेत मोठ्या संख्येनें आणि उत्साहानें भाग घेतात.

प्राथमिक शिक्षकांना प्रशिक्षण देणाऱ्या ६ स्वतंत्र संस्था असून त्यांतील दोन केवळ स्त्रियांसाठीं आहेत. त्यांतील एक सरकारी असून बाकीच्या खासगी संस्थांमार्फत चालविल्या जातात.

निरक्षर प्रौढांना साक्षर करण्याचे प्रयत्न चालू असून १९५९-६० सालीं २६०२ प्रौढ साक्षर झाले. समाज शिक्षणाचें कार्य विकास गटांमार्फत चालू आहे. प्रौढ साक्षर पुनः निरक्षर होऊ नयेत म्हणून या जिल्ह्यांत ३४२ वाचनालयें चालू आहेत.

दुय्यम शाळांतील शिक्षकांना शिक्षणपद्धतीची आणि शिक्षणशास्त्राची माहिती देणाऱ्या कांहीं संस्था या जिल्ह्यांत आहेत. सांगली, मिरज आणि इस्लामपूर या ठिकाणीं हें काम चालतें. १९५९-६० या वर्षी १७५ शिक्षक विद्यार्थी या शाळांतून शिकत होते.

शारीरिक शिक्षण देणाऱ्या दोन संस्था इस्लामपूर आणि मिरज येथें आहेत. त्यांत १३२ विद्यार्थी शिकत आहेत.

दिवसभर काम करूनहि दुय्यम शिक्षण घेऊं इच्छिणाऱ्यांसाठीं एक नाईट हायस्कूल (रात्रीची शाळा) एक खासगी संस्था चालवितें. तिचाहि फायदा बरेंच विद्यार्थी घेतात.

उच्च शिक्षण

सांगलीस डेक्कन एज्युकेशन सोसायटीनें चालविलेल्या विलिंग्डन कॉलेजांत उच्च शिक्षण देण्यांत येतें. कला आणि शास्त्र (आर्टस् अँड सायन्स) या दोनहि शाखांचें शिक्षण तेथें मिळतें. तेथें एम्. ए. आणि एम्. एस्. सी. पर्यंतच्या शिक्षणाची सोय आहे. याशिवाय विश्रामबागलाच वालचंद इंजिनियरिंग कॉलेज असून तेथें पदवी आणि प्रमाण-पत्र (डिग्री आणि डिप्लोमा) शिक्षण मिळतें. या खरीज सांगलीस लठ्ठे एज्यु. सोसायटीनें जून १९६० पासून सांगली कॉलेज सुरूं केलें आहे. या तीनहि महाविद्यालयांतून शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या अनुक्रमें १३१०, ७२० आणि १८४ आहे. जून १९६०पासून डेक्कन एज्यु. सोसायटीनें सांगलीच्या राजेसाहेबांच्या नांवानें चिंतामणराव कॉमर्स कॉलेज विश्रामबागेंत सुरू केले असून या कॉलेजमध्यें सध्यां १५६ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. याशिवाय आयुर्वेदाचें शिक्षण देणारें आत्रेय महाविद्यालय असून त्याचा फायदा विद्यार्थी घेतात. उच्च शिक्षणाची वाढती गरज लक्षांत घेऊन या जिल्ह्यांतील कांहीं तालुक्यांच्या ठिकाणीं महाविद्यालयें स्थापन करण्याचा प्रयत्न निरनिराळया शैक्षणिक संस्था करीत आहेत.

समाज कल्याण

सांगली जिल्ह्यांत मागासलेल्या वर्गाच्या उन्नतीचें कार्य करण्याकरितां समाज कल्याण विभागातर्फे १९५५ मध्यें एका स्वतंत्र अधिकाऱ्याची नेमणूक करण्यांत आली असून त्यांचें कार्यालय सांगली येथें आहे. त्यापूर्वी या जिल्ह्यांतील मागासलेल्या वर्गाच्या उन्नतीचें कार्य कोल्हापूर येथील समाज कल्याण अधिकारी पाहात असे. समाज कल्याण विभागामार्फत या जिल्ह्यांत चालू असलेल्या कार्याची रूपरेषा पुढीलप्रमाणें आहे :

या विभागामार्फत हरिजन, आदिवासी, भटक्या व निमभटक्या जमाती, विमोचित जाती आणि आर्थिकदृष्टचा मागासलेला इतर वर्ग यांच्या उन्नतीचें कार्य केलें जातें.

शैक्षणिक सवलती

ज्यांचे वार्षिक उत्पन्न रु. ९०० किंवा त्यापेक्षां कमी आहे अशा पालकांच्या पाल्यांना शिक्षण क्षेत्रांत सर्व पातळीवर नादारी देण्याची योजना राज्य सरकारनें १९५९-६० सालीं अमलांत आणली. या योजनेचा फायदा त्या वर्षी सांगली जिल्ह्यांत ७००० विद्यार्थ्यांनीं घेतला व त्यावर सरकारला रु. ६,००,००० खर्च आला.

१९६०-७१ सालीं सरकारनें वार्षिक उत्पन्नाची मर्यादा रु. १२०० पर्यंत केली. त्याचा परिणाम या योजनेचा फायदा घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या वाढण्यांत झाला. चालू वर्षी (१९६०-६१) या योजनेखालीं १२,००० विद्यार्थ्यांना नादारी देण्यांत आली असून त्यासाठीं अंदाजे रु. ११,००,००० खर्च येईल.

याशिवाय मागासलेल्या जातीच्या विद्यार्थ्यांना नादारी देण्याची स्वतंत्र सोय आहे. या जातींच्या विद्यार्थ्यांना वार्षिक उत्पन्नाची अट नाहीं. या योजनेचा या जिल्ह्यांतील हरिजन विद्यार्थी प्रामुख्यानें फायदा घेतात. कारण जिल्ह्यांत हरिजनांची लोकसंख्या सुमारें ७५,००० असून त्या मानानें आदिवासी व विमोचित जमाती यांची लोकसंख्या कमी आहे. हरिजन विद्यार्थ्यांना नादारी देण्याची सोय गेल्या अनेक वर्षापासून असून मागासवर्गातील हुशार व होतकरू विद्यार्थ्यांना शिष्यवृत्त्या देण्यांत येतात. या योजनेखालीं मागासवर्गातील अनेक विद्यार्थ्यांना फायदा देण्यांत आलेला आहे. खालील आंकडयांवरून आपणांस याची कल्पना येईल.

योजनेचें नांव	सन	खर्च	विद्यार्थ्यांची संख्या
हरिजनांना शिष्यवृत्ति, नादारी आणि परीक्षा फी	१९५७–५८	रु. ४२,१९७	९८९
	५८–५९	,, ५०,८३४	११३५
	५९–६०	,, ५१,८९५	१५८९
इतर मागासलेल्या जमातींना शाळा कॉलेजांत नादारी	१९५७–५८	,, ८,००३	३५०
	१९५८–५९	,, ८,५६७	२००
	१९५९–६०	,, ४,५००	१०२
भटक्या व निमभटक्या जमातींना शिष्यवृत्त्या	१९५९–६०	,, २,०००	२७
विमुक्त जातींच्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ति, परीक्षा फी आणि शाळा कॉलेजांतून नादारी	१९५९–६०	,, १,९६७	१३

वसतिगृहें

खेडयापाडयांतील मागासवर्गातील विद्यार्थ्यांना शिक्षणाची सोय असलेल्या ठिकाणीं खाण्या-पिण्याची व राहाण्याची सोय मोफत असणारी वीस वसतिगृहें या जिल्ह्यांत चालविलीं जात असून सुमारें २५०० विद्यार्थी यांचा फायदा घेत आहेत. या सर्व वसतिगृहांना समाजकल्याण विभागाकडून आर्थिक साहाय्य दिलें जातें. याशिवाय १९६०–६१ सालीं ११ नवीन वसतिगृहें सुरू झालीं असून त्यांना सरकारी मान्यता देण्याबाबत समाजकल्याण विभागाचा विचार चालू आहे. अस्पृश्यता निवारणाला उत्तेजन देण्याच्या हेतूनें प्रत्येक मागासवर्गातील विद्यार्थी वसतिगृहामध्यें किमान १० टक्के गरीब सवर्ण हिंदु विद्यार्थी घेतल्यास सरकार मदत देते. याचाच अर्थ असा कीं, वसतिगृहाची सोय हरिजनेतरांनाहि उपलब्ध झाली आहे.

सांगली जिल्ह्यांत सरकारी मदत मिळत असलेली वसतिगृहें पुढील ठिकाणीं आहेत :

(१) तालुका मिरज – सांगली ६, मिरज २, कवठेमहांकाळ १.
(२) तालुका तासगांव – रामानंदनगर १, तासगांव १, कुंडल १.
(३) वाळवा तालुका – इस्लामपूर २, वाळवे १, अष्टे २, कासेगांव १, गोटखिंडी १.
(४) तालुका खानापूर – वीटे १, खानापूर १, तडसर १, रेणावी १, आटपाडी ३, माहुली १.
(५) पेटा शिराळा – शिराळा १, आरळे १.
(६) तालुका जत – जत १.

या प्रमुख योजनांशिवाय मागासवर्गातील उन्नतीच्या अनेक योजना आहेत. त्यांपैकी महत्त्वाच्या कांहीं योजना खाली दिल्या आहेत. या योजना सांगली जिल्हा विकास मंडळाच्या समाज कल्याण उपसमितीच्या सल्ल्यानें आणि मार्गदर्शनानें अंमलांत आणल्या जातात. या योजना या जिल्ह्यांस लागू झाल्या असून निरनिराळ्या योजनेखाली पुढील प्रमाणें खर्च झाला आहे.

ही योजना गेल्या वर्षापासून सुरूं झाली आहे. ज्या हरिजनांना घर बांधण्यासाठीं जागा नसेल अशा हरिजनांना सरकारी खर्चानें जास्तीत जास्त रु. २०० पर्यंत किंमतीची मोफत जागा घेऊन दिली जाते. जागा हरिजनांच्या नांवे केली जाऊन हरिजनांस आपल्या मर्जीनुसार घर बांधतां येतें. गेल्या वर्षी या जिल्ह्याकरितां रु. ४००० मंजूर झाले होते व त्याचा फायदा २० हरिजनांनीं घेतला. चालू वर्षी रु. ३२०० मंजूर झाले असून १६ हरिजनांना या योजनेचा फायदा मिळाला आहे.

घर बांधण्यासाठीं मोफत जागा

हरिजनांना घराच्या किरकोळ दुरुस्तीसाठीं एका हरिजनास अधिकांत अधिक रु. १०० किंमती पर्यंत पत्रें लांकूड इ. साहित्य किंवा रोख दिले जातात. गेल्या वर्षी या योजनेखालीं रु. ४००० मंजूर झाले होते व ४० गरजू हरिजनांनीं या योजनेचा फायदा घेतला. चालू वर्षी या योजनेस रु. ४६०० मंजूर झाले असून एकूण ४६ गरजू हरिजनांना या योजनचा फायदा देण्यांत आला आहे.

घर दुरुस्तीसाठीं मदत

ही योजना हरिजनांसाठीं असून किरकोळ म्हणजे फेरीचा धंदा, शिंपीकाम, पानाचें दुकान, वाजंत्रीचे साहित्य, छत्र्या दुरुस्ती, वीटा करणें, कुंभार काम करणें, वाहतुकीच्या गाडीसाठीं बैल खरेदी करणें, यासारख्या धंद्यांकरिता जास्तीत जास्त रु. ५०० पर्यंत दिले जातात. यांपैकीं रु. ३७५ बिनव्याजी कर्ज आणि रु. १२५ मदत म्हणून दिले जातात. हे कर्ज बिनव्याजी असून वार्षिक हप्त्यांनीं १० वर्षांत फेडावयाचे असते. या योजने नुसार ह्या जिल्ह्यास गतवर्षी रु. ४००० मंजूर झाले होते व हरिजनांना या योजनेचा फायदा दिला गेला. चालू वर्षी या जिल्ह्यास रु. ६००० मंजूर झाले आहेत.

घरगुती धंद्यासाठीं मदत आणि कर्ज

या जिल्ह्यांतील गरजू हरिजनांना प्रत्येकी एक याप्रमाणें जातिवंत गाय खरेदी करण्यास जास्तीत जास्त रु. ३०० (१५० रु. मदत अधिक १५० रु. बिनव्याजी कर्ज) मिळतात. कर्जाची फेड वार्षिक १० हप्त्यांनीं करावयाची असते. गेल्या वर्षी रु. १२०० मंजूर झाले होते. त्यापैकीं रु. ६०० मदत व रु. ६०० बिनव्याजी कर्ज देण्यात आले. चालू वर्षी या योजनखालीं रु. १५०० मंजूर झालेले आहेत. त्यापैकीं रु. ७५० कर्ज व रु. ७५० मदत आहे.

जातिवंत गाईंसाठीं मदत व कर्ज

हरिजन वस्तींतील किंवा आसपासच्या विहिरी (ज्यांचा पिण्याच्या पाण्यासाठीं उपयोग हरिजन करतात) दुरुस्तीसाठीं प्रत्येक विहिरीस रु. ७५० मदत दिली जाते. गेल्या वर्षी या योजनेखालीं रु. ५२५० मंजूर झाले होते. चालू वर्षी रु. ३५०० मंजूर झालेले आहेत.

पिण्याच्या पाण्याच्या विहिरी दुरुस्तीस मदत

हरिजनांना ज्या गांवीं पिण्याच्या पाण्याकरता, नव्या विहिरीची जरुरी असेल अशा गांवीं नव्या विहिरीसाठीं रु. १००० मदत दिली जातें. गेल्या वर्षी या जिल्ह्यांत रु. ७००० मंजूर झाले होते. सात निरनिराळ्या गांवीं विहिरी बांधण्यांत आल्या. चालूं वर्षी या योजनेखालीं या जिल्ह्यांत रु. ९००० मंजूर झाले आहेत.

पाण्याच्या विहिरींसाठीं मदत

(अ) विमुक्त जातींच्या शेतकऱ्यांना नांगराचे बैल देण्यासाठीं चालूं वर्षीं रु. १००० मंजूर झाले आहेत. त्यांतून विमुक्त जातीच्या चार गरजू लोकांना नांगराचे बैल घेण्यास मदत देण्यांत आली आहे.

विमुक्त जातीसाठीं

(ब) विमुक्त जातींच्या लोकांना दुभती जनावरे घेण्यासाठीं मदत म्हणून रु. १५० व रु. १५० बिनव्याजी कर्ज म्हणून मंजूर केले आहे. त्याचा फायदा चार गरजू विमुक्त जातींच्या लोकांनीं घेतला आहे.

(क) विमुक्त जातींच्या लोकांना किरकोळ घरगुती धंद्यासाठीं रु. २५० मंजूर झाले असून चालू वर्षी या योजनेखालीं चार गरजू विमुक्त जातींतील लोकांना फायदा देण्यांत आला आहे.

मागास वर्गीयांना जमिनी देण्याची योजना

भूमिहीन मागास वर्गीयांना शेतीची जमीन देण्याबाबत प्राधान्य देण्याची सरकारी योजना आहे. त्याप्रमाणें या जिल्ह्यांत अनेक मागास वर्गीय भूमिहीन शेतकऱ्यांना जमिनी देण्यांत आलेल्या आहेत. तथापि अलिकडे कोयना योजनेमुळें निर्वासित होणाऱ्या लोकांचें पुनर्वसन करण्यासाठीं या जिल्ह्यांत ही योजना स्थगित झाली आहे. या जिल्ह्यांत मागास वर्गीयांच्या ६० सहकारी शेती संस्था असून त्यांना १५०२ एकर जमीन लागवडीसाठीं देण्यांत आली आहे.

मागास वर्गीयांच्या सहकारी गृह निर्माण संस्था

या जिल्ह्यांत मागासलेल्या वर्गाच्या सहकारी तत्त्वावर चालविलेल्या २९ गृह-निर्माण संस्था आहेत. अशा सहकारी संस्थांचे सभासद असलेल्या मागास वर्गीय शेतकरी सभासदांस घर बांधण्याकरितां २ गुंठे जमीन सरकारी खर्चानें मोफत देण्यांत येते व घर बांधण्याकरितां प्रत्येकी रु. १५०० देण्यांत येतात. या रकमपैकीं २५ टक्के मदत व ५० टक्के बिनव्याजी कर्ज असून उरलेला २५ टक्के खर्च सभासदांनीं स्वत: करावयाचा असतो.

या योजनेशिवाय समाज विकास विभागातर्फे मागासलेल्या जमातींच्या लोकांना सरकारी व निमसरकारी खात्यामधून नोकऱ्या मिळण्यासाठीं नांवे नोंदवून त्या त्या खात्याकडे योग्य वेळीं व योग्य उमेदवारांना मुलाखतीसाठीं बोलावता यावें म्हणून पाठविली जातात. ही सोय १९५५ सालापासून या विभागातर्फे सुरू झाली असून आतापर्यंत सुमारें २५०० लोकांनीं आपली नांवे नोंदविली आहेत. त्यांपैकीं ५०० मागास वर्गीय उमेदवारांना नोकऱ्या मिळाल्या आहेत.

अस्पृश्यता निवारण मोहीम

सन १९६१ अखेरपर्यंत अस्पृश्यतेचे समूळ उच्चाटन करण्याचा संकल्प महाराष्ट्र सरकारनें केलेला आहे. ही मोहीम यशस्वी करण्याची जबाबदारी समाज कल्याण विभागाकडे सोंपविण्यांत आलेली आहे. त्या दृष्टीनें सांगली जिल्ह्यानें अस्पृश्यता निवारण्याचे कार्य यशस्वी रीतीनें केलें आहे. अस्पृश्यता निवारण्याच्या योजनेखालीं या जिल्ह्यांत तीन प्रचारक जिल्हा समाज कल्याण अधिकाऱ्यांच्या देखरेखीखालीं अस्पृश्यता निवारणाचें कार्य करीत आहेत. तसेंच दर वर्षीं हरिजन दिन मोठ्या उत्साहानें पाळण्यांत येत असे. गेल्या चार वर्षांपासून हरिजन दिनाऐवजी अस्पृश्यता निवारण सप्ताह सरकारी आदेशानुसार व्यापक प्रमाणांवर साजरा करण्यांत येतो. यंदाचा सप्ताह दिनांक २५ डिसेंबर ते ३१ डिसेंबर १९६० पर्यंत नुकतांच यशस्वी रितीनें साजरा

करण्यांत आला. गेल्या वर्षापासून अस्पृश्यता निवारणाची खास मोहीम सरकारनें या जिल्ह्यांत सुरू केलेली आहे. हें कार्य अखंड चालू ठेवण्याच्या दृष्टीनें जिल्ह्याच्या ठिकाणीं, तालुक्यांचे ठिकाणीं व तालुक्याचे आणखी विभाग पाडून त्या विभागाच्या ठिकाणीं अस्पृश्यता निवारण समित्या स्थापन करण्यांत आल्या आहेत. या समित्यांच्या चिटणीसांचे काम करण्याकरितां तालुकानिहाय एक याप्रमाणें सहा सेवक नेमण्यांत आलेले आहेत. या समित्या महिन्यांतून एक सभा घेतात. त्यामध्यें अस्पृश्यता निवारण्याच्या कार्याचा आढावा घेतला जातो व पुढील धोरण आंखण्यांत येऊन त्यांची अंमलबजावणी झाली आहे कीं नाहीं हें पाहण्यांत येतें. या मोहिमेला पूरक म्हणून सरकारमार्फत पुढील योजना अंमलांत येत आहेत.

ही योजना १९५३–५४ सालापासून अंमलांत आली असून दरवर्षी अस्पृश्यता निवारणाच्या कार्यांत प्रशंसनीय कामगिरी करणाऱ्या दोन खेडयांना अनुक्रमे पहिले रु. १००० चें व दुसरें रु. ५०० चें अशीं रोख रकमेचीं दोन बक्षिसें दिलीं जातात. त्याच प्रमाणें आतापर्यंत या योजनेखालीं १६ खेडयांनीं बक्षिसें मिळविलीं आहेत.

दरवर्षी दोन खेडयांना बक्षिसें

हरिजन बालकांसाठीं बालवाडी चालविणाऱ्या स्वयंस्फूर्त संस्थांना अनुदान देण्याची एक योजना आहे. या योजनेप्रमाणें अशा संस्थांना बालवाडीच्या एकूण खर्चाच्या ८० टक्के अनुदान दिलें जातें. या योजनेखालीं शिराळा महालांतील चरण येथें एक बालवाडी चालविली जात आहे.

बालवाडी

हरिजनांसाठीं संस्कार केंद्रें चालविणाऱ्या स्वयंस्फूर्त संस्थांना अनुदान देण्याची एक योजना असून चालू वर्षी या जिल्ह्यास रु. ३४८० मंजूर झाले आहेत. या जिल्ह्यांत सावळज व रामानंद नगर या दोन ठिकाणीं या योजनेखालीं संस्कार केंद्रें चालविलीं जात आहेत.

संस्कार केंद्रें

जो सवर्ण हिंदू घरमालक सवर्ण वस्तींतील आपले घर हरीजनांस भाडयानें देईल अशा घरमालकांस ठरलेल्या घरभाडयाच्या ५० टक्के अधिक रक्कम उत्तेजनार्थ मदत म्हणून दिली जाते. या योजनेखालीं गेल्या वर्षी या जिल्ह्यास रु. २५० मंजूर झाले होते व सवर्ण हिंदूंना त्याचा फायदा मिळाला. चालू वर्षी रु. २०० मंजूर झाले असून ते सवर्ण हिंदूंनीं आपली सवर्ण वस्तींतील घरे हरीजनांना भाडयानें दिल्याबद्दल उत्तेजनार्थ मदत म्हणून दिले आहेत.

सवर्ण वस्तींत हरिजनांस भाडयानें घर

स्पृश्यास्पृश्यांतील मिश्र विवाहास प्रोत्साहन देऊन त्यांच्या संततीस हरिजनांना मिळणाऱ्या सर्व सवलती देण्यांत येतात. तसेंच अशा दांपत्याचा सरकारमार्फत सन्मान केला जातो. इस्लामपूर येथील चांभार समाजांतील मुलीचा कोल्हापूर जिल्ह्यांतील जैन धर्मीय तरुणाशीं १९५८ सालीं आंतरजातीय विवाह झाला आहे.

आंतरजातीय विवाहास उत्तेजन

हौशी नाटचसंस्थांना उत्तेजन देण्याकरितां राज्य सरकारतर्फे गेल्या सात वर्षांपासून दरवर्षी नाटचमहोत्सव साजरा केला जातो. सांगली जिल्ह्यास प्रादेशिक नाटचमहोत्सव साजरा करण्याचा मान आतांपर्यंत तीनदा मिळालेला आहे. पहिला प्रादेशिक नाटचमहोत्सव

नाटचमहोत्सव

१९५३ सालीं, दुसरा १९५८ सालीं व तिसरा नुकतांच १९६० सालीं सांगली येथें मोठ्या थाटानें साजरा करण्यांत आला. सांगली केंद्रावर १९५८ सालीं एकूण १७ हौशी नाटच संस्थांनीं व १९६० सालीं १३ हौशी नाटचसंस्थांनीं भाग घेतला होता.

कलाकारांना आर्थिक साहाय्य

ज्या कलाकारांनीं आपलें जीवन नाटच, लोकनाटच, संगीत, चित्रकला, शिल्पकला, लेखन-कला इ. क्षेत्रांत खर्ची घातले आहे परंतु उतारवयांत जे आर्थिक दृष्टचा अडचणींत आले आहेत अशा नामवंत कलाकारांना राज्य सरकार आणि भारत सरकार आर्थिक साहाय्य देते. या योजनेचा या जिल्ह्यांतील अनेक नामवंत कलाकारांना फायदा मिळत आहे.

गुन्हेगारांची सुधारणा

"बॉम्बे प्रोबेशन ऑफ ऑफेण्डर्स ॲक्ट–१९३८" या सामाजिक कायद्यान्वये जिल्ह्यांतील कोर्टांनीं पाठविलेल्या प्रौढ गुन्हेगारांच्या प्रकरणाची चौकशी करून त्यांना तुरुंगांत न पाठवितां बाहेर ठेवणें शक्य आहे किंवा नाहीं व असल्यास तें कशा प्रकारें, याबद्दलची माहिती संबंधित कोर्टांना पुरविण्याकरितां एका स्वतंत्र अधिकाऱ्याची नियुक्ति करण्यांत आली आहे. या अधिकाऱ्याच्या शिफारसीनुसार कोर्टानें प्रौढ गुन्हेगारांना चांगल्या वर्तणुकीच्या अटीवर आरोप सिद्ध झाल्यानंतर वरील कायद्याच्या आधारें सोडले तर त्यांच्यावर देखरेख ठेवणें व समाजामध्यें स्थैर्य आणून देण्याकरितां त्याला मदत करणें हेहि सदर अधिकाऱ्याचें काम आहे. हें काम समाज कल्याण खात्याच्या संचालकाच्या वतीनें जिल्ह्यांत करण्यांत येतें. सांगली जिल्ह्यास हा कायदा १९५८ सालीं लागू करण्यांत आला. ऑक्टोबर १९६० पर्यंत सांगली जिल्ह्यांतील २४० प्रौढ गुन्हेगारांना वरील कायद्याचा फायदा देण्यांत आला. त्यांपैकीं २१५ पुरुष व २५ स्त्रिया आहेत.

या कायद्याची उपयुक्तता पटल्यानंतर मध्यवर्ती सरकारनें "मध्यवर्ती प्रोबेशन ऑफ ऑफेण्डर्स ॲक्ट" १९५८ सालीं पास केला आहे. त्याची अंमलबजावणी लवकरच सुरू होईल. प्रतिकूल परि-स्थितींत गुन्ह्यांत सांपडलेल्या प्रौढ गुन्हेगारांस तुरुंगामध्यें न पाठवितां चांगल्या वर्तणुकीच्या अटीवर खास नेमलेल्या अधिकाऱ्यांच्या देखरेखीखाली पुढील आयुष्य नीतीनें, सरळ व सुखासमाधानानें घाल-विण्याची संधी देणें हा या कायद्याचा मुख्य उद्देश आहे.

रिमांड होम

प्रौढ गुन्हेगारांच्या प्रमाणेंच लहान मुलांच्या करताहि सरकारनें मुलांचा कायदा १९४८ सालीं पास करून आणखी एक पाऊल पुढें टाकले आहे. या कायद्यान्वयें सांगली येथें एक जुव्हेनाइल कोर्ट स्थापन करण्यांत आलें असून त्यांत एक फर्स्ट क्लास मॅजिस्ट्रेट व त्यांच्या मदतीकरितां दोन स्त्री मॅजिस्ट्रेटस् असतात. या न्यायालयातर्फे परिस्थितीमुळें आपत्तींत सांपडलेल्या मुलांची आस्थेवाईकपणें चौकशी करुन त्याला सुधारण्याची संधी देण्यांत येते.

कुमार्गाला लागलेल्या आणि अनाथ मुलांच्या सुधारणसाठीं महाराष्ट्र राज्य सरकारच्या समाज कल्याण खात्यातर्फे राज्यांत अनेक संस्था काम करीत आहेत. सांगली येथील रिमांड होम ही त्यापैकींच एक संस्था आहे. ही संस्था निमसरकारी असून ती डिस्ट्रिक्ट प्रोबेशन आणि आफ्टर केअर अॅसोसिएशन या संस्थेनें १९५२ सालीं सुरूं केली. या संस्थेचे अध्यक्ष कलेक्टर असून कार्यकारी मंडळांत जिल्हा न्यायाधिश, शिक्षणाधिकारी, पोलीस प्रमुख वगैरे अधिकारी व कार्यकर्ते असतात. दरवर्षी संस्थेचे मानद चिटणीस, खजिनदार, उपाध्यक्ष वगैरे पदाधिकाऱ्यांची वार्षिक बैठकीच्या वेळीं निवड होते. या संस्थेनें रिमांड होमकरितां रु. ५० हजाराची इमारत बांधून १०० मुलांची सोय करून ठेवली आहे.

जुलै १९५२ ते मार्च १९६० पर्यंत या संस्थेंत अनाथ, भटकी, उनाड व गुन्हेगार मिळून ९३० मुलांना व ५० मुलींना प्रवेश मिळाला. या संस्थेंत मुलांना शालेय शिक्षणाबरोबर सूतकाम, शिवणकाम, शेतीकाम, कागदी फुलें तयार करणें वगैरे उद्योगहि शिकविले जातात.

सार्वजनिक बांधकाम--दळणवळण--पाटबंधारे

या खात्याची या जिल्ह्यांतील मुख्य कचेरी सांगली येथें आहे. सुव्यवस्थेच्या दृष्टीनें व देखरेख सुलभ व्हावी म्हणून जिल्ह्याचे सोयीस्कर ८ उपविभाग पाडलेले आहेत. हे उपविभाग सांगली, इस्लामपूर, मिरज, कराड व तासगांव ह्या ठिकाणीं असून डेप्युटी इंजिनियर उपविभाग प्रमुख म्हणून काम पहातात. विभाग प्रमुख म्हणून एक्झीक्युटिव्ह इंजिनियर यांची नियुक्ति असते. याशिवाय कामाच्या सोयीच्या दृष्टीनें निरनिराळ्या सेक्शनची योजना असते व त्या ठिकाणीं देखरेख करण्यासाठीं ओव्हरसिअर्सची नेमणूक असते. ह्या जिल्ह्यांत एक एक्झीक्युटिव्ह इंजिनियर, आठ डेप्युटी इंजिनियर्स, आणि ४२ ओव्हरसिअर्स हें काम पहातात.

प्रशासन व्यवस्था

पहिल्या पंचवार्षिक योजनेखालीं ह्या जिल्ह्यांतून जाणारी राष्ट्रीय सडक (पुणें बेंगलोर मार्ग)—ह्या २० मैल लांबीच्या रस्त्याचें डांबरीकरण करण्यांत आलें. त्याचप्रमाणें १२.९६ मैल लांबीचे नवे रस्ते बांधण्यांतआले व २२.७५ मैल लांबीच्या जुन्या रस्त्यांची सुधारणा करण्यांत आलीं. यासाठीं ४,०५,१३७ रु. खर्च करण्यांत आला. तसेंच पेठ-सांगली-मिरज हा महत्त्वाचा रस्ता सिमेंट काँक्रिटचा करण्याचें कामहि पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या काळांत जवळ जवळ पुरें झालें. त्यासाठीं एकूण २५,४५,२३० रु. खर्च झाला.

पहिली पंचवार्षिक योजना

पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या काळांत जिल्ह्यांत निरनिराळ्या रस्त्यांवर ६ मोठ्या पुलांच्या योजना हातीं घेण्यांत आल्या. त्यांपैकीं तासगांव–अष्टा रस्त्यावरील निमणी गांवाजवळील येरळा नदीवरील पुलाचें काम पुरें झालें व इतर सर्व कामें दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या काळांत पुरीं झालीं. पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या काळांत या पुलांच्या कामावर एकूण रु. ६,५५,१९७ खर्च झाला. पहिल्या पंचवार्षिक योजनेपूर्वीं या जिल्ह्यांतील बहुतेक रस्त्यांची स्थिति अत्यंत असमाधानकारक होती. हा जिल्हा सांगली, मिरज सीनियर व ज्युनियर, जत व कांहीं इंग्रजी अंमलाखालील भाग वगैरे मिळून तयार केला गेला. यामुळें रस्त्यांची सलगता लक्षांत घेऊन त्यांच्या दुरुस्तीचा विचार पूर्वीं केला गेलाच नव्हता. आतां रस्त्यांची सुधारणा करणें फार महत्त्वाचे असले तरी हे काम कष्टाचें व वेळ लागणारे आहे. एकूण पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या अखेरीस जिल्ह्यांत २१८ मैल लांबीचे खडीचे व ८३३ मैल लांबीचें मुरुमाचे रस्ते उपलब्ध होते. यामुळें जिल्ह्यांतील बहुतेक प्रमुख रस्त्यांवर एस्. टी. गाड्या सुरू झाल्या आहेत. तरीपण या रस्त्यांवर पूल, मोऱ्या वगैरे नसल्यामुळें ते फक्त पावसाळ्याव्यतिरिक्तच उपयोगांत आणणें शक्य होते.

द्वितीय पंचवार्षिक योजना

द्वितीय पंचवार्षिक योजनेच्या काळांत पहिल्या पंचवार्षिक योजनेंतील राहिलेलीं पुलांची चार कामें पुरी करण्यांत आलीं. महादेव नाल्यावरील पुलाचें काम या योजनेंतच पुरें केलें जाईल. या सर्व कामावर ऑक्टोबर १९६० पर्यंत योजनेच्या काळांत ९,४६,३८३ रु. खर्च करण्यांत आला. त्याचप्रमाणें पहिल्या पंचवार्षिक योजनेंत अपुऱ्या राहिलेल्या सांगली-कर्नाळ-नांद्रे या रस्त्याचें आणि तासगांव-अष्टा व कराड-तासगांव ह्या रस्त्यांना जोडणाऱ्या जोड रस्त्यांचें कामहि पुरें करण्यांत आलें. यासाठीं एकूण ५८,८३५ रु. खर्च आला.

दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या काळांत ह्या जिल्ह्यांतून बरीच नवीन कामें हातीं घेण्यांत आलीं. त्यामध्यें प्रामुख्यानें खालील कामांचा उल्लेख करावा लागेल.

मोठया पुलांचीं कामें

१. कृष्णा नदीवर भिलवडी येथें
२. कृष्णा नदीवर कार्वे येथें
३. कृष्णा नदीवर बहे येथें
४. वारणा नदीवर कोकसूड येथें
५. अग्रणी नदीवर शिरढोण येथें
६. येरळा नदीवर वसगडे येथें
७. कर्नाळ नाल्यावर कर्नाळ येथें
८. नागेवाडी नाल्यावर नागेवाडी येथें
९. माहुली नाल्यावर माहुली येथें
१०. लिंब नाल्यावर लिंब येथें
११. कुंडल नाल्यावर कुंडल येथें
१२. शिरगांव नाल्यावर शिरगांव येथें
१३. कडेगांव नाल्यावर कडेगांव येथें

या सर्व पुलांसाठीं एकूण ६३.८३ लाख रु. खर्च येणार असून ऑक्टोबर १९६० अखर एकूण रु. ७,६५,४८४ खर्च झाला आहे. वरील पैकीं शिरढोणा येथील पूल पुरा झाला असून भिलवडी, कुंडल, कडेगांव येथील पूल या योजनेच्या अखेरीस पुरे होतील. राहिलेलीं कामें तृतीय पंचवार्षिक योजनेंतहि चालू राहणार आहेत.

रस्त्यांची सुधारणा

त्याचप्रमाणें मिरज-पंढरपूर रस्ता, कोल्हापूर-मिरज-विजापूर रस्ता, कराड-नागज-जत-विजापूर रस्ता, या रस्त्यांचे डांबरीकरण करण्याचें कामहि दुसऱ्या योजनेंत हातीं घेण्यांत आले आहे.

वरील कामासाठीं एकूण ९.५० लक्ष रु. खर्च येणार असून ऑक्टोबर ६० पर्यंत रु. ५,५८,००० खर्च झाला आहे. त्याचप्रमाणें वरील रस्त्यावर पूल व मोऱ्या बांधण्यासाठीं एकूण रु. ८.०० लक्ष रु. खर्च येणार असून त्या कामावर ऑक्टोबर ६० पर्यंत रु. ३,४२,३७४ खर्च झाला आहे. या योजनेमुळें एकूण ५६.२५ मैल लांबीच्या रस्त्यांची सुधारणा होणार आहे. सांगली-तासगांव-विटा-मायणी

हा ४५ मैल लांबीचा रस्ता एक महत्त्वाचा रस्ता असून त्याची सर्वतोपरी सुधारणा करण्याचें काम सुद्धां दुसऱ्या योजनेंत हातीं घेतलें आहे. त्यासाठीं एकूण अंदाजे १८.०४ लक्ष रु. खर्च येणार असून ऑक्टोबर ६० अखेर १.०५ रु. खर्च झाला आहे. सबंध रस्त्याची रूंदी वाढविणें, रस्त्याचें डांबरीकरण करणें व सगळ्या रस्त्यांवरील पूल व मोऱ्या वगैरे बांधणें ह्या कामांचा यांत समावेश होतो.

सांगली–मायणी रस्ता

कराड-तासगांव हा एक महत्त्वाचा रस्ता असून हा रस्ता कराडपासून किर्लोस्करवाडीपर्यंत बराचसा काँक्रीटचा करण्याचें योजलें आहे आणि पुढें तासगांवपर्यंत त्याचें डांबरीकरण केलें जाईल. त्या शिवाय सबंध रस्त्यावरील पूल व मोऱ्याहि बांधल्या जातील. ह्या सर्व कामासाठीं एकूण रु. ३०.४७ लक्ष खर्च येणार आहे. ऑक्टोबर १९६० पर्यंत ह्या कामावर ६.३० लक्ष रु. खर्च झाला आहे.

कराड–तासगांव रस्ता

सांगली विभागाच्या कक्षेमध्यें येणाऱ्या साखर कारखान्यांच्या कार्यक्षेत्रांतील ६ रस्त्यांची सुधारणा करण्याचें कामहि दुसऱ्या योजनेमध्यें हातीं घेतलें असून अंदाजे ३४ मैल लांबीच्या रस्त्यांची सुधारणा होणार आहे. त्यासाठीं एकूण ७.६२ लक्ष रु. खर्च येणार असून ऑक्टोबर १९६० पर्यंत ३,६०,९८० रु. खर्च झाला आहे.

साखर कारखान्याचे कार्यक्षेत्रांतील रस्तें

वायफळे ते भिवघाट हा ५ मैलांचा रस्ता व नांद्रे-येळावी हा ६.५० मैलांचा रस्ता तयार करण्याचें कामहि सुरू झालें असून त्यासाठीं ६.४० लाख रु. खर्च येणार आहे. ऑक्टोबर १९६० पर्यंत या कामावर रु. १,५७,३५४ खर्च झाला आहे.

नवीन रस्ते

इमारती :—शेतीचें उत्पादन वाढविणाऱ्या योजनांस आवश्यक त्या इमारतीच्या बांधकामास प्राधान्य देऊन या जिल्ह्यांत डीग्रज येथें शेतकी शाळा, शेती संशोधन केंद्र आणि अधिकारी व नोकरवर्गास राहण्याचीं घरें बांधण्यच्या योजना हातीं घेण्यांत आल्या आहेत. यापैकीं शेती शाळेच्या इमारतीचें काम जवळ जवळ पुरें झालें आहे. शेती संशोधन केंद्राच्या इमारतीचें काम अद्याप सुरूं झालेलें नाहीं पण तें लवकरच सुरू करण्यांत येईल. या योजनेवर दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या काळांत एकूण रु. ४,१८,९५४ खर्च झाला.

शेती विकासाच्या इमारती

तासगांव येथें सिव्हिल कोर्टाची इमारत दुसऱ्या पंचवार्षिक योजनेमध्यें बांधण्यांत आली. या इमारतीसाठीं एकूण रु. १,२०,३८६ खर्च झाला असून ती १९५९ सालीं पुरी झाली. त्याचप्रमाणें सांगली ह्या जिल्ह्याच्या ठिकाणीं एक अद्यावत पोलीस नगर बांधण्याची योजना मंजूर झाली असून प्रत्यक्ष कामास लवकरच सुरुवात होणार आहे. ह्या कामासाठीं अंदाजे रु. ४१,१५,६८१ खर्च येणार आहे. त्याशिवाय जिल्ह्यांत इतरत्र पोलीस खात्यांतील नोकर वर्गासाठीं निवासस्थानें बांधण्यांत येणार असून त्यासाठीं रु. १२,६२,५३९ खर्च येणार आहे. ही सर्व कामें तिसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या काळांतहि चालू राहतील.

शासनोपयुक्त इमारती

दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या काळांत सांगली येथें आधुनिक सुखसोयीनें युक्त असें एक नवीन सिव्हिल हॉस्पिटल बांधण्याचें काम हातीं घेण्यांत आलें. ह्या कामासाठीं एकूण रु. २८,१३,७२९ खर्च येणार असून ऑक्टोबर १९६० पर्यंत रु. ५,७०,१३१ खर्च झाला आहे. तृतीय पंचवार्षिक योजनेंतहि हें काम चालू राहणार आहे.

नवीन सिव्हिल हॉस्पिटल

सांगली येथें रु. ९८,४१२ खर्च करून एक इन्स्पेक्शन बंगला बांधण्यांत येणार आहे. ह्या योजनेच्या काळांत बुधगांव येथें ट्रेनींग कॉलेजच्या विद्यार्थ्यांसाठीं रु. ४५,००० किंमतीचें एक वसतिगृह पण बांधण्यांत आलें. त्याशिवाय जत ह्या तालुक्याच्या ठिकाणीं खालील महत्त्वाच्या इमारतींचें कामहि हातीं घेण्यांत येणार आहे.

इतर इमारती

१. खिलार जनावरांचें उत्पादन केंद्र

२. कोंबडयांचें प्रात्यक्षिक केंद्र

३. मेंढया व लोंकर उत्पादन केंद्र

४. जनावरांचा दवाखाना

वरील कामासाठीं अंदाजे रु. ७,५५,००० खर्च येणार आहे.

प्रवासी मोटर वाहतुक धंद्याचें राष्ट्रीयकरण होऊन एस्. टी. कॉर्पोरेशन मार्फत हा व्यवसाय चालूं आहे. सांगली जिल्ह्यांतील एस्. टी. वाहतुक ही कोल्हापूर विभागाच्या अंमलाखालीं आहे. या जिल्ह्यांत सांगली, विटे, तासगांव, इस्लामपूर आणि जत असे उपविभाग किंवा डेपो आहेत. पैकीं सांगली डेपो हा १९५१ पासून चालूं आहे.


राज्य वाहतुक

सांगलीहून जिल्ह्यांतील प्रमुख ठिकाणीं आणि जिल्ह्याबाहेरील महत्त्वाच्या ठिकाणीं रोज गाडयांची वाहतुक चालूं असतें. याशिवाय सांगली-मिरज सिटी बस सर्व्हिसहि चालूं आहे. सांगलीहून आजुबाजूच्या महत्त्वाच्या गांवांतील बाजारासाठीं त्या त्या बाजाराच्या दिवशीं खास गाडया सोडल्या जातात. तसेंच जवळपासच्या यात्रांसाठींहि खास गाडया सुटतात. जिल्ह्यांतील १८ महत्त्वाच्या ठिकाणीं पार्सल बुकिंग आणि डिलिव्हरीची खास एस्. टी. च्या मालमोटरीनीं व्यवस्था केलेली आहे. जिल्ह्यांतील सर्व डेपोंत मिळून सुमारें शंभर गाडया वाहतुकीचें काम करतात.

या जिल्ह्यासाठीं कोल्हापूरला विभागीय वाहतुक कार्यालय असून मोटर नोंदणी, कर, वगैरे कामें तेथें होतात. लोकांच्या सोयीसाठीं या ऑफिसचे अधिकारी सांगली जिल्ह्यांत फिरतीवर येऊन तेथें काम करतात. त्यामुळें लोकांची सोय होते.

वाहतुक अधिकारी

वाहतुक



पंढरपूरकडे
पुण्याकडे
पुण्याकडे
विभंची
कुकुडवाड
कलढोण
भरे
आटपाडी
नागेवाडी
खरसुंडी
लेंगरे
करगणी
कऱ्हाड
कडेगांव
कडेपूर
विटें
खानापूर
तडसर
चिंचणी
हतनूर
वायफळे
जरंडी
घाटनांद्रे
जतरोड
पंढरपूरकडे
पंढरपूरकडे
मांजरडे
डोंगरसोनी
नागज
कासेगांव
वाटेगांव
बहे
ताकारी
कुंडल
पलूस
किर्लोस्करवाडी
इस्लामपूर
कोकरूड
शिराळा
कौलगे
चिंचली
तासगांव
गव्हाण
मणेराजुरी
ढालगांव स्टेशन
शेगांव
चडचणकडे
मांगले
चिकुर्डे
भिलवडी
स्टेशन
नांद्रे
कवठेमहांकाळ स्टेशन
जत
संख
दुधगांव
काकडवाडी
बिळूर
मुचंडी
असंगी
वडगांव
गुंडेवाडी
मालगांव
सांगली
जयसिंगपूर
मिरज
आरग स्टेशन
कोल्हापूर
म्हैसाळ
नरवाड
आरग
नरसोबावाडी
कुरुंदवाड
निपाणीकडे
दत्तवाड
निपाणीकडे
एस. टी. जिल्हा विभागीय कचेरी
एस. टी. डेपोज
रल्वे

पाटबंधारें

सांगली जिल्ह्यांत पहिल्या पंचवार्षिक योजनेपूर्वीं दोन प्रमुख कालवे होते. एक कृष्णा कॅनॉल व दुसरा चिखली कॅनॉल. कृष्णा कॅनॉलपासून पुनर्रचनेपूर्वीं अंदाजे १२,००० एकर जमिनीस पाणीपुरवठा होत होता व चिखली कालव्यापासून अंदाजे ४५० एकर जमिनीस पाणीपुरवठा होत होता. जुन्या कृष्णा कॅनॉलसाठीं १७,३२,८६९ रु. खर्च आला होता. पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या काळांत भारत सरकारच्या निरनिराळ्या कर्ज योजनांमधून अनेक पाटबंधाऱ्याच्या योजना हातीं घेण्यांत आल्या. तसेंच रु. १.११३ कोटी कर्ज योजनेमधून निम-दुष्काळी म्हणून तासगांव तालुक्यांत वज्रचोंडे बंधाऱ्याचें काम हातीं घेण्यांत आलें व तें १९५५ मध्यें पुरें झालें. या कामावर ६,४३,५६३ रु. खर्च आला आहे. जत तालुक्यांत किल्लेरामापूर येथें एक पाझर तलावाचें काम सुरू करण्यांत आलें. तें दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या काळांत पुरें झालें. ह्या कामासाठीं रु. १,१३,३०२ खर्च झाला असून त्यापासून १४३ एकर जमिनीस फायदा होईल. कृष्णा कॅनॉलच्या पुनर्रचनेचें महत्त्वाचें काम भारत सरकारच्या ४.८७ कोट रु. कर्जाच्या योजनेमधून हातीं घेण्यांत आलें. ह्या योजनेप्रमाणें या कॅनॉलची ३५ व्या मैलापर्यंत पुनर्रचना करणें व आणखी ६ मैलांनीं कालव्याची वाढ करणें हीं कामें १९५४ सालीं हातीं घेण्यांत आलीं. पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या काळांत ह्या कामावर रु. १७,९५,००० खर्च झाला. याच कामावर दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत २५,८०,५६५ रु. खर्च झाला. हें काम तिसऱ्या योजनेच्या काळांतहि चालू राहील. ह्या योजनेमुळें १३,५७१ एकर जादा जमिनीस पाणीपुरवठा होईल. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या काळांत कृष्णा कॅनॉल व्यतिरिक्त ह्या जिल्ह्यांत बलवडी बंधारा ही एक दुसरी महत्त्वाची १९,३७,०५८ रु. खर्चाची योजना हातीं घेण्यांत आली आहे. कांहीं नैसर्गिक व तांत्रिक अडचणीमुळें ही योजना दुसऱ्या पंचवार्षिक योजनेमध्यें पुरी होऊं शकणार नाहीं. ती तिसऱ्या योजनेच्या काळांत चालू राहील. ह्या कामावर सप्टेंबर १९६० अखेर रु. १०,५३,६७० खर्च आला असून ह्यापासून ३,६०० एकर (खरीप) व १,२०० एकर (रब्बी) जमिनीस पाणीपुरवठा होईल. ह्याशिवाय दुष्काळीं कामें म्हणून आटपाडी व अंजनी येथील तलावांचीं कामें हातीं घेण्यांत आलीं. त्यापैकीं आटपाडी तलावाचें काम हें नेहमीचें सरकारी काम म्हणून हातीं घेण्यांत आलें आहे. त्याच-प्रमाणें वाळवे तालुक्यांत रेठरेधरण आणि मिरज तालुक्यांत कुची येथील तलावांचीं कामें पण हातीं घेण्यांत आलीं असून ती जवळ जवळ पुरी होत आलीं आहेत. ह्या सर्व योजनांमुळें पुढील प्रमाणें जमि-नीस फायदा होणार आहे.

आटपाडी तलाव	—	२७६९ एकर (रब्बी)
अंजनी तलाव	—	१२०० एकर
रेठरेधरण तलाव	—	२८५ एकर (खरीप) १३० एकर (रब्बी)
कुची तलाव	—	८५८ एकर (रब्बी)

वरील सर्व चार योजनांवर सप्टेंबर १९६० अखेर रु. ८,३९,१०४ खर्च आला.

वारणा प्रकल्प

भारताच्या सर्वांगीण प्रगतीच्या दृष्टीनें महाराष्ट्रांत जे कांहीं प्रकल्प दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत अंतर्भुत करण्यांत आले आहेत त्यांतील "वारणा प्रकल्प" हा एक आहे. वारणा ही कृष्णेची एक उपनदी असून ती सह्याद्रि पर्वतांत उगम पावून कृष्णा नदीला सांगलीपासून ३ मैलांवर हरिपूर जवळ मिळते. या नदीला पावसाळ्यांत आणि त्यानंतर दोन महिनें म्हणजे साधारणपणें डिसेंबर अखेरपर्यंत प्रवाही पाणी असतें. पण त्यानंतर मात्र पुन्हा पावसाळा येईपर्यंत फारच थोडें पाणी असतें. वारणेच्या कांठावर सांगली व कोल्हापूर या दोन्ही जिल्ह्यांतील चांगल्या जमिनी आहेत. या जमिनीमध्यें ऊंस चांगल्या तऱ्हेचा होतो. तेव्हां या जमिनीला बाराहि महिनें पाणीपुरवठा करण्याच्या दृष्टीनें वारणा प्रकल्पाची आंखणी करण्यांत आली आहे.

कोल्हापूर जिल्ह्यांतील पंचगंगा नदीवर राधानगरी धरण बांधल्यामुळें कांठावरच्या जमिनीला भरपूर पाणीपुरवठा होऊ लागला. त्याच पद्धतीवर वारणा नदीवरील योजना आहे. या प्रकल्पामुळें वारणा नदींत भरपूर पाण्याचा सांठा राहील व तो इंजिनाच्या साह्यानें वर खेंचून कांठावरच्या जमिनीला देण्याची सोय होऊं शकेल.

या प्रकल्पाचे दोन भाग आहेत. पहिला भाग म्हणजे शिराळा महालांत शिराळ्यापासून २५ मैलांवर पश्चिमेकडे चांदोली गांवाजवळ एक मातीचें धरण बांधण्यांत येणार आहे. हें धरण १९२० फूट लांब व ११४ फूट उंच होणार असून त्यामध्यें ३२०० दशलक्ष घनफूट पाण्याचा सांठा राहणार आहे. या योजनेच्या दुसऱ्या भागान्वयें चांदोली धरणाच्या खालच्या बाजूस चरण, चिंचोली, हरगुडवाडी, सांगांव, कोडोली व तांदुळवाडी अशा सहा ठिकाणीं बंधारे बांधले जाणार आहेत. चांदोली धरणाचें पाणी नदीच्या पात्रांतूनच खालील बंधाऱ्यांत सोडण्यांत येईल व ते या बंधाऱ्यांतून इंजिनच्या मदतीनें वर ओढून घेऊन तें कांठावरील जमिनीला देणें सहज शक्य होईल.

चांदोली धरणाखालीं कोल्हापूर जिल्ह्यांतील शाहूवाडी तालुका व सांगली जिल्ह्यांतील शिराळा महाल या दोन्ही तालुक्यांतील मिळून एकूण २५८१ एकर जमीन बुडणार आहे. या प्रकल्पामुळें सुमारें २०,००० एकर जमिनीस पाणी मिळूं शकेल. त्यापैकीं कोल्हापूर जिल्ह्यांतील ९७०० एकर जमीन राहणार असून सांगली जिल्ह्यांतील १०,३०० एकर राहील. पाणी मिळणाऱ्या जमिनींत पुढील प्रमाणें पिकें होऊ शकतील : ६६०० एकर (शेंकडा तेहतीस) ऊंस, ५४०० एकर (शेंकडा सत्तेचाळीस) रब्बी पिकें व ४,००० एकर (शेंकडा वीस टक्के) उन्हाळी पिकें.

या योजनेसाठीं एकण अंदाजे खर्च १ कोटी ५१ लक्ष ८८ हजार रुपये येणार आहे. यामध्यें धरण, बंधारे, धरणाकरितां लागणाऱ्या जमिनी, रस्ते, यंत्रसामुग्री, कर्मचाऱ्यांची राहाण्याची सोय वगैरे बाबीवरील खर्चाचा समावेश करण्यांत आला आहे.

या प्रकल्पाचें काम जलद व्हावें म्हणून सार्वजनिक बांधकाम खात्याचा एक खास विभाग उघडण्यांत आला असून वारणा प्रकल्प प्रमुख एक्झिक्युटिव्ह इंजिनियर यांची कचेरी कोल्हापूर येथें उघडण्यांत आली आहे. त्याचप्रमाणें या कल्पाकरितां चार सब डिव्हिजन्स उघडण्यांत आल्या आहेत. या प्रकल्पाचें काम शक्य तितक्या जलद गतीनें पुरें करण्याचा प्रयत्न महाराष्ट्र सरकार करीत आहे.

आरोग्य व्यवस्था

या जिल्ह्यांत जनतेच्या आरोग्याचें संगोपन, संवर्धन आणि उपचाराचें काम सार्वजनिक आरोग्य खात्यामार्फत दोन प्रकारांनीं केलें जातें. एक म्हणजे सामुदायिक आरोग्य चांगलें व सुदृढ राहावें म्हणून प्रतिबंधक उपाययोजना आणि दुसरा म्हणजे जिल्ह्यांत ठिकठिकाणीं दवाखानें व इस्पितळें उघडून रोग पिडितांची उपचार व्यवस्था करणें. सार्वजनिक आरोग्य खात्याच्या मार्गदर्शनाखालीं ग्रामीण विभागापर्यंत जनतेच्या आरोग्याची काळजी स्थानिक संस्था व ग्रामपंचायतीहि घेत असतात. सांगली येथें सार्वजनिक आरोग्य खात्याचे अधिकारी व जिल्ह्याचे सिव्हिल सर्जन यांची कार्यालयें आहेत. जिल्ह्यांतील औषधी उपचार व्यवस्थचे प्रमुख म्हणून सिव्हिल सर्जन काम पहातात.

उपचार व्यवस्था

जिल्ह्याचें प्रमुख इस्पितळ सांगली येथें असून खुद्द सिव्हिल सर्जन त्याचें काम पाहातात. या इस्पितळांत ३८ खाटांची सोय असून एक्स-रे प्लॅन्ट आणि क्लिनिकल लॅबोरेटरी आहे. त्याशिवाय प्रसूतिगृह या इस्पितळास जोडले असून तेथें १४ खाटांची सोय आहे. १९५८ सालीं या इस्पितळांत २१२७ रुग्णाइत दाखल झाले होते व २२,३७१ रुग्णाइतांवर औषधोपचार करण्यांत आले. सध्याची इस्पितळाची इमारत फार लहान आहे असें दिसून आल्यावरून अद्यावत पद्धतीचें १०० खाटांची सोय असलेलें इस्पितळ बांधण्याचें काम चालू आहे.

नर्सिंगचें शिक्षण

सांगलीच्या सरकारी इस्पितळांतच १९५९ सालापासून "ऑक्सिररी नर्स मिडवाइव्हज्"चा कोर्स चालविण्यांत येत आहे. या कोर्सकरतां दरवर्षी १५ विद्यार्थिनींना प्रवेश दिला जातो.

दवाखाने

सांगलीच्या इस्पितळाखेरीज जिल्ह्यांत जत व कुंडल येथें इस्पितळें व कवठेमहांकाळ, बुधगांव, भवानीनगर व आटपाडी येथें सरकारी दवाखानें आहेत. याशिवाय सांगली, मिरज, इस्लामपूर व तासगांव येथें स्थानिक नगरपालिकांनीं दवाखानें चालविले आहेत. जिल्हा लोकल बोर्डातर्फे एकूण १४ आयुर्वेदिक दवाखानें पुढील ठिकाणीं चालविले जात आहेत. खानापूर, पारे, सावळज, कासेगांव, वाटेगांव, सागांव, कोकरूड, इस्लामपूर, भोसे, म्हैसाळ, कवठेपिरान, मणेराजुरी व माहुली.

खेड्यांमधून डॉक्टर्सनी राहावे म्हणून डॉक्टर्सना कांहीं मदत देऊन दवाखाने चालविण्याची योजना आंखण्यांत आलेली आहे. या योजनेनुसार ॲलोपॅथिक डॉक्टर्सना द. म. रु. १२० व आयुर्वेदिक

वैद्यांना रु. ८० मदत देण्यांत येते व द. म. रु. ३७.५० प्रवास भत्ता देण्यांत येतो. प्रतिवर्षीं ॲलोपॅथिक दवाखान्याकरितां रु. ५०० ची व आयुर्वेदिक दवाखान्याकरितां रु. ३०० ची औषधें देण्यांत येतात. अशा दवाखान्याकरितां सरकार चार पंचमांश व जिल्हा लोकलबोर्ड एक पंचमांश खर्च करतें. सांगली जिल्ह्यांत या योजनेखालील दवाखान्याकरितां १९५८-५९ सालीं सरकारला रु. १८,९७९ खर्च आला. या जिल्ह्यांत सध्यां संख, कडेगांव, खरसुंडी, दिघंची, लेंगरे, येलूर, येळावी, हातनूर, आरळें, शिरशी व वडगांव अशा ११ ठिकाणीं या योजनेखालील दवाखानें आहेत.

सबसिडायज्ड मेडिकल प्रॅक्टिशनर्स

ग्रामीण भागांत वैद्यकीय मदत पोहोंचविण्याच्या योजनेनुसार जिल्ह्यांत शिराळा महाल-मांगले, वाळवा तालुका-शिगांव, खानापूर तालुका-नेवरी, मिरज तालुका--आगळगांव व तासगांव तालुका-सावर्डे या पांच ठिकाणीं १९५७-५८ साला-पासून औषधी पेटचा ठेवण्यांत आल्या आहेत.

औषधी पेटचा

जिल्ह्यांतील बहुतेक मोठचा दवाखान्यांत स्त्रियांसाठीं खास व्यवस्था असून प्रसूतीचाहि विभाग दवाखान्यास जोडण्यांत आला आहे. प्राथमिक आरोग्य केंद्रें जिल्ह्यांत आटपाडी, विटे, पलूस, चिंचणी, आरग, कवठेमहांकाळ व कवठेपिरान या गांवांत असून त्यांत स्त्रियांना प्रसूतिपूर्व व प्रसूतिनंतर बालआरोग्य सुधारण्याबाबतचा सल्ला देण्यांत येतो. तसेंच प्रसूती-बाल आरोग्य केंद्रें जत व भिलवडी येथें आहेत. जिल्ह्यांत सहा कुटुंब नियोजन केंद्रें असून ती विटा, आटपाडी, पलूस, कवठेपिरान, कडेगांव व आरग ह्या ठिकाणीं आहेत.

जिल्हा आरोग्याधिकारी हे प्रतिबंधक उपाय योजनेचे प्रमुख असून शहरी व ग्रामीण भागांतील सर्वसामान्य आरोग्याबाबतची परिस्थिति, यात्रा व उत्सव प्रसंगीं आरोग्याची व्यवस्था, सांथीच्या रोगाचा प्रादुर्भाव झाल्यास त्याचा प्रतिबंध करणें आदि कामें त्यांच्याकडे असतात. यासाठीं त्यांच्या हाताखालीं चार आरोग्याधिकारी, एक सांथीच्या रोगाचे आरोग्याधिकारी, नर्सेस, फिल्डवर्कर्स, सॅनिटरी इन्स्पेक्टर्स, असा कर्मचारी वर्ग असतो. त्यामुळें ग्रामीण पातळीर आरोग्यसंवर्धनाचें कार्य सतत चालू असतें. या जिल्ह्यांत वीस व्हॅक्सिनेटर्स असून ते देवी प्रतिबंधक लस व सांथीच्या काळांत दुसऱ्या वेळीं लस टोचण्याचें काम करीत असतात.

प्रतिबंधक उपाय योजना

जिल्ह्यांतील सहा सॅनिटरी पथकें सांथीच्या काळांत घरें, विहिरीं, रोग्यांचे कपडे वगैरे जंतुरहित करतात व सर्वसाधारण काळांत विहिरी जंतुविरहित करण्यासाठीं औषधें टाकणें, रस्ते साफ करणें, कचऱ्याचें कंपोस्ट खत बनविणें आणि ग्रामीण जनतेला आरोग्याविषयक संवयी लावणें आदि कामें ते करतात. ग्रामीण भागांत स्वस्छता राखण्यासाठीं उपाययोजना करणें, केरकचरा व मलमूत्र यांचा उपयोग खतें बनविण्याकडे करणें व लोकांना प्रात्यक्षिकांच्या द्वारें शिक्षण देणें आदि कामांची जबाबदारी जिल्ह्यांतील सॅनिटरी इन्स्पेक्टर्स आणि सॅनिटरी सब् इन्स्पेक्टर्स यांच्यावर असते. त्याचप्रमाणें जन्म मृत्यूच्या नोंदी तपासणें, खानावळी व उपहारगृहें स्वच्छतेच्या दृष्टीनें तपासणें व सांथीच्या काळांत प्रतिबंधक उपाययोजना करणें हीं कामेंहि यांना करावीं लागतात.

या जिल्ह्यांत खानापूर, कासेगांव, आरळे, पलूस, कवठेपिरान व शिराळा हीं केंद्रें कुष्ठरोग निवारणाचें कार्य करीत आहेत. पेठ, ता. वाळवा येथें नवीन कुष्ठरोग निवारण केंद्र स्थापन करण्यांत आलें आहे.

कुष्ठरोग उपचार केंद्रे

याशिवाय जिल्हा आरोग्याधिकारी शाळेंतील मुलांच्या आरोग्याचीहि तपासणी करतात. तसेंच कारखाने, गिरण्या, सिनमागृहें, पाणीपुरवठा आदींची स्वास्थ्याच्या दृष्टीनें पाहाणी करून सल्ला देतात.

मलेरिया प्रतिबंधक आणि निर्मूलन कार्य

सांगली जिल्ह्यांतील सर्व गावांतून डी. डी. टी. फवारण्यापूर्वी १९५२ सालीं मलेरिया रोगाचें प्रमाण कितपत आहे याची पाहाणी करण्यांत आली होती. १९५२ सालीं कांहीं गांवांतील मुलांच्या पांथरीची तपासणी केल्यानंतर असें आढळून आलें कीं, ह्या जिल्ह्यांतील पांथरीचें प्रमाण सरासरी ९ टक्के आहे. याच वर्षी सार्वजनिक व सरकारी दवाखान्यांतून औषधोपचार केलेल्या रोग्यांची संख्या व त्या रोग्यांतील मलेरियानें आजारी असलेल्या रोग्यांची संख्या पाहण्यांत आली. १९५२ सालीं एकंदर ४७,३८६ रोग्यांपैकीं ५,१०२ रोगी मलेरियानें आजारी असल्याचें आढळून आले होते. मलेरियाचें प्रमाण शेंकडा ९ टक्के होतें.

वरील पाहणीनंतर या जिल्ह्यामध्यें १८५६ सालीं प्रथमतः डी. डी. टी. फवारण्याचें काम मलेरिया नियंत्रण योजनेमार्फत सुरूं झालें. १९५६ ते १९५७ पर्यंत या योजनेची सूत्रें जिल्हा-आरोग्य कचेरीमार्फत हालविण्यांत येत असत. १९५९ सालीं मलेरिया निर्मूलन योजनेनुसार या जिल्ह्यामध्यें मलेरिया निर्मूलन अधिकाऱ्याची स्वतंत्र कचेरी सांगली येथें सुरू करण्यांत आली आहे. जिल्ह्यांत वरील कचेरी मार्फत जून ते ऑक्टोबर महिन्यांत सर्व तालुक्यांत वर्षांतून एकदा आणि फक्त जत तालुक्यांत दोनदां डी. डी. टी. फवारण्याचें काम चालू आहे.

मलेरिया प्रतिबंधक आणि निर्मूलनाच्या कार्याची झालेली प्रगति व आलेलें यश यांची कल्पना येण्यांकरितां हा कार्यक्रम सुरू होण्यापूर्वी सार्वजनिक आरोग्य खात्यामार्फत सादर करण्यांत आलेली आंकडेवारी पाहाणें उपयुक्त ठरेल.

वर्ष	एकूण रोगी	मलेरियाचे रोगी
१९५६	६९,१३६	३,६६०
१९५७	७६,४६५	४,७४१
१९५८	७३,६५१	४,५५९
१९५९	७५,३८६	२,३९०

१९५२ सालीं पांथरीचें प्रमाण सरासरी ९ टक्के होतें. तें १९५९ सालीं ४ टक्के कमी आलें. मलेरिया निर्मूलन कार्याचें महत्त्व व त्याच्या यशाची खात्री ग्रामीण भागांतहि पटू लागली असल्यामुळें ग्रामीण भागांतील जनताहि स्वयंस्फूर्तीनें डी. डी. टी. फवारण्यास सहकार्य करीत आहे.

याचबरोबर मलेरिया निर्मूलन संघटनेनें या जिल्ह्यांत आतां प्रत्यक्ष कोणत्या माणसांच्या शरीरांत मलेरियाचे जंतू आहेत याची तपासणी करून मलेरियाचें संपूर्ण उच्चाटन करण्याच्या कामास दि. १ ऑक्टोबर १९६० पासून सुरुवात केली आहे. या योजनेच्या कामीं सांगली जिल्ह्यांत मलेरिया मेडिकल ऑफीस मार्फत प्रत्येक १०,००० लोकसंख्येला एक, या प्रमाणें ८८ मलेरिया सर्वेलन्स कर्मचारी आणि या कर्मचाऱ्यांच्या कामाची पाहणी करण्याकरितां एकूण २२ मलेरिया सर्वेलन्स इन्स्पेक्टर्स नेमण्यांत आले आहेत. प्रत्येक इन्स्पेक्टरकडे ४०,००० ते ५०,००० लोकसंख्येचा भाग राहील. प्रत्येक कर्मचारी आपल्या भागांत जितकी घरें असतील त्या घरांना भेट देऊन (दर पंधरवड्याला) घरांत कोणी तापाचा रोगी आहे काय याची चौकशी करील. तो रोगी कोणत्याहि तापाचा असो त्याचे तो कर्मचारी नमुन्यादाखल दोन थेंब रक्त काढून घेईल व त्याची मले-रियाच्या दृष्टीनें तपासणी केली जाईल. त्या रक्तांत मलेरियाचे जंतू आढळल्यास तो रोगी संपूर्ण बरा होईपर्यंत त्यास पुढील औषधोपचार मोफत करण्यांत येईल. अशा प्रकारें मलेरियाचें संपूर्ण निर्मूलन केलें जाईल.

पब्लिक हेल्थ इंजिनियरींग विभाग ही वीज आणि पाट बंधारे खात्याची एक विशेष शाखा आहे. नळानें पाणीपुरवठा करण्याच्या योजना आखणे व गटार योजना तयार करणें आणि त्या अंमलांत आणणें हीं कामें या विभागाकडे सोपविली आहेत.

पाणीपुरवठा

कारभाराच्या सोयीसाठीं या विभागाचे पश्चिम पब्लिक हेल्थ सर्कल आणि पूर्व पब्लिक हेल्थ सर्कल असे दोन भाग केलेले आहेत. पश्चिम प. हे. स. चें मुख्य कार्यालय पुणें येथें असून पुणें, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, रत्नागिरी, ठाणें, कुलाबा, नगर, जळगांव व धुळें हे जिल्हे या सर्कलच्या कार्यक्षेत्राखालीं येतात.

सुपरिंटेंडिंग इंजिनियर हे पश्चिम प. हे. सर्कलचे मुख्य अधिकारी आहेत. या सर्कलचीं मुख्य कामें सरकारी तसेंच नगरपालिका आणि ग्रामपंचायती यांच्या पाणीपुरवठा आणि ड्रेनेज योजनांचें नियोजन करणें आणि त्या पार पाडणें, तसेंच न. पा. व ग्रामपंचायतींनीं हातीं घेतलेल्या अशा प्रकारच्या योजनांवर देखरेख करणें व सल्ला देणें हीं होत. याशिवाय जिल्ह्यांतील सरकारी आणि कांहीं नगर-पालिकांच्या वॉटर वर्क्सच्या दैनंदिन कामाकडे या विभागामार्फत लक्ष दिलें जातें.

पश्चिम पब्लिक हेल्थ सर्कलच्या डिव्हिजन्स पुणें, कोल्हापूर, सोलापूर, ठाणें आणि नाशिक येथें आहेत. पब्लिक हेल्थ इंजिनियरिंग वर्क्स डिव्हिजन कोल्हापूरचें मुख्य कार्यालय कोल्हापूर येथें असून कोल्हापूर, रत्नागिरी, सांगली आणि उत्तर सातारा जिल्हा या डिव्हिजनच्या कार्यक्षत्राखालीं येतो. या डिव्हिजनच्या ५ उपविभागीय कचेऱ्या असून यापैकीं मिरज सॅनिटरी सब डिव्हिजन आणि सांगली सॅनिटरी सब डिव्हिजन (सांगली) या सांगली जिल्ह्यांत आहेत.

सांगली पाणीपुरवठा योजनेच्या कामासाठीं १९५५ मध्यें ही सब डिव्हिजन स्थापन करण्यांत आली. सांगली शहराची योग्य वाढ होण्याच्या दृष्टीनें पुरेसा शुद्ध पाण्याचा पुरवठा करण्याचा प्रश्न अडचणीचा होता. हा प्रश्न समाधानकारकरित्या सोडविण्यासाठीं २६,३५,५०० रु. ची सांगली

पाणीपुरवठा योजना (भाग १) तयार करण्यांत आली आणि १९५५ मध्यें या योजनेच्या

सांगली सॅ. सब-डिव्हिजनचें कार्य कामास सुरवात झाली. हें काम जवळ जवळ पूर्ण झालें असून आतां दर दिवशीं दर माणशीं ३६ गॅलन प्रमाणें पाणीपुरवठा करतां येणें शक्य झालें आहे.

शहराच्या सर्व भागांत पुरेशा दाबानें पाणीपुरवठा करण्यासाठीं तयार केलेल्या सांगली पाणीपुरवठा योजनेच्या दुसऱ्या भागाचें काम सध्यां सुरू आहे. या योजनेनुसार कमी व्यासाचे नळ काढून त्याजागीं मोठ्या व्यासाचे नळ टाकणें, तसेंच नळ नसलेल्या भागांत नळ टाकणें हीं कामें चालू आहेत.

सर्व भागांत भरपूर पाणीपुरवठा होऊं लागल्यानंतर सांडपाण्याचा योग्य निचरा न झाल्यानें आरोग्य विघातक वातावरण निर्माण होण्याचा संभव आहे. असा प्रसंग येऊं नये म्हणून ड्रेनेज योजना तयार करण्यांत येत आहे. ही योजना कार्यान्वित आल्यानंतर सांडपाण्याचा योग्य निचरा होऊ शकेल.

वरील कामाखेरीज शिराळा आणि वाळवे तालुक्यांतील गांवांच्या पाणीपुरवठा आणि ड्रेनेज योजना तयार करण्याचें काम या सब डिव्हिजनकडे सोंपविण्यांत आलें आहे. या कार्यालयामार्फत सांगली, इस्लामपूर, सांगली औद्योगिक वसाहत, कामेरी, हरीपूर, नेर्लें, बहे, मणदूर, नेवरी, बोरगांव, कासेगांव, अंकलखोप, भिलवाडी, बिळाशी, शिगवे व तडवळे या ठिकाणीं कामें चालू आहेत.

गटार योजना : सांगली, इस्लामपूर, तांबवे, डिग्रज व कासेगांव.

वॉटर वर्क्स : सम्राट अशोक वॉटर वर्क्स, इस्लामपूर.

मिरज सॅनिटरी सब-डिव्हिजनचें कार्य मिरज, कुरुंदवाड, इचलकरंजी, औंध आणि काकडवाडी येथील सरकारी वॉटर वर्क्सचा कारभार मिरज सब डिव्हिजन पहाते.

मिरज शहराच्या पाणी पुरवठ्यासाठीं पूर्वीच्या मिरज (सि.) संस्थानाधिपतींनी एक योजना आंखली होती आणि या योजनेचा कांहीं भाग संस्थानी कारकिर्दींत पूर्ण झाला होता. संस्थान विलीन झाल्यानंतर मुंबई सरकारनें ती पूर्ण केली. सध्या गंगाधरराव बाळासाहेब वॉटर वर्क्सच्या इनफिल्ट्रेशन वर्क्सपासून मिळणारा पाणीपुरवठा कृष्णा नदींतील गाळामुळें कमी झाला आहे. म्हणून नदींतून पंपाच्या सहाय्यानें पाणी उपसून तें जलशुद्धीकरण केंद्रांत शुद्ध करण्याची रु. ७,७२,७८० ची योजना तयार करण्यांत आली असून या योजनेचें काम लवकरच चालू होईल.

मिरज अंडर ग्राऊंड ड्रेनेज योजनेचें काम देखील याच कार्यालयाकडे आहे. सांगली जिल्ह्यांतील मिरज, खानापूर, तासगांव आणि जत या तालुक्यांतील गांवांच्या पाणीपुरवठा आणि ड्रेनेज योजना तयार करण्याचें काम या सब डिव्हिजनकडे आहे. या कार्यालयामार्फत गंगाधर बाळासाहेब वॉ. वर्क्स, जलशुद्धीकरण केंद्र मिरज, विटे (ता. खानापूर), वानलेसवाडी, खरकटवाडी, गोटेवाडी, कवलापूर, मालगांव, म्हैसाळ, कवठेएकंद, कवठेमहांकाळ, काकडवाडी, जत, कर्नाळ, आरग, सोनी, व मिरज औद्योगिक वसाहत या ठिकाणीं कामें चालू आहेत.

गटार योजना : मिरज गटार योजना

वॉटर वर्क्स : गंगाधर बाळासाहेब वॉ. वर्क्स मिरज व कांकडवाडी वॉटर वर्क्स, कुमठें

सहकार

सांगली जिल्हा झाल्यापासून गेल्या बारा वर्षांत सहकारी क्षेत्रांत फार मोठ्या प्रमाणांत वाढ झालेली आहे. या जिल्ह्याकरितां १९५१ सालीं स्वतंत्रपणें असिस्टंट रजिस्ट्रार यांची नेमणूक करण्यांत आली. तेव्हांपासून या जिल्ह्यानें सहकारी क्षेत्रांत झपाट्यानें प्रगति केली आहे. पहिल्या पंचवार्षिक योजनेमध्यें सहकारास प्रथमच योग्य प्राधान्य देण्यांत आलें. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या काळांत ग्रामीण जनतेच्या शेतकी विषयक अडचणींकडे विशेष लक्ष केंद्रित करण्यांत आल्यावरून हें क्षेत्र अधिक विस्तृत व व्यापक झालें.

जून १९६० अखेर जिल्ह्यांतील सहकारी संस्थांची संख्या पुढील प्रमाणें आहे :

(१) जिल्हा मध्यवर्ति बँक	१
(२) शेती पतपेढी संस्था	
(१) मोठ्या आकाराच्या	१२०
(२) लहान आकाराच्या—	
(अ) पतपेढ्या	१०
(ब) विविध कार्यकारी संस्था	१३
(क) सेवा संस्था	३४९
(३) नागरी बँका	९
(४) नागरी पतपेढ्या	१०
(५) पगार मिळविणारांच्या सहकारी संस्था व बँका	१५
(६) गिरणी कामगारांच्या सहकारी संस्था व बँका	५
(७) कारखाने कामगारांच्या सहकारी संस्था	४
(८) धान्य बँका	९
(९) तालुका खरेदी विक्री संघ	६
(१०) खत पुरवठा सहकारी संस्था	२
(११) अवजारें आणि यंत्रपुरवठा सहकारी संस्था	१
(१२) इतर विक्री व पुरवठा सहकारी संस्था	१
(१३) डेअरी सहकारी संस्था	७
(१४) दूधपुरवठा संघ	१

(१५) शेती सहकारी संस्था

(१) शेती सुधार सहकारी संस्था ३

(२) सामुदायिक शेती सहकारी संस्था १०

(१६) पाणीपुरवठा सहकारी संस्था १०

(१७) सहकारी साखर कारखाना १

(१८) सहकारी प्रक्रिया संस्था १

(१९) चांगली राहाणी सहकारी संस्था १

(२०) जनता आरोग्य केंद्र १

(२१) सहकारी वाहतुक संस्था १

(२२) सहकारी शिक्षण संस्था १

(२३) तालुका विकास मंडळें १

(२४) सहकारी ग्राहक संस्था ७

(२५) सहकारी घर बांधणी संस्था १३

(२६) सहकारी वीजपुरवठा संस्था ४४

(२७) ग्राम विकास मंडळें २

(२८) जंगल कामगार आणि जंगल कंत्राटदार संस्था ६

(२९) जिल्हा औद्योगिक सहकारी संस्था ३२

(३०) विणकर सहकारी संघ १

(३१) इतर औद्योगिक सहकारी संस्था २६

(३२) सुपरवायझिंग युनियन्स ४२

(३३) जिल्हा सहकारी मंडळ १०

(३४) पीकसंरक्षण संस्था १

.. २

एकूण ७७८

जिल्ह्यांत १९५८–५९ सालीं एकूण ६७६ सहकारी संस्था होत्या. १९५९–६० सालच्या अखेरीस हा आंकडा ७७८ पर्यंत गेला. त्याचप्रमाणें सभासदांची संख्या ८७,९५० वरून १,०९,७४९ वर गेली आहे. म्हणजे एका वर्षांत २१,७९९ सभासद संख्या वाढली. जिल्ह्यांतील एकूण कुटुंबांच्या संख्येपैकीं ५५ टक्के कुटुंबांमध्यें सहकारी चळवळीचें लोण पोहोचविण्यांत आलें आहे. ग्रामीण भागांतील ४७ टक्के जनता यांत सामील झाली आहे, ५८–५९ सालीं सर्व सहकारी संस्थांचें मिळून खळतें भांडवल रु. ५,७१,८१,७३६ होते, तें ५९–६० सालीं रु. ७,३९,९४,४४७ झालें, म्हणजे एका वर्षांत रु. १,६८,१२,७११ नीं वाढलें. पूर्वींच्या वर्षांपेक्षां गेल्या वर्षी सरासरीनें सभासदांचे खेळते भांडवल रु. ६५० वरून रु. ६७० वर गेले. पुढील आंकडयांवरून गेल्या तीन वर्षांतील परिस्थिति कळून येईल.

साल	सहकारी संस्था	सभासद	भाग भांडवल	राखीव फंड व इतर निधी	खेळते भांडवल
१९५७–५८	६१३	७९,११६	७३,९९,९५७	२७,२४,२४१	४,३७,१९,९११
१९५८–५९	६७६	८७,९५०	९१,६८,३१५	२७,२४,४६०	५,७१,८१,७३६
१९५९–६०	७७८	१,०९,७४९	१,०९,१५,०३७	५१,७७,२२०	७,३९,९४,४४७

चालू वर्षी जिल्ह्यांतील सर्व सहकारी संस्थांनीं मिळून ९९.७२ खेडीं आपल्या कार्यमर्यादेंत आणलेली आहेत. कांहीं प्रकारच्या सहकारी संस्थांना सरकारनें त्यांच्या भाग भांडवलांत भाग घेतल्यामुळें खेळत्या भांडवलाचा आंकडा एकदम वाढलेला दिसून येत आहे. कांहीं सहकारी संस्थांच्या व्यवस्था खर्चासाठींहि मदत करण्यांत आली असून कांहीं विशेष प्रकारच्या संस्थांना कर्जपुरवठाहि केला आहे.

शेती पतपुरवठा विस्तार :—दुसऱ्या पंचवार्षिक योजनेमधील सहकारी खात्याच्या या योजनेखालीं या जिल्ह्यांतील ५२५ खेडीं आणण्यांत आलीं आहेत. ग्रामीण भागांतील ४७ टक्के जनता ४९२ सहकारी संस्थांचा फायदा घेत असून त्यांची सभासद संख्या ६९,३४४ आहे. या संस्थांचें भाग भांडवल रु. ४६,२१,८८४ आहे व त्यांची गंगाजळी व इतर निधी रुपये १४,८४,५९८ असून त्यांचे खेळतें भांडवल रु. १,७५,७६,३७५ आहे. गेल्या वर्षांत या संस्थांनीं १,३६,७१,३४९ रु. कर्ज दिलें आणि रु. १,०४,३२,९९८ वसूल करण्यांत आले. या संस्थांना हंगामी किंवा अल्प मुदतीचें कर्ज जिल्हा मध्यवर्ती बँकेकडून दिलें जातें.

१२० मोठ्या आकाराच्या शेतकी पतपेढ्यांपैकीं ८२ संस्थांना सरकारी भाग भांडवल भागिदारी मिळाली आहे. याप्रमाणें मिळालेली रक्कम रु. ११,५७,३०० असून या संस्थांचें खेळतें भांडवल रु. ९५,५८,९६६ आहे.

सेवा संस्था

गेल्या वर्षीं शेती पतपेढ्या व विविध कार्यकारी सहकारी संस्था मिळून २९२ संस्थांचें सेवा सहकारी संस्थांमध्यें रूपांतर करण्यांत आलें व ५७ नवीन संस्था निर्माण झाल्या. त्यांची सभासद संख्या ३८,७३३ झाली असून त्यांचें खेळतें भांडवल रु. ७६,९५,४९५ झालें आहे. त्यांनीं रु. ६२,८०,५४७ कर्ज दिलें व रु. ४५,७४,०५८ वसूल केले.

मध्यवर्ती सहकारी बँक

द. सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक १९२० सालीं स्थापन करण्यांत आली. आज या बँकेच्या सर्व तालुक्याच्या ठिकाणीं शाखा असून शिवाय चार शाखा सोईच्या इतर ठिकाणीं आहेत. या बँकेच्या ६०५ सहकारी संस्था सभासद असून व्यक्तिगत सभासद ७६५ आहेत. बँकेचें भाग भांडवल रु. १३,९४,५७० असून गंगाजळी व इतर निधी रु. २,९५,९७८ आहे. खेळतें भांडवल रु. १,५९,६३,३४२ आहे. बँकेनें गेल्या वर्षी रु. १,३२,२२,५४७ कर्ज दिलें व रु. २,०८,९१,३९३ वसूल केले. सहकारी साखर कारखान्यामुळें उंसाखालील क्षेत्र सारखें वाढत आहे. बँकेनें गांवोगांवच्या पतपेढ्यांना व वैयक्तिक शेतकऱ्यांना कर्ज देऊन मदत केली आहे. बँकेनें चालू वर्षांत सप्टेंबर १९६० अखेर ८२.०२ लाख रु. साधें कर्ज व रु. ०.८४ लाख मध्यम मुदतीचें कर्ज वांटप केलें आहे.

लँड मॉर्गेज बँक

कराड येथील लँड मॉर्गेज बँक, सातारा व सांगली या दोन्ही जिल्ह्यांचें काम पाहाते. या बँकेनें सांगली जिल्ह्यांत इस्लामपूर, तासगांव व सांगली येथें शाखा उघडल्या आहेत. १९५९–६० सालांत या बँकेनें या जिल्ह्यांत एकूण १८७ शेतकऱ्यांना रु. ३,६१,४५० ची दीर्घ मुदतीचीं कर्जें दिलीं. सांगली जिल्ह्याकरितां स्वतंत्र लँड मॉर्गेज बँक काढण्याचा प्रयत्न चालू आहे.

सांगली जिल्ह्यांत एकूण ९ अर्बन बँका काम करीत आहेत. त्यांची सभासद संख्या ६६ हजार असून भाग भांडवल रु. ६ लाख १ हजार ५८० आहे. राखीव व इतर निधी रु. ६ लाख ८९ हजार ४२२ आहे. खेळतें भांडवल रु. ९८ लक्ष ७८ हजार ८४० आहे. या सर्व बँकांनीं सभासद संख्येंत व त्यांच्या कार्यक्षेत्रांत चांगलीच प्रगति केली आहे. गेल्या वर्षांत सांगली अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकेनें व विटा व्यापारी सहकारी बँकेनें उल्लेखनीय प्रगति केली आहे.

नागरी बँक

सांगली जिल्ह्यांतील सर्व तालुक्यांतून खरेदी विक्री संघ स्थापन करण्यांत आले असून त्यांचें कार्यक्षेत्र तालुक्यापुरतें मर्यादित करण्यांत आलें आहे. यापैकीं वारणा खोरें खरेदी विक्री संघ, इस्लामपूर आणि गणपती खरेदी विक्री संघ, सांगली या दोन संस्था भरभराटीच्या मार्गावर आहेत व जिल्ह्यामध्यें त्या प्रामुख्यानें शेतकरी वर्गाला जरूर त्या सर्व वस्तूंचा पुरवठा करण्याचा प्रयत्न करतात. याशिवाय सर्व जिल्ह्याकरितां म्हणून एक संस्था काढण्याचा प्रयत्न चालू आहे.

सहकारी खरेदी विक्री विकास योजनेखालीं जिल्ह्यांतील हें काम करणाऱ्या सहकारी संस्थांना भाग भांडवलांत भागिदारी, कर्ज व व्यवस्था खर्चांत मदत दिली जाते. आतांपर्यंत या योजनेखालील ३८ हजार ५१५ रु. भाग भांडवल, ३ लाख ४ हजार ५०० रु. कर्ज आणि व्यवस्था खर्चांत मदत म्हणून १ लाख १ हजार ५०० रु. देण्यांत आले आहेत. गुदामें बांधण्यासाठींहि कर्ज व मदत सरकारनें दिली आहे. आतांपर्यंत एक मोठ्या आकाराचें व पांच मध्यम आकाराचीं व ३२ लहान आकाराचीं अशीं एकूण ३८ गुदामें मंजूर करण्यांत आलीं आहेत. यापैकीं ४ गुदामें खरेदी विक्री संघाचीं असून बाकीचीं ३४ गुदामें विविध कार्यकारी सहकारी संस्थांचीं आहेत. या सर्वांपैकीं ९ गुदामें बांधून झालीं असून त्यांचा शेतीमालाचा सांठा करण्यासाठीं उपयोग केला जात आहे. बाकींच्या गुदामांचें बांधकाम चालू आहे. याशिवाय चालू वर्षी ३७ लहान आकाराच्या गुदामांकरितां व २ मध्यम आकाराच्या गुदामांकरितां मागणी आली असून तिचा विचार चालू आहे. अशा तऱ्हेनें शेतकऱ्यांच्या मालास योग्य भाव मिळेपर्यंत तो सुरक्षितपणें ठेवण्याची सोय करण्यांत आली आहे.

सहकारी शेती संस्था

सांगली जिल्ह्यांत एकूण १३ सहकारी शेती संस्था काम करीत आहेत. त्यापैकीं दहा सहकारी सामुदायिक संस्था व तीन शेती सुधार संस्था आहेत. दहा सामुदायिक संस्थांपैकीं आठ मागासलेल्या लोकांकरितां व दोन बिगर हरिजन लोकांकरितां आहेत. या संस्थांचे एकूण सभासद ५६६, भाग भांडवल ४६,२६० रु. व गंगाजळी ९,०६२ रु. आहे आणि खेळतें भांडवल रु. २,००,६६९ आहे. या संस्थांच्या ताब्यांतील जमिनीचें क्षेत्र २६७६ एकर असून १३४५ एकर लागवडीखाली आणलें आहे.

पाणीपुरवठा सहकारी संस्था

या जिल्ह्यामध्यें १० पाणीपुरवठा सहकारी संस्था आहेत. याशिवाय सहकारी साखर कारखाना व सहकारी शेतकी सोसायटी या दोन संस्थांनीं पांच पाणीपुरवठा योजना हातीं घेतल्या आहेत. या सहकारी संस्थेचे सभासद १,०५४ आहेत. त्यांचें भाग भांडवल २,३२,९६७ रुपये असून गंगाजळी ४२,७२४ रुपये आहे. त्यांचें खेळतें भांडवल १२,५०,३१० रुपये आहे. त्यांच्या पाणीपुरवठा क्षेत्राखालीं ४,२६५ एकर जमीन असून १९५९–६० सालीं ६२६ एकर जमिनीस पाणीपुरवठा केला गेला. या संस्थांना या योजनेखालीं कर्ज व व्यवस्था खर्चासाठीं अनुक्रमें २,७८,९२१ रुपये व १,००,९८२ रुपये सरकारनें दिले आहेत.

दूधपुरवठा योजना

सांगली शहरांतील नागरिकांना निर्भेळ व स्वच्छ ताजे दूध वेळेवर मिळावे म्हणून शहराच्या आसपास व १२ मैलांच्या आंत सात दूधपुरवठा सोसायटचा स्थापल्या आहेत. शिवाय सांगली शहरांत एक दूधपुरवठा संघ स्थापन केला आहे. या सर्व संस्थांचे ४३८ सभासद आहेत आणि त्यांचें ८,३८५ रु. भाग भांडवल आहे. १,६२३ रुपये गंगाजळी असून त्यांचें खेळतें भांडवल ५२,५२० रुपये आहे. १९५९–६० सालीं ८८,४७२ रुपयांचें दूध खरेदी करण्यांत आलें. त्याच्या विक्रीची रक्कम रु.९३,०८२ रुपये झाली. याशिवाय सरकारतर्फें मिरज या ठिकाणीं नवीन दूधपुरवठा योजना सुरूं करण्याचें ठरविलें असून तिचें सुरवातीचें काम चालू आहे.

वीजपुरवठा सहकारी संस्था

वीज पुरवठा करणाऱ्या दोन संस्था या जिल्ह्यांमध्यें असून त्या विटा व तासगांव येथें आहेत. त्यांचे सभासद ६२२ आहेत. भाग भांडवल १,१३,९५० रुपये आहे. ६८,३२१ रुपये गंगाजळी असून खेळतें भांडवल रु. ६,३३,४८६ आहे. यापैकीं तासगांव संस्थेस ९१,७३० रुपये कर्ज दिलें असून ११,५७२ रु. व्यवस्था खर्च मिळाला आहे. तासगांव संस्था शेतीस पाणीपुरवठा करण्यासाठीं वीज देत असते. एकंदरींत दोन्ही संस्थांचे व्यवहार उत्तम चालले आहेत.

सहकारी घर बांधणी संस्था

या योजनेखालीं ४४ संस्था स्थापन झाल्या असून त्यापैकीं तीस मागासलेल्या जमातीसाठीं आहेत व १४ बिगर मागासलेल्या मध्यम वर्गीय लोकांसाठीं आहेत. या ३० संस्थांपैकीं ११ संस्थांना जागा मिळाली असून त्यापैकीं पांच संस्थांनीं बांधकाम सुरू केलें आहे. आतांपर्यंत त्यांनीं २३६ घरें पूर्ण केली असून सहाचीं कामें चालू आहेत.

मध्यमवर्गीयांच्या स्थापलेल्या १४ संस्थांपैकीं चार संस्थांना जागा मिळाली असून त्यापैकीं तीन संस्थांनीं घरें बांधणीचें काम सुरू केलें आहे. या सर्व संस्थांचे सभासद १,८७५ आहेत. त्यांचें भाग भांडवल ७५,९४९ रुपये असून गंगाजळी २,५५४ रुपये आहे. खेळतें भांडवल ६,७१,११७ रुपये आहे. या योजनेखालीं मागासलेल्या जमातींसाठीं स्थापलेल्या संस्थांना कर्ज व व्यवस्था खर्च अनुक्रमें २,०७,०७५ रुपये व १६,६४७ रुपये दिले आहेत.

बिगर शेती पत पुरवठा

ज्याप्रमाणें शेतकऱ्यांना शेती सुधारण्यासाठीं मदतीची आवश्यकता आहे त्याप्रमाणें नागरी लोकांना वेगवेगळे उद्योग चालू करण्यासाठीं भांडवलाची व इतर मदतीची आवश्यकता आहे. त्यांच्या या गरजा भागविण्यासाठीं नागरी संस्था स्थापन करण्यांत आल्या आहेत. या जिल्ह्यांत अशा स्थापन केलेल्या लहान मोठ्या ४३ संस्था आहेत. त्यामध्यें अर्बन बँका वगैरे सामील आहेत. या सर्व संस्थांचे सभासद १६,३२८ असून त्यांचें भाग भांडवल १७,१७,९५२ रुपये व गंगाजळी ९,४४,९६९ रुपये आहे. खेळतें भांडवल १,१९,६१,४९८ रुपये आहे.

जिल्हा सहकारी बोर्ड

जिल्ह्यांतील सहकारी संस्थांना मदत करण्याच्या दृष्टीनें जिल्हा सहकारी बोर्ड स्थापन करण्यांत आलें आहे. या बोर्डातर्फें दोन ट्रेनिंग इन्स्पेक्टर्स शिक्षणाचें व प्रचाराचें काम करतात.

महाराष्ट्र राज्यांत आतांपर्यंत १३ सहकारी साखर कारखाने स्थापन झाले असून आणखी ६ नवीन सहकारी साखर कारखानें निर्मितीच्या मार्गावर आहेत. सांगलीच्या कारखान्याच्या उभारणीनंतर गळिताचे दोन हंगाम पूर्ण झाले असून तिसरा सध्या चालू आहे. पहिल्या हंगामाच्या वेळीं ऊंस एकरीं सरासरी २४.२१ टन आला पण दुसऱ्या हंगामाचे वेळीं तो २७.३ टन आला. त्याचप्रमाणें ऊंसाच्या वसुलीमध्येंहि वाढ होत आहे.

शेतकी सहकारी साखर कारखाना सांगली

या कारखान्याच्या ऊंस लागवडीचें क्षेत्र सांगलीच्या भोंवती ७६ गांवांत पसरलेलें आहे. हें क्षेत्र इतक्या गांवांतून पसरविण्याचें कारण या भागांत कालवे नाहींत हें होय. कृष्णा, वारणा, वेरळा, आदि नद्या वर्षभर वाहात असूनहि जमीन उंचवटे आणि टेकडया यांनीं वेढल्यामुळें कालवे काढतां येत नाहींत. त्यामुळें शेतकऱ्याला विहिरींतील पाण्यावर अवलंबून राहावे लागते. साखर कारखाना उभारल्यानंतर उंसाच्या पिकाला शाश्वती मिळाल्यामुळें बहुसंख्य शेतकरी ऊंस लावण्याची पराकाष्टा करीत आहेत. ऊंसाच्या मशागतीचें शास्त्रीय ज्ञानहि ते आतां आत्मसात करू लागले आहेत. त्यामुळें दिवसेंदिवस ऊंसक्षेत्रामध्यें सारखी वाढ होत आहे. ऊंस पिकविणाऱ्यांस उत्तेजन मिळावे म्हणून कारखान्यानें ऊंस पीक-स्पर्धा ठेवून सर्वांत जास्त ऊंस पिकविणाऱ्यास बक्षिसें देण्याचें ठरविलें आहे. गेल्या वर्षी सर्वांत जास्त म्हणज एकरीं ६८ टन ऊंस झाल्याचें आढळून आलें आहे. सभासदांना ऊंस वाढीकरितां मदत करण्याचा कारखान्यानें योजनाबद्ध कार्यक्रम हातीं घेतला आहे व या कामी सरकारचें साहाय्यहि मिळालेलें आहे. सभासदांना खतें पुरविणें, तज्ञांकडून तांत्रिक व यांत्रिक मदत देवविणें, अभ्यास दौरे आखणें, लिफ्ट इरिगेशन स्कीम्स अमलांत आणणें, ऑइल इंजिन्स पुरविण्याची व्यवस्था करणें वगैरे गोष्टी हातीं घेतल्यामुळें शेतकऱ्यांच्यामध्यें आत्मविश्वास निर्माण झाला आहे.

कारखाना व्यवस्थित सुरूं झाल्याबरोबर कामगारांच्या हिताच्या गोष्टी व्यवस्थापकांनीं हातीं घेतल्या आहेत. सरकारच्या मदतीनें कामगार वसाहतींत १०२ गाळे व दोन खोल्यांचें ८४ गाळे बांधले जाणार असून त्यांमधून १८६ कामगार कुटुंबांची सोय होणार आहे. प्राथमिक शाळा व बालक मंदिरहि सुरूं करण्यांत आलें आहे. आधुनिक उपकरणांनीं युक्त असा दवाखाना सुरूं करण्यांत आला असून कामगार वसाहतींत एक तालीमहि बांधण्यांत आली आहे. कामगारांनीं स्वतःच्या आर्थिक अडचणी निवारण्यासाठीं सेवक सहकारी पतपेढीहि सुरू केली आहे.

जून १९६० अखेर या कारखान्यांची सभासद संख्या १७८४ आहे. त्यांत उत्पादन सभासद (अ-वर्ग) १५५९, व्यक्तिगत (ब-वर्ग) ४०, सहकारी पतपेढया (क-वर्ग) ४८ व नाममात्र सभासद १३७ आहेत. अ, ब व क या तीन वर्गांची मिळून भाग संख्या २५५७ असून त्यांनीं गुंतविलेलें भाग भांडवल १२,७८,५०० रुपये आहे. महाराष्ट्र सरकारनें १००० भाग घेतले असून त्याचें भाग भांडवल १० लाख रुपयांचें आहे. या कारखान्यांकरितां इंडस्ट्रियल फायनान्स कॉर्पोरेशननें आतांपर्यंत ६५ लाख रुपयांचें कर्ज मंजूर केलें आहे. तसेंच महाराष्ट्र राज्य सरकारी बँकेनेंहि कारखान्यांस वेळोंवेळीं कर्ज देऊन मदत केली आहे. राज्य सरकारकडूनहि निरनिराळ्या योजनांखालीं कर्ज घेण्यांत आलें आहे.

या कारखान्याचा पहिला हंगाम ५८–५९ सालीं झाला. या हंगामांत ५१,८०१ पोतीं साखर तयार करण्यांत आली. दुसऱ्या ५९–६० च्या हंगामांत ८७,४०५ पोतीं साखर तयार झाली.

चालू वर्षीं हा आंकडा १,६०,००० पोत्यांपर्यंत जाईल अशी अपेक्षा आहे. गेल्या वर्षीं सरासरीनें दर पोत्यास ११०.१४ रु. दर पडला. कारखान्यांस घाऊक साखर विक्रीचा परवाना सरकारकडून मिळाला असून कारखान्यामार्फत सांगली जिल्ह्यांतील साखर वांटपाचें काम होत आहे.

या कारखान्याच्या उंसापासून निघणाऱ्या मळीपासून इंडस्ट्रियल अल्कोहोल निर्माण करण्याचें ठरविलें आहे. या कामीं या कारखान्यांशिवाय, इचलकरंजी व रेठरेबुद्रुक येथील सहकारी साखर कारखान्यांची मळी एकत्र करून सहकारी तत्त्वांवर वार्षिक १२,६०,००० गॅलन इंडस्ट्रियल अल्कोहोल तयार करण्याची योजना आंखण्यांत आली आहे. सरकारकडून सदर प्लॅनसाठीं "सांगली सहकारी डिस्टिलरी" या नांवानें परवाना देखील मिळाला आहे.

सांगली जिल्ह्यांतील कार्यकर्त्यांच्या चिकाटीमुळें व त्यांनीं केलेल्या अविश्रांत श्रमामुळें हा कारखाना अगदी अल्पावधींत उभारण्यांत आला असून त्याला शेतकरी वर्गाचाहि सक्रिय पाठिंबा मिळाला आहे.

सावकार नियंत्रण कायदा

सहकारी सोसायटचांचे असिस्टंट रजिस्ट्रार हेच सावकार नियंत्रण कायद्यासाठीं असिस्टंट रजिस्ट्रार ऑफ मनिलेंडर्स म्हणून एका इन्स्पेक्टर ऑफ मनिलेंडर्सच्या साहाय्यानें काम करीत असतात. इन्स्पेक्टर हे सर्व जिल्हाभर फिरती करून अधिकृत लायसेन्स सावकारांच्या व्यवहाराची तपासणी करतात, त्यांना मार्गदर्शन करतात व बिगर परवाना सावकारी करणाऱ्या सावकारांवर कायदेशीर इलाजाची उपाय योजना करतात.

सॉल्व्हट एक्स्ट्रॅक्शन प्लॅन्ट

सांगली जिल्ह्यांतील भुईमूग उत्पादन करणाऱ्या जिराईत जमीन असलेल्या शेतकरी बंधूंना त्यांच्या मालापासून निर्माण होणाऱ्या पक्क्या मालाचा फायदा मिळावा या उद्देशानें सांगली येथें एक सॉल्व्हंट एक्स्ट्रॅक्शन प्लॅन्ट उभारण्यासाठीं दि ग्राऊंड-नट प्रोडयूसर्स को-ऑपरेटिव्ह सोसायटी लि., सांगली, या नांवाची एक सहकारी संस्था दि. २४ फेब्रुवारी १९६० रोजीं मुंबई सहकारी कायद्याखालीं रजिस्टर झाली. या संस्थेकडून सांगली येथें शेतकरी सहकारी साखर कारखान्यालगतच पेंडेंतील अवशेष तेल गाळून काढणारा सॉल्व्हंट एक्स्ट्रॅक्शन प्लँट उभारला जाणार आहे.

या कारखान्याच्या उभारणीला एकूण १५ लक्ष रुपयांचें भांडवल लागणार असून सोसायटीनें पश्चिम जर्मनी येथील मेसर्स लुर्गी कंपनीच्या मशिनरीसाठीं करार केला आहे. या कारखान्याची एक-तृतीयांश मशिनरी परदेशी असून दोनतृतीयांश मशिनरी भारतांतच तयार केली जाणार आहे. महाराष्ट्र राज्य सरकारनें या सोसायटीचें दोन लक्ष रुपयांचे शेअर्स खरेदी केलेले आहेत. या कार-खान्यामध्यें दररोज ५० टन पेंडेचें गाळप केलें जाणार आहे.

सॉल्व्हंट कारखान्याला पेंडीचा नियमित पुरवठा व्हावा याकरितां जिल्ह्यांतील मध्यवर्ति ठिकाणीं सहकारी पद्धतीवर ऑईल एक्स्पेलर्स बसविले जाणार आहेत. त्याचप्रमाणें जिल्ह्यांतील सर्व ग्रामीण भागांत रोटरी घाणे सुरूं करणेचे प्रयत्न सुरूं आहेत.

या सॉल्व्हंट कारखान्यामध्यें पेंडेंतील तेल काढल्यानंतर राहणाऱ्या पेंड-अवशेषाचा, शेतकऱ्यांना, अधिक अंश नॅट्रोजनयुक्त खत म्हणून वापर करतां येणार असल्यानें जिल्ह्यांतील शेतकऱ्यांचीं खत पुरवठ्याची अडचण निवारण होणार असून अवशिष्ट पेंडेपासून जनावरांना योग्य असें खाद्यहि तयार केलें जाणार आहे.

या कारखान्यासोबत तेल शुद्ध करणारे रिफायनरी युनिटदेखील निघणार असून हा कारखाना ऑक्टोबर १९६१ च्या सुमारास प्रत्यक्ष उभारला जाईल अशी अपेक्षा आहे.

जपानी भातशेती योजना शिराळा

जपानी पद्धतीची भात शेती आपल्याला उपकृत होईल असे प्रयोगाअंती ठरल्यानंतर प्रश्न असा उपस्थित झाला कीं गरीब शेतकऱ्यांना आर्थिक मदत दिल्याशिवाय ही पद्धत प्रत्यक्ष अंमलांत येणार कशी ? गांवोंगांवच्या सहकारी पतपेढ्यांमार्फत गरजूं शेतकऱ्यांना खताकरितां व बियाण्यांकरितां कर्ज देण्यांत यावे व पतपेढ्यांना मध्यवर्ती सहकारी बँकेनें कर्जपुरवठा करावा अशी योजना आंखण्यांत आली. अशा तऱ्हेची योजना शिराळा महालांत १ एप्रिल १९५९ पासून लागू करण्यांत आली आहे. सहकारी पतपेढ्यांतून दिल्या जाणाऱ्या कर्जाची पूर्तता करण्यासाठीं सहकारी खात्यांतील एक असिस्टंट रजिस्ट्रार यांची या कामाकरितां खास नेमणूक करण्यांत आली. एक खास शेतकी अधिकारीहि या विभागाकरितां नेमण्यांत आला. खतवाटपाची जबाबदारी वारणा खरेदी-विक्री संघाकडे सोपविण्यांत आली. या संघानें १५ ठिकाणीं वांटप केंद्रें उघडून खत वांटपाची व्यवस्था केली.

सन १९५९ सालीं सरकारी कर्मचारी व कार्यकर्ते यांच्या मदतीनें स्थानिक शेतकऱ्यांना जपानी पद्धतीचें महत्त्व पटवून देण्यांत आले. या वर्षी शेतकऱ्यांना रु. १,२३,४४३ खतांच्या स्वरूपांत व रु. ९७,७०३ रोखीच्या स्वरूपांत कर्ज देण्यांत आलें. दिलेल्या उत्तेजनामुळें जास्तींत जास्त एकरी १४५ बंगाली मणापर्यंत शेतकऱ्यांनीं भात काढलें. एकूण भात पिकाची किंमत साधारणपणें रु. ३१ लाख ४६ हजार झाली. नेहमीच्या पद्धतीनें रु. १८ लाख ८३ हजार किंमतीचें उत्पादन झालें असतें. यावरून साधारणपणें रु. १२ लाख ६३ हजारांचें जादा उत्पन्न शेतकऱ्यांना मिळालें.

सन १९५९ सालीं झालेल्या निश्चित प्रगतीमुळें शेतकऱ्यांमध्यें विश्वास निर्माण झाला व त्यामुळें १९६० सालीं ११,८९८ एकर क्षेत्र जपानी पद्धतीखाली आणण्यांत आलें. शेतकऱ्यांना . ३ लाख ७ हजार २८८ खताच्या स्वरूपांत व रु. १ लाख ५२ हजार ३४० रोखीच्या स्वरूपांत कर्ज म्हणून देण्यांत आलें.

निरनिराळ्या प्रकारचीं खतें, रोखीचें कर्ज, बी-बियाण्यांचें वांटप या सर्व गोष्टीं सहकारी संस्थांमार्फत होत असल्यामुळें सहकारी क्षेत्रांतहि भरीव वाटचाल झालेली आहे. या योजनेमुळें सहकारी पतपेढ्यांच्या संख्येंत १७ ची भर पडून ही संख्या ५३ पर्यंत गेली आहे. सहकारी सभासदांची संख्याहि ३०७४ वरून ८००० वर गेली आहे. शिराळा महालांत सहकारी चळवळीची सुरवात ४५ वर्षापू र्वीं झाली. पण गेल्या दीड वर्षांत या योजनेमुळें झपाट्यानें प्रगति झालेली दिसून येत आहे.

कर्जपुरवठा व शेतमालाचा क्रय-विक्रय यांची योग्य सांगड घालण्याचा प्रयत्न चालू आहे. यासाठीं सहकारी संस्थांना गुदामें बांधण्याकरितां सरकारनें प्रत्येकी रु. ७५०० कर्ज आणि रु. २५०० मदत देऊ केली आहे. याचा फायदा घेऊन आतांपर्यंत दोन संस्थांनीं गुदामें बांधली असून आणखी दोन नुकतीच मंजूर झालीं आहेत. तालुका खरेदी-विक्री संघहि एक मोठें गुदाम बांधण्याच्या विचारांत आहे. सहकारी पतपेढ्यांचा वाढता व्याप लक्षांत घेऊन सरकारनें पतपेढ्यांना आर्थिक मदत देण्याचें ठरविलें आहे. पांच वर्षांसाठीं दरवर्षी रु. ३०० मदत देण्याची योजना आंखण्यांत आली असून खत-वांटप संस्थांना प्रत्येकी रु. ६०० मदतीच्या स्वरूपांत देण्याचीहि योजना आहे. गेल्या वर्षी या भागांतील सहकारी संस्थांना रु. ८,९०० मदत देण्यांत आली.

सामुदायिक विकासामुळें जनजागृति

स्वातंत्र्य प्राप्तीनंतर देशाच्या विकासाची मुहूर्तमेढ रोवली गेली. शेतीप्रधान व बहु-संख्येनें ग्रामीण भागांत राहणाऱ्या विविध घटकांतील लोकांचें जीवनमान सुधारावे म्हणून नियोजनाचा मार्ग पत्करला व लोकांच्या सहकार्यानें विविध योजना हातीं घेण्याचा संकल्प करण्यांत आला. जनतेंत जागृति केल्याशिवाय तिचें सक्रिय सहकार्य मिळवितां येणार नाहीं म्हणून आर्थिक शक्तीच्या जोडीला ग्रामीण भागांतील जनतेच्या सुप्त विधायक शक्तीची नियोजनाशीं सांगड घालण्यांत आली. ग्रामीण भागांतील शक्ति जागृत करून ती विकासाच्या कामीं लावण्याचें काम जिल्हा विकास मंडळ, समाज विकास गट व सर्वोदय योजना मार्फत करण्यांत येत आहे.

जिल्हा विकास मंडळ

जिल्ह्यांतील विविध क्षेत्रांतील आणि भागांतील जनतेचे प्रतिनिधी आणि जिल्ह्यांतील सर्व खात्यांचे प्रमुख अधिकारी हे सभासद असलेले जिल्हा विकास मंडळ असून जिल्हाधिकारी या मंडळाचे अध्यक्ष आहेत. जिल्ह्यांतील अनुभवी सार्वजनिक कार्यकर्त्यांमधून सरकारकडून उपाध्यक्ष व चिटणीस यांची नियुक्ति करण्यांत येते. तसेंच जिल्हा प्रकल्पाधिकारी या प्रांत ऑफिसरच्या दर्जाच्या अधिकाऱ्याची संयुक्त चिटणीस म्हणून नियुक्ति करण्यांत येते. या जिल्हा विकास मंडळाचें एकूण ६५ सभासद असून त्यांत सरकारी १९ व बिन सरकारी ४६ सभासद आहेत. या मंडळाची कचेरी सांगली येथें असून मंडळाच्या एकूण १२ उपसमित्या पुढीलप्रमाणें आहेत. समाज विकास गट उपसमिति, पोलीस सल्लागार उपसमिति, दारुबंदी उपसमिति, ग्राम विकास उपसमिति, पाणी पुरवठा रस्ते-पाट बंधारे उपसमिति, समाज कल्याण उपसमिति, सहकारी मार्केटिंग उपसमिति, सार्वजनिक आरोग्य उपसमिति, समाज शिक्षण उपसमिति, प्रसिद्धि उपसमिति, स्थानिक विकास उपसमिति व लेबर कॉंट्रॅक्ट सल्लागार उपसमिति. वरील उपसमित्यांपैकीं जिल्हाधिकारी हे पहिल्या दोन उपसमित्यांचे अध्यक्ष असून बाकीच्या उपसमित्यांचे मंडळाचे उपाध्यक्ष अध्यक्ष असतात. संबंधित खात्याचे जिल्हाप्रमुख अधिकारी त्या समितीचे चिटणीस म्हणून काम करतात. या उपसमित्या जिल्ह्यांतील विविध खात्याच्या समाज कल्याणाच्या योजनांना गती देतात व मार्गदर्शन करतात.

स्थानिक विकास कामें

जिल्ह्यांतील जनतेच्या सहकार्यानें विविध स्थानिक विकास कामें करण्यासाठीं राज्यसरकार व भारत सरकारकडून आर्थिक साहाय्य मिळते. ग्रामीण भागांत अशीं कामें करतांना जनतेनें कामावर व्हावयाच्या एकूण खर्चापैकीं ५० टक्कें रक्कम रोख अगर श्रमदानानें द्यावयाची असते. मागासलेल्या वर्गांकरितां व विभागाकरितां, लोक वर्गणी २५ टक्क्यांपर्यंत कमी करण्यांत येते. १९५३-५४ सालापासून

नोव्हेंबर १९६० पर्यंत या जिल्ह्यांत स्थानिक विकासांचीं ५७९ कामें मंजूर करण्यांत आली होतीं; त्यापैकीं ४४९ कामें पूर्ण झालीं आहेत. कामाचे तालुकावार वर्गीकरण वेगळे दिले आहे. या सर्व कामाची किंमत अंदाजे रु. २२ लाख होत आहे. एकूण १९७ मैलांचे २०४ जोडरस्तें या योजनेखाली ग्रामस्थांनीं तयार केले आहेत. वरील स्वरूपाचीं स्थानिक विकासाचीं कामें जिल्ह्यांत विकास गट क्षेत्र नसलेल्या ठिकाणीं जिल्हा विकास मंडळामार्फत हातीं घेतली जातात व जिल्हा बांधकाम खातें अथवा जिल्हा लोकल बोर्डाच्या देखरेखीखालीं पूर्ण केली जातात. ग्राम समिति अगर ग्रामपंचायत अशा कामाची जबाबदारी घेण्यास तयार असेल तर त्यांच्यावरहि हें काम सोपविण्यांत येतें.

इतर कामें

द्वितीय पंचवार्षिक योजनेच्या काळांत १९५८–५९ ते १९६०–६१ या तीन वर्षांकरितां मिसलेनियस् स्कीम्सखालीं एकूण १ लाख ४३ हजार रुपये मंजूर करण्यांत आले आहेत. या योजनेनुसार जिल्ह्यांत पुढील प्रमाणें एकूण १७ कामें हातीं घेण्यांत आलेली आहेत.

शिराळा येथें स्टेडीयम, चार खोल्यांचें वसतिगृह व एक वाचनालयाची इमारत, कोकरूड येथें बालवाडी शाळा, सोनवडे येथील तळे दुरुस्ती, सांगली येथील तालीम, वाघोली येथील एका खोलीची शाळा, खरकटवाडी येथील नळानें पाणीपुरवठा योजना, बिळाशी येथील तळें, इस्लामपूर येथें चार खोल्यांचें वसतिगृह, वायफळे ते यमगरवाडी दीड मैलाचा रस्ता, बांबवडे येथील फरशी, टेक्निकल हायस्कूल रामानंदनगर व टेक्निकल हायस्कूल पलूस––या दोन संस्थांचें साहित्य, बाणूरगड रस्ता ५ मैल लांबीचा, गोंदिलवाडी ते पलूस दीड मैल लांबीचा रस्ता, विश्रामबाग येथील पावर हाऊस तें रेल्वे स्टेशनपर्यंत ६ फर्लांगाचा रस्ता. या सर्व कामांपैकीं रामानंदनगर व पलूस यथील टेक्निकल हायस्कूलच्या साहित्याकरितां ७५ टक्कें रक्कम सरकार देणार असून बाकीच्या कामांकरिता ५० टक्के रक्कम रोख अगर श्रम रूपानें लोकांनीं जमवावयाची आहे.

ग्रामीण भागांत पाणीपुरवठा

ग्रामीण पाणीपुरवठा योजनेखालीं सांगली जिल्ह्यांत एकूण ८२० विहिरी मंजूर करण्यांत आल्या होत्या. त्यापैकीं एप्रिल १९५८ ते नोव्हेंबर १९६० पर्यंत ५०५ विहिरी पुऱ्या करण्यांत आल्या असून ३१५ ची कामें चालू आहेत. हातीं घेतलेला हा कार्यक्रम पुरा झाल्यानंतर सांगली जिल्ह्यांत गांवें आणि वाड्या मिळून फक्त ५० ठिकाणें विना विहिरींचीं राहणार आहेत. तृतीय पंचवार्षिक योजनेच्या अखेरपर्यंत जिल्ह्यांतील सर्व ठिकाणीं पिण्याच्या पाण्याची सोय करण्याचा जिल्हा विकास मंडळानें निर्धार केला आहे.

ताली घातलेल्या विभागांतील विहिरींची योजना

दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंतील मध्यवर्ती सरकारच्या कर्ज पुरवठा योजनेनुसार राज्य सरकारनें ताली घातलेल्या विभागांत विहिरी काढण्याचा कार्यक्रम हातीं घेतला आहे. या कार्यक्रमानुसार साधारणपणें दर ७० एकराला १ विहीर असावी अशा धोरणानें सांगली जिल्ह्यांतील बांधबंदिस्ती खालील क्षेत्राचा विचार करून १८३२ विहिरींचें लक्ष्य ठरविण्यांत आलें होतें. जिल्हा विकास मंडळानें १९२८ विहिरी बांधण्याचें ठरविले होतें. पण प्रत्यक्षांत शेतकरी लोकांनीं इतका

उत्साह दाखविला की तगाई घेऊन २४६१ विहिरी पुऱ्या करण्यांत आल्या. या विहिरींना दर विहिरीमागें एकूण खर्चाच्या २० टक्के अगर जास्तींत जास्त रु. ५०० पर्यंत, जी रक्कम कमी होईल तेवढी मदत सरकारकडून दिली जाणार आहे.

शेतकऱ्यांना विहिरीकरितां मदत.

सांगली जिल्ह्यांत शेतकऱ्यांना शेतांतील नवीन विहिरींकरितां मदत देण्याच्या योजनेनुसार १९५८–५९ सालीं ३५ विहिरींना रु. १४ हजार ८५० मदत देण्यांत आली व १९५९–६० सालीं १०३ विहिरींना रु. ५१ हजार ५४६ मदत देण्यांत आली. ही मदत विहिरीला आलेल्या एकूण खर्चाच्या २० टक्के अगर जास्तींत जास्त रु. ५०० यापैकीं जी रक्कम कमी होईल ती देण्यांत येते.

छोटे बंधारें

मध्यवर्ती सरकारच्या कर्जपुरवठा कार्यक्रमानुसार १९५२–५३ सालीं छोटया बंधाऱ्यांची योजना या जिल्ह्यांत आंखण्यांत आली. या योजनेनुसार लोकांच्या मदतीनें आतांपर्यंत ४२ छोटे बंधारे बांधण्यांत आले असून त्याला रु. ३८ लाख ३३ हजार ९९४ खर्च आला आहे. या बंधाऱ्याखालीं एकूण १२,४६७ एकर जमीन भिजणार आहे. या बंधाऱ्याकरितां एकूण खर्चाच्या २/३ कर्ज देण्यांत आले असून १/३ रक्कम लोकांनीं जमा करावयाची आहे.

लोखंड व पोलाद वांटप

जिल्हा विकास मंडळातर्फें जिल्ह्यांतील शेतकरी व बिगर शेतकरी गरजूं लोकांना पन्हाळी पत्रें, सळया, कणे, काळे प्लेन पत्रें व पांढरे प्लेन पत्रें वांटण्यांत येतात. वारणा खोरे खरेदी विक्री संघ व गणपती सहकारी संस्था या दोन संस्थांच्या मार्फत लोखंड व पोलाद वस्तूंचें वांटप जिल्ह्यांत करण्यांत येतें. गेल्या दोन वर्षांत २६६ टन पन्हाळी पत्रें, ५१ टन सळया, ४३ टन कणे, १७ टन काळे प्लेन पत्रें व ८ टन पांढरे प्लेन पत्रें या प्रमाणें जिल्ह्यांत लोखंड व पोलाद मालाचें वांटप करण्यांत आलें. सांगली आणि आजुबाजूच्या ९ गांवाकरितां जिल्हा विकास मंडळाच्या कचेरींतून परवाने देण्यांत येतात व बाकीच्या गांवांकरितां संबंधित तालुक्याचे मामलेदार अगर महालकरी परवानें देतात.

पंधरवडे, सप्ताह व दिन

पीक-स्पर्धा पंधरवडा, ग्रामसुधार सप्ताह, दारूबंदी सप्ताह, वनमहोत्सव सप्ताह, अस्पृश्यता निवारण सप्ताह, सहकार सप्ताह, हातमाग सप्ताह वगैरे पंधरवडे आणि सप्ताह आणि समाज शिक्षण दिन, जागतिक आरोग्य दिन, बालदिन वगैरे दिन सरकारच्या आदेशानुसार जिल्हा विकास मंडळातर्फें वेळोवेळीं साजरे केले जातात. प्रथमतः सविस्तर पत्रक काढून संबंधित विषयाची सविस्तर माहिती व साजरा करण्याबाबत स्थूल स्वरूपाच्या सूचना जिल्ह्यांतील सर्व सार्वजनिक संस्था व ग्रामपंचायती यांना देण्यांत येतात. जिल्हा विकास मंडळातर्फेंहि स्वतंत्र कार्यक्रम आंखून तो मंडळाचे सभासद, स्थानिक कर्मचारी आणि कार्यकर्ते यांच्या मदतीनें पार पाडण्यांत येतो.

या जिल्ह्यांत १९४९ सालापासून दर वर्षी वनमहोत्सव साजरा केला जातो. वनमहोत्सवांत भाग घेणाऱ्या जिल्ह्यांतील तालुक्यांना, गांवांना व निरनिराळया संस्थांना जास्तींत जास्त झाडें लावून ती जगविल्याबद्दल सरकारकडून बक्षिसें दिलीं जातात. वनमहोत्सव-पंधरवडा पावसाळ्यांत जिल्ह्यांत

वनमहोत्सव

सर्वत्र साजरा केला जातो. जत तालुक्यांतील बसरगी गांवास जास्तींत जास्त झाडें लावून ती जगविल्याबद्दल सन १९५५ सालीं भारत पातळीवरील जवाहर ढाल मिळाली आहे. गेल्या १२ वर्षांत या जिल्ह्यांत एकूण १२ लाख झाडें लावण्यांत आलीं. त्यापैकीं सुमारें ६ लाख झाडें जगलीं आहेत.

क्रीडा महोत्सव

राज्य क्रीडानिधी समितीतर्फे १९५४ सालापासून दर वर्षी क्रीडा महोत्सव साजरा केला जातो. या क्रीडा महोत्सवाच्या उद्देशाप्रमाणें सांगली जिल्ह्यांत तालुका व जिल्हा पातळीवर क्रीडा-स्पर्धा घेण्यांत येतात व त्यांतील उत्तम खेळाडूंची निवड करून दर वर्षी स्त्रिया आणि पुरुष मिळून सुमारें ६० खेळाडू राज्य पातळीवरील सामन्या-करितां पाठविण्यांत येतात. आतापर्यंत या जिल्ह्यानें कुस्ती, मल्लखांब व धांवणें हे वैयक्तिक खेळ व सांघिक खेळांपैकी हुतुतू या खेळामध्यें राज्य पातळीवरील सामन्यांत विशेष प्राविण्य दाखविले आहे.

जिल्हाधिकाऱ्यांचा राखीव निधी

प्रत्येक जिल्ह्यांत जिल्हाधिकाऱ्याकडे शेती सुधारणा, जनावरांची जोपासना, रस्ते दुरुस्ती, खेड्यांतील पाणीपुरवठा, कुटिरोद्योग, खेड्यांतील शिक्षण वगैरे किरकोळ बाबींना मदत देण्याच्या उद्देशानें कांहीं राखीव निधी ठेवलेला असतो. या निधींतून जिल्हाधिकारी योग्य आणि निकडीच्या गोष्टीकरितां मदत देतात. सांगली जिल्ह्यांत गेल्या तीन वर्षांत पुढील प्रमाणें या निधींतून मदत देण्यांत आली. सन १९५७–५८ : रु. २६४९, सन १९५८–५९ : रु. १९००, सन १९५९–६० : रु. १९०७.

समाज विकास गट

ग्रामीण भागांतील समाजाचें अज्ञान आणि दारिद्र्य नष्ट व्हावे यांसाठीं शेतीचें उत्पादन त्वरेनें वाढावे, दर एकरीं उत्पादनवाढ व्हावी, शिक्षणाचा प्रसार व्हावा, आरोग्य संवर्धन व संरक्षणाची सोय व्हावी, ग्रामीण कला व व्यवसायांत वाढ व्हावी, म्हणून सर्वांगीण विकासाचा कार्यक्रम संलग्न खेड्यांचा गट घेऊन त्यांत सुरूं करण्यांत येतो. या कार्यक्रमाला प्रत्येक कुटुंबाचा हातभार लावावा म्हणून विविध समाज विकास कामांत लोक वर्गणी, श्रमशक्ति व रोख रूपानें विविध प्रमाणांत घेतली जाते. ग्रामीण जीवनांत अमूलाग्र बदल घडवून आणणाऱ्या या कार्यक्रमाची योजना २ ऑक्टोबर १९५२ पासून देशांत सुरू झाली. या जिल्ह्यांत प्रथम २६ जानेवारी १९५४ रोजीं खानापूर तालुक्यांत राष्ट्रीय विस्तार योजना लागू करण्यांत आली. सुरवातीस या कार्यक्रमास, राष्ट्रीय विस्तार योजना व नंतर सामुदायिक विकास योजना असें संबोधण्यांत येऊं लागले. १ एप्रिल १९५८ नंतर या कार्यक्रमाच्या पुढील ३ अवस्था (स्टेज) करण्यांत आल्या. १ पूर्व प्राथमिक, २ पहिली अवस्था (स्टेज) व ३ दुसरी अवस्था (स्टेज). सध्या या जिल्ह्यांतील सर्व तालुके पुढील प्रमाणें कोणत्या ना कोणत्या तरी अवस्थेंत आहेत.

जिल्ह्यांतील संपूर्ण भाग विकास योजना क्षेत्रांत आला असून दोन गट द्वितीय अवस्थेमध्यें, एक गट प्रथम अवस्थेमध्यें असून राहिलेल्या दोनमध्यें पूर्व पाहणीचें काम चालू आहे. विकास योजना विभागांत आतांपर्यंत ग्रामीण भागांत झालेल्या कार्याची कल्पना पुढील माहितीवरून सहज येईल.

सांगली जिल्ह्यांतील १९५३–५४ पासून नोव्हेंबर १९६० पर्यंत पूर्ण झालेलीं स्थानिक विकासाचीं कामें

तालुका	पाणी पिण्याच्या विहिरी	तालमी तथा वाचनालयें	जोड रस्ते	नांवा	संडास आणि मुताऱ्या	तालमी	समाज मंदिरें	दवाखानें	धर्मशाळा	शाळा	चावडचा	बाजार कट्टे	वाच-नालयें	फरशा	तलाव दुरुस्ती	एकूण
मिरज	१२	५	५१	—	४	१२	४	२	४	९	१	—	१	—	—	१०५
जत	२३	१	७९	—	४	४	२	२	३	२७	—	—	—	—	—	१४५
वाळवा	१७	४	२२	२	३	१३	५	३	—	६	१	२	२	१	२	८२
शिराळा	१०	—	४०	१	४	३	२	२	—	४	१	—	—	—	—	६७
खानापूर	४	—	१०	—	—	४	—	२	—	५	—	—	—	—	—	२५
तासगांव	—	—	२१	—	१८	२	—	—	२	—	—	—	—	—	—	२४
एकूण	६६	१०	२०४	३	३३	३८	१३	११	९	५१	३	२	३	१	२	४४९

परिचय —6

क्रमांक	विकास गटाचें नांव	खेडीं / लोकसंख्या	क्षेत्र चौरस मैल	गट	अवस्था (स्टेज)	सुरूं झाल्याची तारीख
१	खानापूर	१३१ / १८३४४१	८४६.५	२½	१ राष्ट्रीय विस्तार योजना २ समाज विकास गट ३ द्वितीय अवस्था	२६– १–१९५४ १– ५–१९५६ १– ७–१९५९
२	तासगांव	७१ / १६३८७१	३३३.४	२½	१ राष्ट्रीय विस्तार योजना. २ समाज विकास गट. ३ द्वितीय अवस्था	२–१०–१९५४ २–१०–१९५७ १– ४–१९६०
३	मिरज	९४ / २९१०७०	६२४.२	३	प्रथम अवस्था	१– ४–१९५८
४	जत	९७ / १०८२७०	८७३.७	१½	१ पूर्व प्राथमिक. २ प्रथम अवस्था	१– ४–१९५९ २–१०–१९६०
५	शिराळा	८० / ७९४१६	२४६	१	पूर्व प्राथमिक	२–१०–१९५९
६	वाळवा	५६ / १७४०७३	३००.४	२½	पूर्व प्राथमिक	१–१०–१९६०

सांगली जिल्ह्यांतील विकास गटासंबंधीची माहिती

	खानापूर	तासगांव	मिरज
१. कंपोस्ट खताचे खड्डे	६,३१४	७,३८४	४,५४३
२. शेतीची प्रात्यक्षिक केंद्रें	३२	२९	३५
३. रासायनिक खताचे वांटप (टनांत)	३,७९४	१९,६०४	२१,७४९
४. सुधारलेलीं बी बियाणीं वांटप (टनांत)	१,८१८	३,१७२	७,३१०
५. जातीवंत वळूंचे वांटप	१७	१७	१०
६. जातीवंत कोंबड्यांचें वांटप	३७९	---	२४८
७. शेतीस पाणीपुरवठा			
(अ) नवीन विहिरी खोदल्या	४४८	१,०५५	४४८
(ब) जुन्या विहिरी दुरुस्त केल्या	१८३	---	४३१
८. शेणावर चालणारे गॅस प्लँट.	---	---	---
९. खेडेगांवांना पाणीपुरवठा			
(अ) नवीन विहिरी खोदल्या	११७	२५	८
(ब) जुन्या विहिरी दुरुस्त केल्या	---	---	---
(क) नळानें पाणीपुरवठा	१	१	१
१०. गोपुरी संडास	९	---	---
११. शिक्षण			
(अ) शाळेच्या इमारती	९८	१८२	७४
(ब) प्रौढ साक्षर केले	५,८२	५,५९२	१,२४४
(क) शेतकरी मंडळें.	१२८	७४	९१
(१) जत ९७			
(१) शिराळा ७४			
(४) वाळवा ६२			
१२. महिला मंडळें	३६	४०	१७
१३. तरुण मंडळें	३७	६८	४०
१४. भजनी मंडळें	५३	५१	३८
१५. रस्ते जोड रस्ते (मैलांत)	२१.१३	३७.५३	-----
१६. ग्रामीण उद्योग	१. वाककाम शिक्षण शाळा. २. शिवणकाम शाळा आटपाडी ३. शिवण वर्ग, विटे ४. लोंकर विणकाम, शाळा, झरें. ५. कुक्कुट संवर्धन ६. सुतार, लोहार शिक्षण.	१. शिवणवर्ग. २. सुतार लोहार शिक्षण. ३. दोरखंड शिक्षण	१. शिवणवर्ग. २. सुतार लोहार शिक्षण. ३. लोंकर विणकर केंद्र.

सर्वोदय

सांगली जिल्ह्यांत शिराळा व ढालगांव येथें सर्वोदय केंद्रें सुरू करण्यांत आलीं आहेत. शिराळा केंद्रासाठीं डोंगराळ भागांतील ४६ गांवें येत असून ढालगांव केंद्राच्या कक्षेंत २१ गांवें येतात. हीं केंद्रें मागासलेल्या भागांत सुरू केलीं असून सर्वोदय कार्यकर्त्यांच्या चिकाटीमुळें शिक्षण, शेती, ग्रामोद्योग, आरोग्य, पाणी पुरवठा, दळणवळण व संस्कृति संवर्धन या क्षेत्रांत भरीव कामगिरी झाली आहे.

शिराळा सर्वोदय केंद्र

शिराळा सर्वोदय केंद्र दिनांक २ ऑक्टोबर १९५१ रोजीं सुरू करण्यांत आलें. या योजनेखालीं शिराळा महालांतील पश्चिम भागांतील ४६ गांवें समाविष्ट करण्यांत आलीं आहेत. या केंद्राची मुख्य कचेरी शिराळा येथें असून बिळाशी, आरळे व गांधी सेवाग्राम (गुढे) येथें उपकेंद्रें आहेत. या केंद्रांकरितां निवडलेला भाग हा अत्यंत मागासलेला असून बहुसंख्य लोक अशिक्षित आहेत.

शिक्षण

ग्रामीण जनतेला शिक्षित करण्याच्या उद्देशानें जेथें जिल्हा स्कूल बोर्ड आणि शिक्षण प्रसारक मंडळ, शाळा चालवीत नाहीं तेथें केंद्रानें चार सूत कताई बेसिक शाळा म्हणून चालविल्या आहेत. केंद्रानें गांधीग्राम (गुढे) येथें एक आश्रम शाळा चालविली आहे. हरिजन विद्यार्थ्यांना उत्तेजन देण्याचेंहि काम केंद्रातर्फे होत असून गांधी सेवाग्राम, विनोबा ग्राम व कोकरुड येथें बालवाड्या चालविण्यांत येत आहेत. शिराळा येथें एक वाचनालय चालविण्यांत येत असून चार फिरती वाचनालयें चालविण्यांत येत आहेत. दोन प्रौढ वर्ग व एक कोरडें वसतिगृह चालविण्यांत येत आहे.

शेती

केंद्रातर्फे १२ हॉ. पॉ. चें एक व पांच हॉ. पॉ. चें एक अशी दोन इंजिनें खरेदी करून शेतकऱ्यांना भाड्यानें देण्याची सोय करण्यांत आली आहे. पडिक जमीन लागवडीस आणण्याकरितां कर्ज, जपानी भातशेतीचीं प्रात्यक्षिकें, चरण यात्रेंत शेतकी प्रदर्शन भरवून शेतकऱ्यांना उत्तेजनार्थ बक्षिसें देणें, बंधारें बांधणें, कंपोस्ट खड्डे तयार करणें, सायलेज खड्ड्याचें प्रात्यक्षिक वगैरे गोष्टी केंद्रानें केल्या आहेत. मागासलेल्या वर्गांतील शेतकऱ्यांना केंद्रानें बी-बियाणें, सुधारलेलीं अवजारें व कीटक नाशकें घेण्याकरितां मदत दिली आहे. गरीब शेतकऱ्यांकरितां १२ लोखंडी नांगर खरेदी करण्यांत आले आहेत.

ग्रामोद्योग

केंद्रामार्फत घोंगडी व रग तयार करणें, हातकागद, साबण व दोरकाम तयार करणें, मधमाशा पालन व खादी उत्पादन हे ग्रामोद्योग चालविले जातात. शेत-

कऱ्यांना पूरक अशा ग्रामोद्योगांबाबत मार्गदर्शन करण्यांत येतें. तसेंच केंद्रामार्फत हातसडीचा धंदा व तेलघाणीचा धंदाहि चालविला जातो.

आरोग्य

केंद्रातर्फे ७ ठिकाणीं उपचार केंद्रें सुरू करण्यांत आली असून या ठिकाणीं नाममात्र पैसे घेऊन औषधें पुरविलीं जातात. महारोग्यांना औषधें पुरविण्याचीहि सोय केंद्रामार्फत करण्यांत आलेली आहे. कोकरुड येथें केंद्रातर्फे एक सूतिकागृह चालविण्यांत येत असून याचा १५ ते २० स्त्रिया दर वर्षी फायदा घेतात. गेल्या तीन वर्षांपासून ग्रामसफाई शिबिर दरसाल घेण्यांत येतें.

दळणवळण

बहुतेक खेडयांतून गेल्या ९ वर्षांत २५ मैल लांबीचे बैलगाडीचे रस्ते ग्रामस्थांच्या मदतीनें तयार करण्यांत आले आहेत. तसेंच वारणा खोरें रस्ता २० मैल लांबीचा दुरुस्त करण्यांत आला आहे.

संस्कृति संवर्धन

सामाजिक कार्याची आवड असलेले एक स्वामी, संस्कृति संवर्धनाचे कार्य खेडयांतून हिंडून १९५८ पर्यंत करीत असत. आतां हें कार्य सर्वोदय कार्यकर्तेच करतात. स्त्रियांमध्येंहि काम करण्याकरितां एका स्त्री-कार्यकर्तीची नियुक्ति करण्यांत आली आहे. गांधी सेवाग्राम (गुढे) येथें एक रेडिओहि बसविण्यांत आला आहे.

घरें

गोपाळ कोकणे या नांवानें ओळखल्या जाणाऱ्या आदिवासी लोकांची सहकारी घरबांधणी संस्था स्थापन करण्यांत आली असून कायम वसाहतीकरितां ५० घरें बांधण्याचें ठरविलें आहे. त्यांना सरकारनें प्रत्येक घरास रु. १५००० या प्रमाणें २४ घरांकरितां रु. ३६००० मंजूर केले आहेत. त्यांतील २० घरें पुरी झालीं असून चार घरांचें बांधकाम चालू आहे. एक जंगल कामगार सहकारी संस्थाहि केंद्राच्या प्रेरणेनें चालू आहे.

सर्वोदय क्षेत्रांत पदयात्रा करून कार्यकर्त्यांनीं आतापर्यंत २३ गांवें ग्रामदानी केलीं आहेत. या सर्व गांवांतून ग्रामदानी सहकारी संस्था स्थापन करण्यांत आल्या आहेत. एकूण ८०० एकर जमीन आजपर्यंत भूदानास या भागांत मिळालेली आहे.

ढालगांव सर्वोदय केंद्र

मिरज तालुक्यांतील ढालगांव येथें सर्वोदय केंद्राची स्थापना दि. ११ मे १९५८ रोजीं करण्यांत आली. या केंद्राच्या कक्षेंत एकंदर २० हजार लोकवस्तीचीं २१ गांवें येतात. येथील लोकांत मुख्यतः धनगर, सणगर, व्हलार अशांचाच भरणा आहे. या केंद्रातर्फे आतापर्यंत रु. १,०२,००० खर्च झाला आहे. टोकण पद्धतीची अभिनव शेती १ हजार एकरांत सुरू करण्यांत आली आहे. शेतकऱ्यांना शक्य तों सर्व औषधें, खतें व नाना प्रकारें मदत देऊन शेती उर्जितावस्थेंत आणण्याचा प्रयत्न चालू आहे. पोल्ट्री व मेंढपाळीचा धंदा करणाऱ्यांना कर्ज व मदत देण्यांत आली आहे. लोंकर कताईसाठीं व मागासलेल्या लोकांना धंद्यासाठीं बिनव्याजी कर्जें देण्यांत आलीं आहेत. बहुतेक सर्व गावांत ग्रामपंचायती व सहकारी सोसायटया स्थापन करण्यांत आल्या आहेत; त्याचप्रमाणें गृहरक्षकदल (होमगार्ड सब-युनिट), महिला मंडळें व भजनीं मंडळें स्थापन करून सामाजिक उन्नत्तीचें कार्य चालू केलें आहे. या केंद्रानें

दारूबंदीच्या बाबतींत भरीव कार्य करून दाखविलें आहे. पाणीपुरवठा करण्यासाठीं कांहीं ठिकाणीं जुन्या विहिरी दुरुस्त करून दिल्या आहेत तर कांहीं ठिकाणीं बोरिंग करण्याचें काम सुरू आहे. गांवांतील जुन्या इमारती दुरुस्त करून त्यांचा शाळा व ग्रामपंचायतीसारख्या गोष्टींकरितां उपयोग करण्यांत येत आहे. सुमारें ८ मैल लांबीचे जोडरस्ते तयार करण्यांत आले असून निरनिराळ्या गांवांतील मागासलेल्या जातींतील दहा लोकांना घरें बांधण्यासाठीं मदत दिली आहे. एक बालवाडी, दोन विद्यार्थी वसतिगृहें व दहा प्रौढ शिक्षण वर्ग चालविले आहेत. ढालगांव येथें विनामूल्य प्रथमोपचार केंद्र चालू केलें असून आतांपर्यंत २५०० लोकांनीं त्याचा फायदा घेतला आहे. सफाई शिबिरें, स्वातंत्र्य दिन, प्रजासत्ताक दिन, सूत कताई वर्ग, महिला मंडळातर्फे हळदीकुंकू समारंभ, मुलामुलींचे खेळांचे व पोहण्याचे सामनें वगैरे कार्यक्रम होत असतात.

स्थानिक स्वराज्य संस्था

देशाची उभारणी भक्कम पायावर करावयाची असेल तर प्रत्येक खेड्यांत ग्रामपंचायत, शाळा व सहकारी संस्था असलीच पाहिजे, अशा आशयाचें मत आपल्या पंतप्रधानांनीं व्यक्त केलें आहे.

ग्रामपंचायती

लोकशाहीच्या काळांत सत्तेचें विकेंद्रीकरण करून स्थानिक स्वराज्य संस्थांना जादा अधिकार देण्यांत यावेत या धोरणानुसार जिल्ह्यांतील सर्व खेड्यांतून ग्रामपंचायती स्थापन करण्याचा निर्णय घेण्यांत आला. अगदी लहान गांवें असतील तेथें कांहीं गांवांचा गट करून गट-ग्रामपंचायती स्थापन करण्यांत आल्या आहेत.

ग्रामपंचायतीच्या कारभारावर नियंत्रण करण्यासाठीं सांगली जिल्हा ग्रामपंचायत मंडळाची स्थापना दि. २ ऑक्टोबर १९५९ रोजीं करण्यांत आली. या मंडळाचे अध्यक्ष जिल्हाधिकारी असून उपाध्यक्ष लोकनियुक्त असतात. पंचायत मंडळाच्या उपसमित्यांचे अध्यक्ष म्हणून उपाध्यक्ष काम पाहातात. जिल्हा पंचायत अधिकारी हे या मंडळाचे सभासद असून शिवाय चिटणीस म्हणून काम पाहातात. जिल्हा ग्रामपंचायत मंडळाच्या सभा दर तिमाहीस होतात.

या जिल्हा ग्रामपंचायत मंडळानें चालू वर्षी वनमहोत्सवांत सक्रिय भाग घेऊन पंचायत द्वारा पंचायत कुंज निर्मिण्याचा प्रयत्न केला. त्यानुसार जिल्ह्यांत सुमारें ५० पंचायत कुंज तयार झाले आहेत. त्याचप्रमाणें ग्राम विभागांत संडासा अभावी विशेषतः स्त्रियांची अतिशय कुचंबणा होते. हे जाणून सर्व पंचायतींना स्त्रियांच्यासाठीं संडास बांधण्या संबंधी मार्गदर्शन केले आहे व त्यास पंचायतीकडून सार्वत्रिक पाठिंबा मिळत आहे. याशिवाय फिरत्या वाचनालयाची खास अभिनव योजना पंचायत मंडळानें पुरस्कृत केली आहे व ती खानापूर व तासगांव तालुक्यांत पूर्णावस्थेंत आली आहे. इतर तालुक्यांतहि या योजनेचा प्रसार करून सर्व जिल्हाभर ही ज्ञानगंगा पंचायत द्वारा पोहोचविली जाणार आहे.

जिल्हा ग्रामपंचायत मंडळ व ग्रामपंचायत अधिकारी यांची कचेरी सांगली येथें जिल्हाधिकाऱ्यांच्या कचेरींत उघडण्यांत आली आहे. या जिल्ह्यांत पुढील प्रमाणें तालुकावार ग्रामपंचायती आहेत.

तालुका	लोकसंख्या (शहरें सोडून)	खेडीं	ग्रामपंचायती स्वतंत्र	ग्रामपंचायती गट	ग्रामपंचायती एकूण
मिरज	१,९५,१०५	९२	६५	१२	७७
जत	१,०८,२७०	९७	४७	२१	६८

तालुका	लोकसंख्या (शहरे सोडून)	खेडीं	ग्रामपंचायती स्वतंत्र	गट	एकूण
तासगांव	१,५६,४१०	७१	६७	२	६९
खानापूर	१,७४,१४९	१२९	९३	१७	११
वाळवा	१,४५,५८६	५६	५७	१	५८
शिराळा	७९,४१६	८१	४२	१५	५७
	८,५८,९३६	५२६	३७१	६८	४३९

ग्रामीण भागांतील जनतेच्या सर्वांगिण विकासाची जबाबदारी मुख्यत्वेंकरून ग्रामपंचायतींच्यावर असून पाणीपुरवठा, रस्तें, आरोग्य आणि विकासाच्या कामाची पूर्तता करण्याची जबाबदारीहि त्यांच्यावरच आहे.

नगरपालिका

सांगली जिल्ह्यांत ६ नगरपालिका असून त्यांच्या क्षेत्रातील लोकसंख्या १,४५,०१० आहे. सर्व नगरपालिकांच्या हद्दींतील प्राथमिक शिक्षण जिल्हा शिक्षण मंडळातर्फे चालते. नागरी विभागांतील लोकांना पिण्याच्या पाण्याची सोय करण्याची व त्यांच्या आरोग्य संरक्षणाची जबाबदारी नगरपालिकांची आहे. जिल्ह्यांतील नगरपालिका पुढीलप्रमाणें आहेत.

नगरपालिका	लोकसंख्या	सभासद	उत्पन्न (५९–६०)
सांगली	५४,१६८	२९	२०,२२,८९७
मिरज	४०,२२४	२२	५,१६,५३०
तासगांव	१२,९१५	१४	१,५७,५९१
इस्लामपूर	१६,११३	१५	१,७५,२९९
आष्टा	१२,३७४	१५	५३,६१९
विटा	९,२९६	१५	१,११,९४५

जिल्हा लोकल बोर्ड

सांगली जिल्हा नव्यानें बनविण्यांत आल्यानंतर सुरवातीला सुमारें वर्षभर सरकारनें नेमलेल्या एका तात्पुरत्या समितीनें जिल्हा लोकल बोर्डाचा कारभार केला. मे १९५२ मध्यें निवडणक होऊन ४२ सभासदांचे पहिले लोकनियुक्त मंडळ काम पाहूं लागले आहे. दुसरी निवडणूक जून १९५७ सालीं झाली. गेल्या अकरा वर्षांत ग्रामीण जनतेच्या हिताच्या अनेक गोष्टी लोकल बोर्डानें केल्या आहेत.

जिल्हा लोकल बोर्डानें सध्या एकूण २६ दवाखाने चालविले असून त्यांतील एक शिराळा येथें ॲलोपॅथिक पद्धतीचा दवाखाना असून बाकीचे २५ आयुर्वेदिक आहेत. या सर्व दवाखान्यांतून रुग्णोपयोगी साहित्य ठेवण्यांत आलें असून तें ग्रामीण भागांतील जनतेला पुरविण्याची सोय बोर्डानें केलीं आहे. शिराळा, म्हैसाळ, कासेगांव, माहुली व डिग्रज येथील दवाखान्यांतून प्रत्येकीं एक दाई

ठेवली असून ती घरोघरीं जाऊन गरोदर स्त्रियांना व मुलांच्या संगोपनाबाबत वेळोवेळीं सल्ला देण्याचे काम करते. ग्रामीण भागांतील सर्व मुलांना देवी प्रतिबंधक लस टोचण्याची सोय सरकारच्या मदतीनें बोर्डानें केली आहे. सांथीच्या वेळीं बोर्डानें रोगप्रतिबंधक उपाययोजना तांतडीनें केली आहे.

बोर्डाचे जनावरांचे दवाखानें मिरज, विटा, तासगांव इस्लामपूर व शिराळा अशा पांच ठिकाणीं आहेत. मागासलेल्या वर्गांतील मुलांच्या शिक्षणास साहाय्य करण्याच्या हेतूनें बोर्डानें कवठे-महांकाळ येथें एक वसतिगृह १९५४–५५ सालीं सुरू केले असून त्याचा आज ४० विद्यार्थी फायदा घेत आहेत.

खेड्यांतील जनतेच्या पिण्याच्या पाण्याची अडचण दूर करण्याची राज्य सरकारनें हातीं घेतलेली योजना जिल्हा विकास मंडळाच्या सल्ल्यानुसार बोर्डानें कार्यान्वित केली. या योजनेखालीं एकूण ८२० विहिरींच्या कामाचा समावेश करण्यांत आला होता. बोर्डानें ग्रामस्थांच्या सहकार्यानें आतांपर्यंत ४३३ नवीन विहिरी खोदल्या, ४६ जुन्या विहिरींची दुरुस्ती केली आणि २६ पायऱ्यांच्या विहिरींचे रहाटांच्या विहिरींत रूपांतर केले. या कामीं सुमारें २०,५९,९१६ रुपये खर्च करण्यांत आले. योजनेप्रमाणें खर्चाचा एक चतुर्थांश वांटा ग्रामीण जनतेनें श्रमदानानें उचलला आहे. बोर्डाच्या ताब्यांत ८८२ मैल लांबीचे रस्ते असून ते चांगल्या स्थितींत ठेवण्याचा बोर्ड आपल्याकडून प्रयत्न करीत आहे. १९५४–५५ पासून १९६० पर्यंत बोर्डानें एकूण १५ पाटबंधाऱ्यांचीं कामेंहि पूर्ण केलीं आहेत.

शाळागृहांची अडचण लक्षांत घेऊन बोर्डानें ग्रामस्थांच्या सहकार्यानें एकूण २१२ गांवांतील ५९० खोल्यांचें काम पूर्ण केलें आहे आणि बऱ्यांच गांवांतून शाळागृहांचीं कामें चालू आहेत. जिल्हा विकास मंडळानें हातीं घेतलेल्या स्थानिक विकास कामांची जबाबदारी घेऊन ग्रामस्थांच्या मदतीनें शाळागृहें, लहान रस्ते, तालमी, दवाखानें वगैरे गोष्टी बोर्डानें पुऱ्या केल्या आहेत. ज्या मागासलेल्या भागांतील गांवांना लोक-वर्गणी जमविणें अगदीच अशक्य होते अशा गांवांना बोर्डानें आर्थिक साहाय्यहि केले आहे.

ग्रामीण विभागांतील जनतेला राज्यांतील व राष्ट्रांतील प्रगतीपर कार्याची चलत् चित्रपटां-द्वारें माहिती देऊन त्यांची सुप्त शक्ति जागृत करण्याचें काम प्रसिद्धि विभागातर्फे करण्यांत येतें. त्याच-

प्रसिद्धि

प्रमाणें चालू घडामोडींची व विविध खात्याविषयीची माहिती व कार्याची प्रगति हस्तपत्रिका, पुस्तिका, भिंतीचित्रें आदींच्या साहाय्यानें जिल्ह्यांत सर्वत्र पोहोचविण्याचें काम या खात्यामार्फत करण्यांत येतें. प्रत्येक जिल्ह्या-मध्यें प्रसिद्धि विभागाची एक गाडी असून त्यांत चित्रपट प्रदर्शनाचें सर्व साहित्य असते. जिल्ह्यांतील जास्तींत जास्त ठिकाणीं जाऊन चित्रपटद्वारें ग्रामीण जनतेची करमणूक व लोकशिक्षण देण्याचा प्रयत्न केला जातो. या खात्याची कचेरी सांगली येथें आहे.

महाराष्ट्रांतील इतर जिल्ह्याप्रमाणें सांगली जिल्ह्यांतहि सांगली यथें मध्यवस्तींत प्रसिद्धि

माहिती केंद्र

खात्यातर्फे एक माहिती केंद्र उघडण्यांत आले आहे. या केंद्रामध्यें राज्य सरकारच्या व भारत सरकारच्या प्रकाशना व्यतिरिक्त इतरहि प्रमुख दैनिकें, मासिकें व साप्ताहिकें मोफत वाचनासाठीं ठेवण्यांत येतात.

जिल्ह्यांतील वृत्तपत्रांचे संपादक व वृत्तपत्रप्रतिनिधी यांना जिल्ह्यांतील निरनिराळ्या विकास कार्याची कल्पना यावी म्हणून प्रसिद्धि खात्यातर्फे त्यांना ती दाखविण्यांत येतात.

ग्रामीण विभागासाठीं रेडिओ

या जिल्ह्यांत बहुसंख्य ग्रामीण जनता दूरवर विखुरलेल्या खेड्यांतून राहात असल्यामुळें त्यांचा बाहेरच्या जगाशीं व दैनंदिन घडामोडीशीं संबंध जोडण्याचें कार्य प्रसिद्धि खात्याच्या ग्रामीण रेडिओ विभागातर्फे केले जात असून आतांपर्यंत १२२ रेडिओ सेटस् जिल्ह्यांत निरनिराळ्या ठिकाणीं बसविण्यांत आले आहेत. आकाशवाणीच्या निरनिराळ्या केंद्रावरून खेडुतांकरितां त्यांच्या प्रश्नांसंबंधी प्रादेशिक भाषेंत खास कार्यक्रम केलें जात असल्यामुळें अशा रेडिओ सेटस्ची मागणी दिवसेंदिवस वाढत आहे.

महाराष्ट्र सरकारच्या प्रसिद्धि खात्याच्या ग्रामीण रेडिओ विभागातर्फें सामुदायिक श्रवणासाठीं ग्रामपंचायती, सहकारी संस्था यासारख्या जबाबदार संस्थांना रेडिओ सेटस् मिळू शकतात. सुरवातीला रेडिओ बसविण्याची वर्गणी १७५ रु. व वार्षिक दुरुस्ती व बॅटरीचा खर्च रु. ६० भरावा लागतो. त्यानंतर प्रतिवर्षी फक्त रु. ६० भरावे लागतात. या जिल्ह्यांतील ग्रामीण रेडिओ विभागाचे रेडिओ सेटस् बसविणें, त्यांची दुरुस्ती करणें व बॅटरी पुरविणें या कामांकरितां टेक्निशियनची नेमणूक करण्यांत आली असून त्यांची कचेरी सांगली येथेंच आहे.

नभोवाणी मंडळें

अखिल भारतीय आकाशवाणीच्या प्रादेशिक केंद्रावरून ग्रामीण विभागांतील जनतेकरितां खास कार्यक्रम मराठींतून प्रस्तुत करण्यांत येतात. ग्रामीण भागांतील शेतकऱ्यांमध्यें या कार्यक्रमानें इतकी आपुलकी निर्माण केलेली आहे कीं, त्यांनीं आपल्या गांवांतून नभोवाणी मंडळें स्थापन केली आहेत. या मंडळाचे सभासद कार्यक्रम ऐकल्यानंतर आपलीं मतें संबंधित आकाशवाणी केंद्र अधिकाऱ्यांकडे कळवितात. त्यांच्या मतांचा योग्य तो विचार केला जातो व पुढील कार्यक्रमांतून त्यांच्या प्रश्नांचीं उत्तरें दिली जातात. या जिल्ह्यांत नोव्हेंबर १९६० पर्यंत पुढील प्रमाणें तालुकावार रेडिओ सेटस् बसविण्यांत आले आहेत.

मिरज ४०, खानापूर १८, तासगांव १९, जत ११, वाळवा २१ व शिराळा ११.

सांगली जिल्ह्यांत महाराष्ट्र राज्य विधान सभेचे मतदार संघ, त्यांतील खेडीं व मतदार पुढील प्रमाणें आहेत.

मतदार संघ.	खेडी	मतदार.
१. जत	११६	७४,५१५
२. मिरज	३८	६८,१७७
३. सांगली	३८	७५,३७५
४. तासगांव	४७	६९,२७५
५. विटा (द्वि सभासद)	१५६	१,३८,४३७
६. वाळवा	३५	७१,१६८
७. शिराळा	१०४	७१,०११
	५३४	५,६७,९५८

मतदार संघ

विधान सभेचे जत, मिरज, सांगली, विटा व तासगांव असें पांच मतदार संघ मिळून लोकसभेचा एक मतदार संघ असें नांव देण्यांत आले आहे. त्यांत ३९५ खेड्यांचा समावेश करण्यांत आलेला आहे. आणि ४,२५,७१९ मतदार आहेत. लोकसभेकरितां असलेल्या शिराळा व वाळवा राज्य विधान सभा मतदार संघाचा कराड लोकसभा मतदार संघामध्यें समावेश करण्यांत आला आहे.

महाराष्ट्र विधान परिषदेचा जिल्ह्यांतील मतदारवर्ग पुढील मतदार संघामध्यें समाविष्ट करण्यांत आला आहे.

	जिल्ह्यांतील मतदार
१ विशाल मुंबई तथा महाराष्ट्र शिक्षक मतदार संघ	३१७
२ महाराष्ट्र पदवीधर मतदार संघ	७३३
३ दक्षिण महाराष्ट्र स्थानिक मतदार संघ	१५३

करमणूक गृहें

या जिल्ह्यांत स्थानिक स्वरूपाचीं सिनेमा थिएटर्स १७ असून १ लोकनाट्य गृह, ३ नाट्यगृहें आणि ८ फिरतें सिनेमा आहेत. तसेंच सांगलीला ६, मिरजला ५, तासगांवला १, विटा १, इस्लामपूरला २, वाळवाला १ व जतला १ अशीं १७ सिनमागृहें आहेत. सांगलींत १ लोकनाट्यगृह असून दोन नाट्यगृहें आहेत आणि मिरज येथें एक नाट्यगृह आहे.

टॅटिस्टिकल कचेरी

जिल्ह्यांतील विविध खात्यांनीं केलेल्या कार्याची आंकडेवार माहिती संकलन करण्याचें कार्य जिल्हा स्टॅटिस्टिकल अधिकाऱ्यांच्याकडे सोपविण्यांत आलें असून त्यांची कचेरी अलिकडेच सांगली येथें सुरू करण्यांत आली आहे.

दारुबंदी कचेरी

सांगली येथें जिल्हा दारुबंदी अधिकाऱ्यांची कचेरी असून सांस्कृतिक व करमणुकीचे कार्यक्रम ग्रामीण भागांत करून मत परिवर्तनाचें कार्य या कचेरीमार्फत केलें जातें. तसेंच नशायुक्त पदार्थावर नियंत्रण ठेवण्याचेंहि कार्य या कचेरीमार्फत करण्यांत येतें.

अल्प बचत योजनेमार्फत सांगली जिल्ह्यांत गेल्या तीन वर्षांत पुढीलप्रमाणें पैसे गुंतविण्यांत आले.

	वर्ष	इष्टांक	नगद जमा	शेंकडा प्रमाण
अल्पबचत मोहीम	१९५७–५८	२८ लाख	१०,१४,०००	३६
	१९५८–५९	२६ लाख	२२,९८,५४८	८८
	१९५९–६०	२५ लाख	५४,५४,३१०	२१८

सन १९५९–६० सालीं इष्टांकाच्या २१८.१६ शेंकडा नगद रक्कम अल्प बचत योजनेंत गुंतवून या जिल्ह्यानें मुंबई राज्यांत ४ था क्रमांक मिळविला आहे व जिल्ह्यांतील सार्वजनिक कामासाठीं २ लाख रुपयांचें अनदान मिळविलें.

या जिल्ह्यांतील अल्पबचत योजनेबाबतचीं वैशिष्टचें पुढील प्रमाणें आहेत.

(१) गेल्या वर्षी वाळवा तालुक्यांतील अष्टे गांवानें सव्वा लाख रुपये अल्प बचत योजनेंत गुंतवून वाळवा तालुक्याचा इष्टांक एका गांवानेंच पुरा करण्याचा विशेष विक्रम करून दाखविला व आपले 'सव्वा लाखी अष्टे' हें नांव सार्थ असल्याचें सिद्ध करून दाखविलें.

(२) गेल्या वर्षी जत येथील रामराव हायस्कूलमधील सर्व शिक्षक व विद्यार्थी यांनीं बचत योजनेंत भाग घेऊन 'बचत हायस्कूल' करून दाखविलें.

(३) सर्व सरकारी व निमसरकारी कार्यालयांतून बचतगट स्थापन करण्यांत आले आहेत.

(४) गेल्यावर्षी सर्व तालुक्यांमध्यें जत तालुक्यानें इष्टांकाच्या ४६४.३ शेंकडा रक्कम गुंतवून जिल्ह्यांत पहिला क्रमांक मिळविला.

(५) मिरज येथील खाद्यपेय विक्रता संघाचे सुमारें ८० सभासद नियमितपणें दररोज अल्पबचत करतात.

(६) किर्लोस्करवाडी कारखान्यांतील सुमारें १८० कामगारांनीं बचतगट स्थापन केला असून ते दरमहा सुमारें १२७५ रु. बचत करतात.

(७) गेले दोन वर्षें जिल्ह्यांतील प्राथमिक शिक्षकांनीं एक लाखाहून अधिक रक्कम योजनेंत गुंतविली आहे.

(८) गेल्यावर्षी या जिल्ह्यांत एकूण ४९ बचत ग्रामें झालीं. त्यांतील २६ गांवें जत तालुक्यांत येतात.

अभिनव योजना

या जिल्ह्यांत खानापूर तालुक्यांतील खरसुंडी, करगणी, आटपाडी व जत या ठिकाणीं दरवर्षी फार मोठ्या प्रमाणांत जत्रेच्या वेळीं जनावरांचा बाजार भरतो. यावेळीं जनावरें विकणारांनीं व विकत घेणारांनीं अल्प बचत योजनेंत पैसे गुंतवावेत असा प्रयत्न गेल्या वर्षी करण्यांत आला व त्याला यश येऊन शेतकऱ्यांनीं लाखो रुपये अल्प बचत योजनेंत गुंतविले.

जिल्ह्यांतील माजी व आजी सैनिकांचें कल्याण साधण्यासाठीं व त्यांच्या मुलाबाळांचें शिक्षण, आरोग्य आणि कुटुंबियांच्या हितसंबंधाकडे लक्ष ठेवण्यासाठीं सांगली येथें जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखालीं एक जिल्हा सैनिक मंडळ कार्य करीत आहे.

जिल्हा सैनिक मंडळ

माजी सैनिकांच्या मुलांचीं शिक्षणाची सोय व्हावी या दृष्टीनें त्यांना राहण्यासाठीं व अभ्यासासाठीं रु. ४०,८६३ खर्चून जिल्ह्याच्या ठिकाणीं सांगली येथें एक वसतिगृह बांधण्यांत आलें आहे. त्यांत ४० विद्यार्थ्यांची सोय झाली आहे. त्याचप्रमाणें माजी सैनिकांच्या विश्रांतीसाठीं रु. २२,९६३ खर्चून एक विश्रामगृह बांधण्यांत आलें आहे.

माजी सैनिकांचें आरोग्य सुरक्षित राहावे यासाठींहि हें मंडळ झटत असतें. आरोग्याच्या दृष्टीनें सांगली येथील सरकारी दवाखान्यांत माजी सैनिकांच्या गृहिणीकरितां प्रसूति व प्रसूतिपूर्व औषधोपचारासाठीं एक प्रसूतिगृह बांधण्यांत आलें आहे व पुरुषांच्या औषधोपचाराकरितां ५ खाटांचा वॉर्डहि सांगली सरकारी दवाखान्यांत ठेवलेला आहे. प्रसूतिगृह व पुरुषांच्या वॉर्डसाठीं एकूण रु. २०,७४२ खर्च आला.

त्याचप्रमाणें वानलेसवाडी येथें टी. बी. हॉस्पिटलमध्यें या मंडळातर्फे १५ क्षय रोग्यांच्या औषधोपचाराची व्यवस्था करण्यांत आली आहे. त्याकरितां प्रत्येकी दरमहा रु. १२५ मदत देण्यांत येते.

द्वितीय पंचवार्षिक योजनेंत प्रत्येक जिल्ह्याकरितां एक स्वतंत्र उद्योग विनिमय केंद्र असावें असें निश्चित झालें आहे. सांगली जिल्ह्याकरितां एक स्वतंत्र उद्योग विनिमय केंद्र जानेवारी १९६१ पासून सांगली येथें मार्केट यार्डांत सुरू करण्यांत आलें आहे. जिल्ह्यांतील नोकरीच्या शोधांत असणाऱ्या उमेदवारांना या ठिकाणीं नांवें नोंदवितां येतील. त्याप्रमाणें जिल्ह्यांतील उद्योगधंदे करणारांना आपल्या निरनिराळ्या खात्यांतील रिकाम्या झालेल्या जागा भरण्याकरितां लायक उमेदवारांचीं नांवें या केंद्रांकडून कळविण्यांत येतील.

उद्योग विनिमय केंद्र सांगली

लोकसभेनें १९५९ मध्यें पास केलेला एम्प्लॉयमेंट एक्सचेंजेस् संबंधीचा कायदा (एम्प्लॉयमेंट एक्सचेंजेस कंपलसरी नोटिफिकेशन ऑफ व्हेकन्सीज अॅक्ट) महाराष्ट्र सरकारनें १ सप्टेंबर १९६० पासून संपूर्ण महाराष्ट्रांत लागू केला आहे. या कायद्याप्रमाणें निमसरकारी आणि खाजगी उद्योगधंदे करणारांना आपल्या खात्यांतील रिकाम्या झालेल्या जागा उद्योग विनिमय केंद्रांना कळवाव्या लागतात. सरकारी खात्यांतील रिकाम्या झालेल्या जागा उद्योग विनिमय केंद्रामार्फतच भरल्या जातात.

वर नमूद केलेल्या गोष्टीखेरीज उद्योग विनिमय केंद्राकडे द्वितीय पंचवार्षिक योजनेनुसार आणखी दोन कामें सोंपविलीं आहेत. १. एम्प्लॉयमेंट मार्केट इनफरमेशन स्कीम व २. यूथ एम्प्लॉयमेंट सर्व्हिस युनिट. यापैकीं एम्प्लॉयमेंट मार्केट इन्फरमेशन बाबतचें काम सांगली उद्योग विनिमय केंद्राकडून लवकरच सुरूं करण्यांत येईल.

सांगली जिल्ह्यांतील प्रवाश्यांचीं आकर्षणें

सांगलींतील सर्वांत मोठें आकर्षण म्हणजे श्री गणपती मंदिर होय. श्री गणपती मंदिर सांगली संस्थानचे पहिले अधिपति श्री. कै. आप्पासाहेब पटवर्धन यांनीं बांधलें. श्रीमंत आप्पासाहेब व त्यांचे चुलते श्रीमंत बाळासाहेब मिरजकर यांच्या मध्यें मिरज जहागिरीच्या वांटणीचें काम चालू असतांना श्रीमंत आप्पासाहेब पटवर्धन हे मालगांव वेशीजवळील मळ्यांत राहूं लागले व तेथें त्यांनीं श्री गजाननाचें एक लहानसें देवालय बांधलें. पुढें कांहीं दिवसांनीं जहागिरीची वांटणी झाल्यावर श्रीमंत आप्पासाहेब १८०८ च्या पूर्वी सांगलीस आले व हेंच राजधानीचें ठिकाण ठरविलें. श्रीमंत आप्पासाहेब सांगलीस आले त्यावेळीं सांगली शहर चार पांच हजार वस्तीचें अगदी लहान गांव होतें. श्रीमंतांनीं सांगली हें राजधानीचें ठिकाण ठरविल्यानंतर गणेशदुर्ग किल्ला बांधण्यास व नवी सांगली आंखण्यास सुरवात केली. श्री गणपती मंदिराच्या कामास १८१३ च्या सुमारास सुरुवात झाली. श्री कृष्णा नदीच्या कांठींच हें देऊळ बांधण्याचें ठरल्यामुळें नदीच्या पुरापासून तें कसें सुरक्षित राहील याची योजना हातीं घेतली. सर्व मंदिराचा आकार तीस ते चाळीस फूट खोलीपासून चुनेगच्ची भरून कितीहि पाणी चढलें तरी देवालयांत येणार नाहीं अशा रीतीनें उंच चढवून घ्यावा लागला. कोल्हापूर नजिकच्या श्री जोतिबाच्या डोंगरांतून मंदिराध्या बांधकामाचे दगड आणावे लागले. हल्लीप्रमाणें वाहतुकीचीं ट्रकसारखीं साधनें त्यावेळीं नव्हतीं. १६ बैलांनीं ओढण्याच्या गाड्यांवरून सदर कामाचे दगड चाळीस ते पंचेचाळीस मैलांवरून आणावे लागत असत. मोठें दगड गाड्यावरून आणल्यानंतर वेशीपासून वाजत गाजत नेत असत असें म्हणतात. देवालयाचें काम पुरें होण्यास तीस वर्षें लागलीं. देवालयाचें काम सुबक असून त्याकाळीं कसबी लोक किती होते याची हें देऊळ प्रत्यंतरच आहे. देवालयाचें काम पुरें होऊन आज एक शतक होऊन गलें तरी त्याचा नवेपणा अजून आहे तसाच आहे. दगडावरील आरशासारखें काम पाहून हजारों मंडळींनीं समाधान व्यक्त केलें आहे. देवालयाच्या सभोंवती श्री चिंतामणेश्वर, श्री सूर्यनारायण, श्री चिंतामणेश्वरी व श्री लक्ष्मीनारायण अशीं चार देवळें आहेत. भोंवतालचीं चार देवळें व मुख्य श्री गजानन मंदिर म्हणून श्री गणपती पंचायतन होय. मंदिराचें काम १८४३ सालीं पुरें झालें. प्रत्यक्ष श्री गणपतीची स्थापना सध्याचें मंदिरांत १८४४ साली विधिपूर्वक फार मोठ्या समारंभानें झाली. त्यानंतर कांहीं दिवसांनीं शके १८६७ मध्यें पंचायतन देवांच्या स्थापना समारंभपूर्वक झाल्या. पहाटे पांच पासून रात्रीं नऊपर्यंत पूजाअर्चेचे कार्यक्रम चालू असतात. इ. स. १८१३ मध्यें श्रीमंतांनीं सांगली संस्थानच्या सर्व परगण्यांतील प्रमुख गांवांतून श्री गणपतीच्या पंचायतनास जमिनी इनाम करून दिल्या. इ. स. १८१८ मध्यें सांगली, सांगलीवाडी गांवें इनाम करून दिलीं व ती आजहि आहेत. श्री गजानन मंदिराच्या सभामंडपाचें काम त्यावेळीं तसेंच राहून गेलें. हल्लीचे श्रीमंत चिंतामण-

श्री गणपती पंचायतन

राव आप्पासाहेब यांनीं हें काम मनावर घेऊन आंतील बांधकामास शोभेल असा दगडी सभामंडप तयार करून घेतला. सभामंडपाचें उद्‌घाटन उपराष्ट्रपती डॉ. राधाकृष्णन् यांच्या हस्तें मोठ्या समारंभानें झालें. चिंतामणी महाद्वाराचें भव्य काम आतां पुरें होत आलें आहे. श्रीमंत सर चिंतामणराव आप्पासाहेब यांनीं हें फार भव्य काम केलें आहे. बाहेरून येणाऱ्या प्रवाश्यांना महाद्वार व देऊळ हें एक फार मोठें आकर्षण आहे. नवीन सभामंडप व महाद्वार यांस अदमासें आठ ते नऊ लाख रुपये खर्च येईल असा अंदाज आहे.

श्री खरसुंडसिद्ध (खरसुंडी)

सांगली जिल्ह्यांतील खानापूर तालुक्यांत आटपाडी महालांत श्री खरसुंड सिद्धाचें हें देवस्थान सुमारें ११०० वर्षापूर्वीचें पुरातन स्थान आहे. शंकरभक्त सिद्धमुनी यांचें श्रीक्षेत्र काशी उज्जयनी, कोल्हापूर, सोनारी, अंकली, म्हसवड व खरसुंडी या सात गांवीं वास्तव्य होतें. ११०० वर्षापूर्वीं खरसुंडी गांव अस्तित्वांत नव्हतें. खरसुंडी गांवापासून एक मैलावर चिंचोळें गांव आहे. श्री. नयाप्पा गवळी हा एक संपन्न सिद्धभक्त त्या गांवचा होता. त्याच्याजवळ खिलार गायी पुष्कळ होत्या व त्या सर्व खरसुंडी गांवीं चरण्यास येत असत. दह्या दुधाची कावड घेऊन श्री. नयाप्पा गवळी दर शनिवारीं म्हसवड येथील श्री म्हसवड सिद्धास जात असे श्री. नयाप्पा गवळी म्हसवड सिद्धाचा एकनिष्ठ भक्त होता. वार्धक्यामुळें त्याला जाणें जमेना. भक्तांचा कनवाळू परमेश्वर त्याला प्रसन्न झाला व त्याला दृष्टांत दिला. "तुझी एकनिष्ठ भक्ति पाहून व येथें येण्यांत तुला होत असलेल्या यातना पाहून तूं आतां इतःपर इकडे येऊ नकोस, मी तुझ्या कुरणांत तुझ्या भक्तीमुळें प्रगट होत आहे. त्याचा दाखला तुलां पाहण्यास मिळेल. तुझ्या कुरणांतील चिंचेच्या वनांतील एका कालवडीच्या स्तनांतून दुधाच्या धारा वाहूं लागतील व त्याचा खरवस तयार होईल. त्यापासून दोन लिंगें तयार होतील. त्या ठिकाणीं मी आलों असें समजून तू माझी पूजा कर." हा दृष्टांत झाल्यापासून तो गायी चारण्यास स्वतः जाऊं लागला. त्याच्या गायींच्या खिलारांतील एका कालवडीच्या स्तनांतून दुधाची धार सुरू झाली. या कच्च्या दुधाचा खरवस होऊन त्यांतून दोन लिंगें निर्माण झाली. म्हणून या स्थानास 'खरसुंड = सिद्ध' 'खरवस शुंड = सिद्ध' असें नांव प्राप्त झालें. त्याठिकाणीं सिद्धभक्त श्री. नयाप्पा गवळी पूजाअर्चा करू लागला. चिंचोळे गांवचे व आंसपासचे लोक या परमेश्वरी घटनेचें कौतुक करू लागले. त्यानंतर या खरसुंड सिद्धाचें देवालय बांधण्यांत आलें. खरसुंड – सिद्धाच्या उजव्या बाजूस श्री. नयाप्पा गवळी याची समाधी आहे. अशा रीतीनें 'खरसुंडी' हें गांव वसलें अशी कथा आहे. शंकराच्या देवालयांत नंदीची प्रतिष्ठापना असते असा रिवाज आहे. परंतु या देवापुढें ज्या कुवार गायीच्या स्तनांतून दूध निघून 'खरसुंडसिद्ध' तयार झालें त्या गोमातेची सुंदरशी पितळी प्रतिमा आहे.

खरसुंडी येथील जंगी गुरांचा बाजार

हें देवस्थान पूर्वीं औंध संस्थानचे पंत प्रतिनिधि यांचे अंमलाखालीं होतें. माळरान प्रदेश, पाऊस अत्यंत कमी. त्यामुळें प्रजा कशीतरी जगत होती. औंध सरकारनें खरसुंडी येथें पौषी व चैत्री यात्रा, करगणी येथें महाशिवरात्र यात्रा, दिघंची यात्रा, आटपाडी येथें श्री उत्तमेश्वराची कार्तिकी यात्रा अशा सहा खिलार जनावरांच्या प्रचंड यात्रा भरविण्याचा उपक्रम सुरू केला. या भागांत खिलारी जनावरें फार निपजतात. जनावरांच्या खरेदीसाठीं नागपूर, म्हैसूर, कर्नाटक, मद्रास व सिलोन भागांतून खरेदीदार येतात. खरसुंडी यथें पन्नास हजाराचे वर यात्रा भरते. खर-

सुंडीची यात्रा अदमासें ३०० वर्षापूर्वी सुरू झाली असें सांगतात. जनावरांचा भव्य बाजार भरविण्याची प्रथा प्रथम श्री. एकनाथ आनंदराव देशपांडे रा. खरसुंडी यांनीं पुढाकार घेऊन औंध सरकारच्या नतृत्वाखालीं अंमलांत आणली व तेव्हांपासून हा मोठा बाजार भरत आहे.

श्री रेवण सिद्ध

सांगली जिल्ह्यांतील विटे गांवापासून जवळच श्रीरेवण सिद्धाचें स्वयंभू स्थान आहे. श्रीच्या देवालयाच्या पूर्व बाजूस उरुळसिद्ध व पश्चिम बाजूस भुयारांत विश्वाराध्य आहे. देवापुढील मोठ्या नंदीमागें पंच कलशाप्रमाणें पंचाचार्य आहेत. हा रेवणी डोंगर त्यावेळीं पंचधातूंचा होता. म्हणजे सुवर्ण, तांबें, लोखंड वगैरे धातूंचा होता अशी आख्यायिका आहे. डोंगरांतील पांढऱ्या खडयांचा भस्माप्रमाणें उपयोग करतात. तालमीसाठीं लागणाऱ्या तांबडया करेल मातीच्या खाणी या डोंगरावर आहेत. येथें निरनिराळ्या रंगाच्या मातीच्या खाणी असून संशोधन करण्यासारखें ठिकाण आहे. या डोंगरांत ८४ तीर्थें होतीं असा उल्लेख आहे. हल्लीं फक्त १ गोमुख, २ हरणयके, ३ फुलबाग उपलब्ध आहेत. सदर स्थानाचे भक्त कर्नाटकांत व महाराष्ट्रांत फार आहेत. बार्शी, सोलापूर, वैराग या ठिकाणच्या भक्त मंडळींनीं देवालयांतील ओवऱ्यांचें बांधकाम केल्याची माहिती मिळते.

श्री सागरेश्वर तथा समुद्रेश्वर (देवराष्ट्रे)

विटे (जिल्हा सांगली) गांवापासून १२ मैलांवर देवराष्ट्रे गांवीं सागरेश्वराचें फार प्राचीन देवस्थान आहे. या ठिकाणीं दरसाल श्रावण महिन्यांतील शेवटच्या सोमवारीं फार मोठीं यात्रा भरते. देवळाकड जाणारा रस्ता गांवकरी मंडळींनीं चांगला केला आहे. अदमासें चाळीस फूट चढणीवर मंदिरें आहेत. त्या ठिकाणीं अदमासें ४० ते ५० लहान मोठीं देवळें आहेत. सर्वांची बांधणी सारखीच आहे. सर्व देवळें महादेवाचीं आहेत. सर्वांत मुख्य मंदिर मध्यभागीं असून ते सर्वांत जुनें आहे. त्यास 'समुद्रेश्वर' म्हणतात. या ठिकाणीं पूर्वी ऋषींची वस्ती होती असें म्हणतात. हा काळ फार प्राचीन समजला जातो. या भागांत 'कुंताड' राष्ट्र होतें. त्यावेळची ही बांधणी असावी असें संशोधकांचें मत आहे. देवळाची बांधणी हेमाडपंती थाटाची आहे. एक प्राचीन तळें देवराष्ट्रास जाणाऱ्या रस्त्यापाशीं आहे. हें तळें कुंतल नरेशानें दुरुस्त केलें असें म्हणतात. पूर्वी सूत नांवाचे महाऋषी होते. 'सूत उवाच' असा पुराणांतील उल्लेख आहे. सूत हा पुराणाचा मोठा कथनकार होता. सूतानें एकदां व्यासास म्हटलें, "गुरुदेव मी सारी तीर्थें हिंडलों परंतु मला मानसिक समाधान नाहीं. मला आत्मिक शांतता लाभेल असें स्थान सांगा" व्यासांनीं समुद्रेश्वराच्या महादेवाचें मंदिर सुचविलें. प्राचीन काळापासून ऋषींनीं या ठिकाणीं अनंत तप केलें व ती भूमि पावन केली आहे असें महर्षि व्यासांनीं सूतास सांगितलें.

ख्वाजा शमशोद्दिन मिरासाहेब दर्गा मिरज

ख्वाजा शमशोद्दिन मिरासाहेब यांचा दर्गा हें मिरजेचें एक आकर्षण आहे. हजारों हिंदु-मुसलमान भक्त रोज दर्शनाला येतात. हुतात्मा अवलिया हजरत पीर ख्वाजा शमशोद्दिन हे तुर्कस्थानांतील काशगर या गांवचे. जनसेवा म्हणजेच ईश्वरसेवा या उच्च तत्त्वाचे संस्कार ख्वाजा शमशोद्दिन यांच्या बालमनावर झाले. बाल शमशोद्दिन लवकरच कुराण पठण करूं लागले. ख्वाजा शमशोद्दिन वयाच्या अठराव्या वर्षी हिंदुस्थानांत आले. मिरजेंत त्यांनीं धार्मिक शाळा काढल्या. गंधना धोबी त्यावेळीं मिरजेंत राहात असें. लोकांचा तो फार छळ करी. लोक

त्रासून गेले होते. ख्वाजासाहेबांनीं गंधनाचा वध केला. गंधनाची बायको पुढें आली. तिच्या विनंतीवरून गंधना धोब्याची कबर ख्वाजासाहेबांच्या उजव्या पायरीजवळ बांधली आहे. ख्वाजासाहेब नमाज कधी चुकवत नसत. एकदा दुपारी शेतांत नमाज पडत असतां एका वाईट माणसानें त्यांच्या मानेवर कुऱ्हाड मारली. ईश्वराचें स्मरण करीत ख्वाजासाहेबांनीं प्राण सोडले. त्यांच्यासंबंधी बऱ्याच आख्यायिका आहेत. एकदां पायांत चप्पल न घालतां ख्वाजासाहेब जात असलेले एका चांभारानें पाहिलें. त्यानें आपल्या अंगाच्या कातडयाची चप्पल करून ख्वाजासाहेबांना दिली. मिरजेच्या दर्ग्यांत उरुसाच्या वेळीं तुरबतीवर गलेफ घालण्याचा मान चांभाराला मिळाला आहे. पटवर्धन राजेहि ख्वाजासाहेब यांना मानीत असत. एकदा मिरजच्या किल्ल्याला पडलेला वेढा ख्वाजासाहेब यांच्या कृपेनें निघाला व संकट टळलें. मिरजचा दर्गा १६६८ मध्यें बांधला. २०० फूट लांब व २०० फूट रुंद अशा चौथऱ्यावर हा दर्गा बांधला आहे. या दर्ग्यांत हजरत ख्वाजा महंमद मिरा व हजरत ख्वाजा शमशोद्दिन यांच्या तुरबती आहेत. तुरबतीवरील घुमट १५० फूट उंच आहे. पितापुत्रांच्या तुरबतीमध्यें एक तलवार आहे. तुरबती ज्या गाभाऱ्यांत आहेत तेथें स्त्रियांना प्रवेश नाहीं. गेल्या सहाशें वर्षांत या भागांत एकहि स्त्री गेली नाहीं. उरूसाच्या कार्यक्रमाला शिडी चढविण्यानें सुरवात होते. तुरबतीवर गलेफ चढविण्यास ५० वार कापड लागतें. गलेफाचा पहिला मान चांभाराचा, दुसरा बुधगांवचा व तिसरा मिरजेच्या राजेसाहेबांचा असा क्रम आहे. अशा थोर पुरुषाचा दर्गा व येथें होणारा दरसालचा उरुस हें एक या भागांतील आकर्षण होय. मरहूम खांसाहेब अबदुल करीम खां हे एक प्रमुख संगीतज्ज्ञ दरवर्षी सेवेसाठीं येथें येत असत. येथें येणाऱ्या लोकांत भेदभाव नाहीं. एकाच भूमिकेवर सर्वजण येतात व तन्मयतेनें ख्वाजासाहेबांचें दर्शन घेतात. मरहून स्वरसम्राट अब्दुल करीम खां यांची कबर याच दर्ग्याच्या आवारांत असून त्यांचा शिष्यवर्ग त्यांची पुण्यतिथी संगीतसेवेनें साजरी करतात.

बत्तीस शिराळ्याची नागपंचमी

शिराळ्याची नागपंचमी फार प्रसिद्ध आहे. अलिकडे या स्थानास फार महत्त्व आलें असून प्रत्येक वर्षी नागपंचमीस नागाचे खेळ पाहाण्यास मुंबई, पुणें, कोल्हापूर, सातारा, सांगली वगैरे ठिकाणाहून मंडळी येतात. तेथील लहान मुलें नागपंचमीच्या दिवशीं मोठमोठाले साप गळ्यांत घालून हिंडत असलेलीं पाहून आश्चर्य वाटतें. नागपंचमीच्या दिवशीं नाग चावत नाहीं असा येथील मंडळींचा समज आहे. पूर्वी शिराळ्यासहि नागपंचमीच्या दिवशीं मातीच्या नागाची पूजा करण्याची प्रथा होती. पण एका जुन्या आख्यायिकेप्रमाणें प्रसिद्ध संत गोरखनाथ शिराळें गांवीं एका बाईचे घरीं भिक्षेस गेले. भिक्षा वाढण्यास उशीर झाल्याबरोबर त्यांनीं बाईंना विचारलें "आज उशीर कां?" बाईनें सांगितलें कीं, आज नागपंचमी म्हणून मी मातीच्या नागाची पूजा करीत होते. नाथांनीं लागलीच एक जिवंत नाग आणून त्याची पूजा करण्यास सांगितलें. नागपंचमीच्या दिवशीं नाग चावणार नाहीं असा आशीर्वाद दिला. शिराळा गांवचें पहिलें नांव श्रीयाल असें होतें. नाथांनीं नागाचा चमत्कार दाखविल्यावर आसपासच्या बत्तीस गांवचे लोक श्रीनाथांचे शिष्य झाले. म्हणून या गांवांस बत्तीस शिराळा म्हणू लागले. शिराळ्यापासून अगदीं जवळच श्री गोरखनाथांचें फार जुनें मंदिर आहे. हजारों वर्षांची प्राचीन परंपरा व जागृत देवस्थान असा या देवालयाचा लौकिक आहे. या ठिकाणीं गोरख चिंचेचें एक प्रचंड झाड आहे. नागपंचमीच्या दिवशीं शिराळा येथें फार मोठ्या प्रमाणांत जत्रा भरते. जत्रेचें मुख्य आकर्षण म्हणजे जिवंत नागांचा सामुदायिक

खेळ. या खेळांत आदमासे दोन अडीचशें तरुण नाग धरून आणून भाग घेतात. जमलेल्या मंडळींना नागांचे खेळ पाहतां यावेत म्हणून जिल्हा विकास मंडळानें एक प्रेक्षकगृह स्थानिक मंडळींच्या मदतीनें तयार केलें आहे.

शेतकरी सहकारी साखर कारखाना

सांगली माधवनगर रस्त्यावर शेतकरी सहकारी साखर कारखान्याची टोलेजंग इमारत आहे. जिल्ह्यांतील कार्यकर्त्यांच्या परिश्रमामुळें हा साखर कारखाना उभा होऊं शकला. कारखान्याची मशिनरी अद्यावत असून हंगामांत रोज १००० ते १२०० टनापर्यंत ऊंस गाळला जातो. कारखान्याची मशिनरी उभारण्यांस जर्मनींतून इंजिनियर्स आले होते. साखर कारखान्यामुळें आसपासच्या तज्ज्ञ लोकांना काम मिळालें व सांगली माधवनगरला फार महत्त्व आलें. कारखान्याची किंमत अदमासें दीड ते दोन कोटीपर्यंत आहे. या भागांतील हा पहिलाच कारखाना असल्यामुळें कारखाना पाहाण्यास हजारों लोक येत असतात.

श्री शुक्राचार्य (पळशी)

खानापूर तालुक्यांत श्रीशुक्राचार्य म्हणून एक प्राचीन जागृत स्थान आहे. विट्यापासून हें ठिकाण तीस मैलांवर आहे. श्रीशुक्राचार्य महान् योगी होते. परिक्षिती राजाला "श्रीमत् भागवत" शुक्राचार्यांनीं सांगितले अशी कथा आहे. त्यांचें तप हरण करण्यासाठीं इंद्रानें रंभा नांवाची अप्सरा पाठविली. शुक्राचार्य हे ब्रम्हचारी असल्यानें स्त्रीचें दर्शन नको म्हणून ते या ठिकाणीं डोंगरांत अदृश्य झाले. हल्लीच्या देवस्थानाच्या ठिकाणीं याची साक्ष म्हणजे शुक्राचार्यांचे पाठीमागील भाग व जटा स्पष्ट दिसत आहेत. या बाजूचें हें एक प्रसिद्ध स्थान असून हजारों लोक तेथें दर्शनास जातात. या ठिकाणीं नैसर्गिक सौंदर्य भरपूरच आहे. हें ठिकाण उतारावर असून त्याची बांधणी जुन्या पद्धतीची आहे.

तासगांवचें गोपुर

सांगलीपासून पंधरा मैलांवर असलेल्या तासगांवला श्रीगजाननाचें जुनें मंदिर आहे. उजव्या सोंडेचा गणपती म्हणून हें देवालय या भागांत फार प्रसिद्ध आहे. पेशव्यांचे प्रसिद्ध सेनानी परशुरामभाऊ पटवर्धन यांनीं सुमारें १७५ वर्षापूर्वी हें वेळ आणि दक्षिणी घाटाचें ७ मजली गोपूर बांधलें आहे. गोपुरावर खालपासून वरपर्यंत निरनिराळ्या देवतांच्या मूर्ति आहेत. गोपुरासारखें बांधकाम आसपास दुसरें नाहीं. मंदिरांत जातांना उजव्या बाजूस श्रीगजाननाचा एक मोठा रथ आहे. तो श्रीगणपती उत्सवांत बाहेर काढतात. शेंकडों माणसें हा अजस्त्र रथ भक्तिभावानें ओढतात.

श्री दंडेश्वर (दंडोबाचा डोंगर)

सांगली जिल्ह्यांतील श्री दण्डेश्वर हें स्थान सांगली पंढरपूर रस्त्यावर आहे. सांगलीहून अदमासे २० मैल लांब आहे. तेथें महादेवाचे स्वयंभू स्थान आहे. डोंगरांत पोखरून देवालय बांधले आहे व वरती शिखर आहे. दरवर्षी श्रावण महिन्यांत तिसऱ्या सोमवारीं येथें मोठी यात्रा भरते. यथील झाडी फार दाट आहे. दंडोबावर वीज चमकू लागली कीं हटकून पाऊस पडायचाच अशी या बाजूच्या मंडळींची खात्री आहे. येथील पाणी फार गोड व रुचकर आहे. अलीकडे सरकारनें वनमहोत्सवाच्या वेळीं तेथें झाडें लावण्याचा उपक्रम चालू केला आहे.

सांगली जिल्ह्यांतील भिलवडी (मिरज-पुणें रेल्वे लाइनवर) स्टेशनपासून श्री क्षेत्र औदुंबर हें स्थान ४ मैलांवर आहे. हे एक या बाजूचे श्री दत्तात्रयाचे मोठें जागृत स्थान समजलें जातें. श्री क्षेत्र

श्री क्षेत्र औदुंबर

तासगाव तालुका

औदुंबर येथील रम्य वनश्री, श्री कृष्णेचा अथांग व नयन मनोहर डोह, मोकळी व शुद्ध हवा, मंगल व पवित्र वातावरण, कृष्णेच्या घाटावरील श्री दत्तात्रय महाराजांचें देऊळ, ब्रम्हानंद स्वामींचा मठ, श्री देवी भुवनेश्वरीचें देऊळ वगैरे पाहिल्यावर या क्षेत्राच्या महात्म्याची कल्पना येतें. श्री ब्रम्हानंद स्वामी १८२६ सालीं श्री क्षेत्र औदुंबर येथें आले व तेथें त्यांनीं मठी उभारून तप सुरू केलें व पुढें या क्षेत्रींच त्यांनीं समाधी घेतली. त्यांची शिष्यपरंपरा अजून चालू आहे. श्री क्षेत्र औदुंबर येथें श्री दत्त पादुकांवर दगडी देवालय पूर्वाभिमुख आहे. गांवांत औदुंबर वृक्षांची गर्द झाडी असून वातावरण सदैव रम्य असते, त्यामुळें या गांवांस औदुंबर असें नांव पडले. नदी पलीकडे श्री देवी भुवनेश्वरीचें एक रम्य देवालय आहे. देवीची मूर्ति काळ्या दगडाची असून फार प्रेक्षणीय आहे. जुनी शिल्पकला म्हणून देवळांवरील गोपूर पाहाण्यासारखें आहे. भक्त मंडळींनीं श्री दत्तात्रय देवालयाचा सभामंडप अगदी अलिकडे बांधला आहे. पिशाच्चबाधेनें पछाडलेले लोक येथें येतात; श्री ची सेवा करतात व मुक्त होऊन परत जातात अशी आख्यायिका आहे. हें स्थान एका बाजूस असल्यामुळें वर्दळ कमी असते. चित्ताच्या एकाग्रतेला हे स्थान फार चांगलें आहे.

कोणाकडे कशाची चौकशी करावी

क्रमांक	कामाचें स्वरुप	संबंधित अधिकारी	कचेरीचा पत्ता	फोन नंबर कचेरी	फोन नंबर निवास
१	महसूल व सर्वसाधारण कारभार	(१) कलेक्टर व डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेट, सांगली	गणेश दुर्ग, सांगली	१	३
		(२) पी. ए. टू दि कलेक्टर व ॲडिशनल डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेट, सांगली	—,,—	१८५	१९५
		(३) प्रांत ऑफिसर, मिरज विभाग (मिरज, जत व तासगांव—तालुके)	किल्ला, मिरज	——	——
		(४) प्रांत ऑफिसर, वाळवा विभाग, (वाळवा व खानापूर - तालुके आणि शिराळा महाल)	गणेश दुर्ग, सांगली	२४५	——
२	न्यायदान	डिस्ट्रिक्ट अँड सेशन्सजज्ज, सांगली	जिल्हा न्यायालय सांगली	४१	——
३	पोलीस	(१) डिस्ट्रिक्ट सुपरिंटेंडेंट ऑफ पोलीस, सांगली	गणेश दुर्ग, सांगली	१२	२१
		(२) होम इन्स्पेक्टर, सांगली	—,,—	१२	——
४	होमगार्ड संघटना	डिस्ट्रिक्ट कमांडंट ऑफ होमगार्डस्, सांगली	गणेश दुर्ग, सांगली	२२	३२२
५	सार्वजनिक बांधकाम व दळणवळण	एक्झिक्युटिव्ह इंजिनियर, सांगली विभाग, सांगली.	शिवाजी नगर सांगली	२४६	२९१
६	आरोग्य—उपचार व्यवस्था	सिव्हिल सर्जन, सांगली	सरकारी दवाखाना, सांगली	६	२९६
७	सार्वजनिक आरोग्य प्रतिबंधक उपाय	जिल्हा आरोग्य अधिकारी, सांगली.	गणेश दुर्ग, सांगली	३२	——

क्रमांक	कामाचें स्वरूप	संबंधित अधिकारी	कचेरीचा पत्ता	फोन नंबर कचेरी	फोन नंबर निवास
८	मलेरिया निर्मूलन योजना	मलेरिया निर्मूलन अधिकारी, सांगली	गणेश दुर्ग, सांगली	----	----
९	शिक्षण संस्थांची स्थापना आणि शिक्षण-विषयक कार्य	जिल्हा शिक्षणाधिकारी, सांगली	मेन रोड, सांगली	१६	---
१०	प्राथमिक शिक्षण	शासनाधिकारी, जिल्हा शिक्षण मंडळ, सांगली	मिरज रोड, सांगली	१९	---
११	महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाची विद्युत योजना	एक्झिक्युटिव्ह इंजिनियर, महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ, सांगली.	विश्रामबाग, सांगली	३७९	---
१२	एस्. टी. चे मार्ग आणि कार्यपद्धति	(१) विभागीय नियंत्रक, कोल्हापूर विभाग, कोल्हापूर.	कोल्हापूर	१४६	---
		(२) डेपो मॅनेजर, स्टेट ट्रॅन्स्पोर्ट, सांगली	सांगली	१२७	---
१३	लागवडीकरितां जमीन, तगाई, लोखंड व पोलाद वांटप	जिल्हाधिकारी व अध्यक्ष जिल्हा विकास मंडळ, सांगली व तालुका पातळीवर तालुक्याचे मामलेदार	गणेश दुर्ग, सांगली	२०२	---
१४	शेतीच्या सुधारलेल्या पद्धति, बी-बियाणे. अवजारें, किटक नाशक औषधें, रासायनिक खतें, फळ झाडांची व फुल झाडांची लागवड	जिल्हा शेतकी अधिकारी, सांगली	गणेश दुर्ग, सांगली	३६६	---
१५	जिल्ह्यांतील विकास कामें व विकास गट-योजना	जिल्हा प्रकल्पाधिकारी, जिल्हा विकास मंडळ, सांगली व गट पातळीवर समाज विकास गट अधिकारी	गणश दुर्ग, सांगली	२०२	---
१६	ग्रामपंचायती	जिल्हा ग्रामपंचायत अधिकारी, सांगली	गणेश दुर्ग, सांगली	२०२	---


क्रमांक	कामाचें स्वरूप	संबंधित अधिकारी	कचेरीचा पत्ता	फोन नंबर कचेरी	फोन नंबर निवास
१७	सहकारी संस्थांची स्थापना व कार्य-पद्धति	डेप्युटी रजिस्ट्रार, सहकारी संस्था, सांगली.	हरभट रोड, सांगली	८३	—
१८	जपानी भातशेती योजना, शिराळा	असिस्टंट रजिस्ट्रार, जपानी भातशती योजना, शिराळा.	शिराळा	—	—
१९	शेतकी शाळा	मुख्याध्यापक, शेतकी शाळा, डिग्रज, अगर जिल्हा शेतकी अधिकारी, सांगली	डिग्रज गणेश दुर्ग, सांगली	— ३६६	— —
२०	मागासलेल्या वर्गातील जनतेस मिळणाऱ्या शैक्षणिक व इतर सवलती आणि समाज कल्याण योजना	जिल्हा सजाज कल्याण अधिकारी, सांगली.	गणश दुर्ग, सांगली	८	—
२१	जनावरांचें संगोपन, त्यांच्या रोगावरील उपाययोजना व कोंबडी पालन	डिस्ट्रिक्ट ॲनिमल हजबंड्री ऑफिसर, सांगली व तालुक्यांतील जनावरांचे डॉक्टर.	अंकली रस्ता, सांगली	—	—
२२	सहकारी तत्वावर चालणारे लहान उद्योग	डिस्ट्रिक्ट को-ऑपरेटिव्ह ऑफिसर, (औद्योगिक सहकार) सांगली.	अर्बन बँक, हरभट रोड, सांगली	—	—
२३	माजी सैनिकांच्या कुटुंबा संबंधी	जिल्हाधिकारी व अध्यक्ष जिल्हा सैनिक मंडळ, सांगली.	गणेश दुर्ग, सांगली	१	—
२४	अल्पबचत योजना	जिल्हाधिकारी, सांगली	गणेश दुर्ग, सांगली	१	—

क्रमांक	कामाचें स्वरूप	संबंधित अधिकारी	कचेरीचा पत्ता	फोन नंबर कचेरी	फोन नंबर निवास
२५	जमिनीचे तुकडेजोड	कन्सॉलिडेशन ऑफिसर, सांगली	शिवाजी नगर, सांगली	—	—
२६	छोटे-मोठे उद्योगधंदे व कारागिरांस साहाय्य	सिनियर इन्स्पेक्टर फॉर इंडस्ट्रीज, सांगली	हायस्कूल रोड, सांगली	—	—
२७	औद्योगिक कारखानें	फॅक्टरी इन्स्पेक्टर, सांगली	गणेश दुर्ग, सांगली	—	—
२८	कामगार कल्याण	गव्हर्मेंट लेबर ऑफिसर, सांगली	—,,—	—	—
२९	नियंत्रिक बाजार पेठा	मार्केटिंग इन्स्पेक्टर सांगली	हरभट रोड, सांगली	८३	—
३०	जमिनीस ताली घालणें	भू-संरक्षण अधिकारी, मिरज विभाग	किल्ला, मिरज	—	—
		भू-संरक्षण अधिकारी, जत विभाग	जत	—	—
३१	होशी प्रवाश्यांचीं आकर्षणें, जिल्ह्यांतील विविध विकासाच्या सरकारी योजना संबंधीची माहिती	जिल्हा प्रसिद्धि अधिकारी, सांगली	मारुती रोड, सांगली	५९	—
३२	ग्रामीण विभागांत ग्रामपंचायती व सहकारी संस्था यांना सरकारी योजनेनुसार रेडिओ पुरविणें व त्यांची दुरुस्ती	टेक्निशियन-इन्-चार्ज, ग्रामीण रेडिओ विभाग, सांगली	गणेश दुर्ग, सांगली	—	—


क्रमांक	कामाचें स्वरूप	संबंधित अधिकारी	कचेरीचा पत्ता	फोन नंबर कचेरी	फोन नंबर निवास
३३	नोकरी मिळविणाऱ्यांच्या नांवनोंदणी-संबंधी	डिस्ट्रिक्ट एम्लॉयमेंट ऑफिसर, सांगली	मार्केट यार्ड, सांगली	—	—
३४	सर्वोदय क्षेत्रांतील विकास कामें	(१) संचालक, सर्वोदय केंद्र, शिराळा	शिराळा	—	—
		(२) संचालक, सर्वोदय केंद्र, ढालगांव.	ढालगांव	—	—
३५	पोस्ट ऑफिस, टपाल व तारेची व्यवस्था	सुपरिंटेंडेंट ऑफ पोस्ट ऑफिसेस, कोल्हापूर विभाग कोल्हापूर.	कोल्हापूर	५५	३२९
३६	सांगली टेलिफोन एक्सचेंज	डिव्हिजनल इंजिनियर फॉर फोन्स, पुणें	पुणें	—	—
३७	मिरज, तासगांव, इस्लामपूर आणि विटा टलिफोन एक्स्चेंजेस	डिव्हिजनल इंजिनियर फॉर टलिग्राफ्स्, पुणें	पुणें	—	—
३८	जिल्हा लोकल बोर्डाच्या कार्याविषयीं	अध्यक्ष, जिल्हा लोकल बोर्ड, सांगली	मिरज रोड, सांगली	११९	—
३९	सेल्स टॅक्स बाबत	सेल्स टॅक्स ऑफिसर, सांगली	माधवनगर रोड, सांगली	—	—
४०	सरकारी पैशांसंबंधीचा व्यवहार	ट्रेझरी ऑफिसर, सांगली	गणेश दुर्ग, सांगली	२९९	—
४१	दारूबंदी	जिल्हा दारूबंदी अधिकारी, सांगली	गणेश दुर्ग, सांगली	—	—
४२	वेअर हाऊसिंग	वेअर हाऊसमन, सांगली	मार्केट यार्ड, सांगली	३७५	—

क्रमांक	कामाचें स्वरूप	संबंधित अधिकारी	कचेरीचा पत्ता	फोन नंबर कचेरी	फोन नंबर निवास
४३	सरकारी दूध योजना, मिरज	डेअरी डेव्हलपमेंट ऑफिसर, मिरज	मिरज	---	---
४४	सार्वजनिक आरोग्य खात्यांतील पिण्याच्या पाण्याच्या आणि गटारांच्या योजना	(१) एक्झिक्युटिव्ह इंजिनियर, पब्लिक हेल्थ, कोल्हापूर	कोल्हापूर	६४	९४
		(२) डेप्युटी इंजिनियर, पब्लिक हेल्थ, सॅनिटरी सब् डिव्हिजन, सांगली	गणेश दुर्ग, सांगली	---	---
		(३) डेप्युटी इंजिनियर, पब्लिक हेल्थ, सॅनिटरी सब् डिव्हिजन, मिरज	मिरज	---	---
४५	वारणा खोरें योजना	एक्झिक्युटिव्ह इंजिनियर, वारणा खोरें योजना, कोल्हापूर	कोल्हापूर	---	---
४६	पाटबंधारे व कालव्यासंबंधी	एक्झिक्युटीव्ह इंजिनियर, इरिगेशन डिव्हिजन, कोल्हापूर.	कोल्हापूर	---	---
४७	रेल्वेसंबंधी माहिती	(१) स्टेशन मास्तर, मिरज.	मिरज	६७	---
		(२) स्टेशन मास्तर, माधवनगर.	माधवनगर	९८	---
		(३) स्टेशन मास्तर, सांगली.	सांगली	२२२	---
४८	वाहतुक व वाहनें चालविण्याकरितां परवानें	असिस्टंट रिजनल ट्रॅन्स्पोर्ट ऑफिसर, कोल्हापूर	स्टेशन रोड, कोल्हापूर	३८३	---
४९	विकास कार्याची आंकडेवार माहिती	डिस्ट्रिक्ट स्टॅटिस्टिकल ऑफिसर, सांगली.	अर्बन बँक बिल्डिंग, हरभट रोड, सांगली.	---	---

वाहतुक आणि दळणवळण




सार्वजनिक आरोग्य


आटपाडी
माहुली
विटा
खानापूर
पारे
भवानीनगर
वाटेगांव
कुंडल
कासेगांव
आरळें
शिरसी
रेठरे धरण
कोकरुड
शिराळा
इस्लामपूर
सागांव
तासगांव
मणेराजुरी
कवठेमहंकाळ
डफळापूर
जत
संख
कवठेपिरान
सांगली
बुधगांव
मिरज
आरग
प्राथमिक आरोग्य केन्द्र
एस्.एम.पी. केन्द्र
लोकलबोर्ड दवाखाना
सरकारी दवाखाना
नगरपालिका दवाखाना
सरकारी इस्पितळ, सांगली
मिशन हॉस्पिटल, मिरज
क्षयरोग्यांचें इस्पितळ
कुष्टरोग उपचार केन्द्र

६ राजकीय विभाग

जिल्ह्यांतील पिकें



जिल्हा- सांगली

जिल्हा-सांगली

स्वाभाविक विभाग

